म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. ३४५४

ना.ग.गोरे



रेषाचा पक्षस्तंभ

REFBK-0026506

संग्रह निबंध
३०५४
२६५१६
कलगावर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 MAR 1992

20 MAY 1992

19 AUG 1997

१९।११।९७
१८।४।९८

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

येशूचा वधस्तंभ

'चेतश्री'

येशूचा वधस्तंभ

ना. ग. गोरे

REFBK-0026506

चेतश्री प्रकाशन

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

येशूचा वधस्तंभ

प्रकाशिका/
सौ. य. वा. सोनार
चेतश्री प्रकाशन
'मुक्ताई' धुळे रोड
अमळनेर ४२५ ४०१

•

© ना. ग. गोरे

•

मुखपृष्ठ/
श्री. ल. म. कडू, पुणे

•

मुद्रक/
श्री. सुनील अंबिके
श्री समर्थ साई मुद्रण
४२६, सोमवार पेठ
बरके आळी
पुणे ४११ ००१

•

मूल्य/
पासष्ट रुपये

येशूचा वधस्तंभ

॥ म नो ग त ॥

अनेक नियतकालिकांमधून प्रकाशित झालेल्या माझ्या लेखांचे संकलन या पुस्तकात झाले आहे. त्याचे श्रेय अमळनेरचे माझे प्रकाशक मित्र श्री. वा. रा. सोनार यांना दिले पाहिजे. त्यांनी जर नेट धरला नसता तर माझ्या हातून हे काम केव्हाही पुरे झाले नसते. कारण लेख लिहून हातावेगळा केल्यावर त्याच्याकडे परत वळून पाहाण्याची प्रवृत्ती माझ्या ठिकाणी नाही.

परंतु श्री. सोनारांनी हे लेख संकलित करून जेव्हा माझ्यासमोर ठेवले तेव्हा पुनर्वाचनाच्या वेळी मला वाटले की, यामध्ये मी व्यक्त केलेले विचार अजून शिळे झालेले नाहीत, संदर्भहीन बनलेले नाहीत, अथवा निर्माल्य झालेले नाहीत. त्यांचे वैचारिक स्वरूप असे आहे की, या नंतरच्या काळात ज्या विषयांची चर्चा चालूच राहणार आहे त्या चर्चेतसुद्धा ते उपयुक्त ठरू शकतील.

हे माझे मत वाचकांनाही मान्य व्हावे, एवढीच अपेक्षा.

– ना. ग. गोरे

येशूचा वधस्तंभ

॥ अं त रं ग ॥

१. देशकारण आणि मध्यमवर्ग १
२. बुद्धिं शरणं गच्छामि। ६
३. स्वप्न-भाषण ११
४. शहाबानू : सूक्ष्म क्रांतिकारक ! १७
५. हिंसा युग आणि शास्त्रज्ञ २३
६. काळ आणि काळे, बदलत आहेत २८
७. कुराण-सार ३५
८. बिचारे शिवाजीमहाराज, बिचारी भवानी आई ३९
९. येशूचा वधस्तंभ ४४
१०. प्लेटोचा आदर्श समाज ५१
११. धर्म राष्ट्राची आधारशिला बनू शकेल का ? ६१
१२. अथा तो वर्णजिज्ञासा ६९
१३. तिमिरातुनी तेजाकडे ७९
१४. हिंसाचार आणि क्रांती १०३
१५. एक सांगावा ११०

देशकारण आणि मध्यमवर्ग

डिसेंबरच्या २ तारखेला कानपुरातील जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीस मी गेलो असता तेथील रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री. टंडन यांनी मला आग्रहाची विनंती केली की मी त्या दिवशी सायंकाळी रोटरीच्या सदस्यांपुढे बोलावे. मला ती विनंती नाकारता येणे शक्य नव्हते, कारण दोन-तीन वर्षे कानपूरच्या रोटरी क्लबचे अध्यक्ष मला आमंत्रित करीत होते आणि मी काही ना काही कारणाने त्यांना नकार देत आलो होतो. श्री. टंडन यांनी मला विषयही सुचवला. ते म्हणाले, 'मी स्वत: मध्यमवर्गीय आहे. आमचे सदस्यही त्याच मध्यम आणि उच्च वर्गातले आहेत. म्हणून आमचे सध्याच्या परिस्थितीत स्थान कोणते, यावर तुम्ही बोला.'

मग सायंकाळी मी त्याच विषयावर माझे विचार मांडले. तेथे बोलणे मला तेवढेसे अवघड वाटले नाही, कारण त्या विषयाबाबत माझ्या मनात बऱ्याच वेळा मी विचार करीत आलो आहे. मी स्वत: उच्च मध्यम वर्गातला जसा नाही, त्याचप्रमाणे श्रमजीवी अथवा कनिष्ठ वर्गातलाही नाही. दलित तर नाहीच नाही. तेव्हा माझे स्थान कोठेतरी मध्यम वर्गातच मला हुडकले पाहिजे ! आपल्याकडे समाजाचा वर्गीय विचार करण्याची परंपरा नाही. परंपरा आहे ती वर्णीय विचाराची. या वर्णीय विचार परंपरेनुसार वर्णाने मी ब्राह्मण, म्हणजे उच्चच नव्हे तर परमोच्च कोटीतला ठरतो. 'वर्ग' ही कल्पना प्रथम पाश्चात्य देशांत निर्माण झाली आणि मार्क्सने ती ठसठशीत आणि आग्रही स्वरूपाने जगापुढे मांडली. त्याने असा निष्कर्ष काढला होता की सरंजामदारीचा लोप होत जाऊन भांडवलदारी पध्दत जगात जसजशी प्रभावी ठरत जाईल, तसेतसे समाजात दोनच वर्ग राहतील : एक भांडवलदारांचा आणि दुसरा श्रमिकांचा. मार्क्सच्या विचारातून जी सूचना मिळते ती अशी की उत्तरोत्तर मध्यमवर्ग हा क्षीण होत जाईल आणि अंततोगत्वा तो नष्ट होईल. याचा अर्थ मी असा समजतो की तो वाच्यार्थाने नष्ट होणार नसला तरी समाजात त्याला कोणतेही स्थान उरणार नाही किंवा त्याचा प्रभाव पडणार नाही, तो नगण्य बनेल. आपल्या प्रदीर्घ व्यासंगांतून आणि अनुभवांतून मार्क्सने भावी समाजाचे जे चित्र रेखाटले अथवा कुंडली मांडली, ती कितपत बरोबर ठरली याचा मी जेव्हा विचार करतो, तेव्हा मला असे म्हणावेसे वाटते की, समाजाच्या कुंडलीत मध्यमवर्गाला स्थानच उरणार नाही असे मानण्यात मार्क्सची चूक झाली आहे.

गेल्या शंभर वर्षांत औद्योगिकीकरणाची सतत वाढ होत राहिलेली असताना माझ्या मते मध्यमवर्ग नष्ट होण्याऐवजी परिपुष्ट होत चालला आहे. समाजामधील त्याच्या प्रभावातही लक्षणीय वाढ होत आहे. औद्योगिकीकरणाची जी वाढ सतत चालू आहे, ती केवळ संख्यात्मक नसून ती गुणात्मकही आहे, हे देखील ध्यानात ठेवावयास हवे ! उदाहरणार्थ, मुंबईत किंवा नागपुरात जी कापडगिरणी सर जमशेटजी टाटानी किंवा अन्य कोणी स्थापित केली, तिच्याचसारख्या गिरण्या भारतात प्रस्थापित होत राहिल्या नाहीत तर त्यातील यांत्रिक संरचनादेखील नित्य बदलत राहिली. आणि जिथे पूर्वी चार साच्यांवर एक कामगार लागत होता, तेथे आता एक कामगार शंभर साचे चालवू लागला आहे. हे स्थित्यंतर जसे कापडगिरणीत झाले तसेच ते सर्व कारखान्यांतून झाले-मग तो तागाचा असो, लोखंडाचा असो, अथवा रसायनाचा असो. या प्रक्रियेतून माणसाच्या ज्या गरजा होत्या, त्या केवळ पुरविल्या जाऊ लागल्या असे नव्हे तर माणसाच्या ठिकाणी तिने नवीन गरजाही निर्माण केल्या. या जुन्या व सतत वाढत जाणाऱ्या नव्या गरजांच्या अनुषंगाने यंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, दुकानदार, व्यापारी कुशल-अकुशल कामगार, इत्यादिकांचा एक नवीनच शहरी वर्ग निर्माण झाला आणि त्याच्यामुळे परंपरागत समाजातल्या छोटयाशा मध्यमवर्गाची विविधांगी व विस्तृत अशा नवीन मध्यमवर्गात परिणती झाली.

आजच्या परिस्थितीकडे पाहून ज्यांचे मासिक उत्पन्न एक हजार ते चार किंवा पाच हजारांपर्यंत आहे, अशांची गणना मध्यमवर्गात करण्याचे जर ठरविले तर मध्यमवर्गाचा हा पट्टा किती विस्तृत बनला आहे, याची आपणास कल्पना करता येईल. पुणे, मुंबई, दिल्ली, मद्रास, कानपूर, हैद्राबाद अशा शहरांतील सुतार, गवंडी, कारखाना-कामगार, आदी व्यावसायिक महावार हजारांवर रुपये आमदनी सहजासहजी मिळवितात; म्हणून त्यांचाही या मध्यमवर्गातच समावेश केला पाहिजे. मध्यमवर्गामध्ये, ओलिताखाली तीन-चार एकरांपासून अधिक शेती मालकीची असणाऱ्या शेतकऱ्यांनाही घातले पाहिजे. विधानसभेतीतल सभासद, जिल्हापरिषदेचे सदस्य, सहकारी साखर कारखाने, बँका आदी व्यवसायांत निवडून आलेली मंडळी ही दरोबस्त मध्यमवर्गातलीच मानावयास हवीत. भारताच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रांची पाहणी केली, तर प्रत्येक क्षेत्रातील महत्त्वाच्या पदांवर याच वर्गातील लोक असल्याचे प्रत्ययास येईल. याला काही ठिकाणी अपवाद असले, तरी त्यामुळे या मंडळींचे वर्गस्वरूप पालटत नाही !

कोठल्याही देशातील इतिहास असे सांगतो की त्या देशाच्या समाजात नवीन

प्रवृत्ती निर्माण करणाऱ्या किंवा नवीन विचार सागणाऱ्या ज्या व्यक्ती आजपावेतो निर्माण झाल्या आहेत, त्यातील बहुतांश व्यक्ती ज्याला आपण मध्यमवर्ग मानू, त्यातूनच निर्माण झालेल्या आहेत. मग तो गौतमबुध्द असो, महावीर असो, नानक असो; ते ज्योतिबा असोत, चक्रधर असोत की बसव. शंकराचार्य असोत अथवा शिवाजी. टिळक-गोखले-आगरकर असोत की भीमराव आंबेडकर. भारताच्याबाहेर नजर टाकली, तरी असेच आढळून येते की मार्क्स, लेनिन, माओ, हे अलीकडचेच नेते नव्हेत तर महंमद पैगंबरसुद्धा मध्यमवर्गातूनच निर्माण झाले. नाही म्हणायला येशू ख्रिस्ताचा मात्र या नियमाला अपवाद आहे. तो एका सुताराचा अनौरस पुत्र होता. हे असे मध्यमवर्गीय असावे, यात अनैसर्गिक असे काही नाही. कारण मध्यमवर्ग हा एक असा वर्ग आहे की जो उच्च आणि नीच वर्गांतील जनतेच्या मध्ये उभा असतो. म्हटले तर आहेरेत म्हटले तर नाहीरेत अशा अवस्थेत तो असतो. त्या त्या युगांतील जी उच्च संस्कृती म्हणून मानली जाते, तिच्या रक्षक वर्गातील व्यक्तींचा परिचय त्याला असतो आणि त्याचबरोबर जे पायातळचे लोक असतात त्यांच्याहीपासून तो फार दूर नसतो. शिक्षणाचा लाभ होत असल्यामुळे, त्याचप्रमाणे जग पाहण्याची थोडीफार संधीही मिळाल्याने इतिहासाचा ओघ जसा त्याच्या लक्षात येतो, तसेच वर्तमान परिस्थिती समजून घेणे व भविष्यात तिच्या ओघाला कोणते वळण लागणे इष्ट व शक्य आहे, याचा अंदाज घेण्याचे सामर्थ्यही त्याच्या ठिकाणी असते. साहजिकच समाजाचे नेतृत्व करण्याइतकी दूरदृष्टी आणि वर्तमान परिस्थीतीशी टक्कर देण्याइतका झुंजारपणा त्याला दाखविता येतो. तेव्हा या मध्यमवर्गातील व्यक्तींनी समाजाला नेतृत्व द्यावे, नवा विचार द्यावा आणि स्वत: तो आचरून दाखवावा, हे त्याचे एकप्रकारे इतिहासदत्त कर्तव्यच ठरते. ते पार पाडण्यात त्याच्याकडून समाजावर मोठे उपकार होत आहेत, असे मानण्याचे कारण नाही. त्यांचे ते इतिहासदत्त कर्तव्यच असते.

भारतीय समाजाच्या आजच्या परिस्थितीकडे पाहता मला असे म्हणावेसे वाटते की देशास जी दुरवस्था आज अनेक बाजूंनी प्राप्त झाली आहे, तिचे प्रमुख कारण असे की भारतात नवीन अस्तित्वात आलेला हा जो सर्वव्यापी मध्यमवर्ग आहे, त्याला आपल्या या इतिहासदत्त भूमिकेचा विसर पडला आहे. १९४७ सालानंतरच्या गेल्या सुमारे चाळीस वर्षांत जी पिढी भारतात निर्माण झाली, तिच्याच हाती सत्ता, संरक्षण, विज्ञान, शिक्षण, न्यायसंस्था, व्यवस्थापन आणि दंडाधिकार-यांच्या सर्व किल्ल्या आहेत, असे दिसून येईल. इंग्रजांच्या आमदानीच्या १००-१२५ वर्षांच्या काळात ज्या दोन तीन पिढया निर्माण झाल्या, त्यांतले

बहुतेक सर्व लोक आता इहलोक सोडून गेले आहेत. जे अगदी थोडे मोजके उरलेले आहेत, तेही लवकरच आपल्यांतून निघून जातील. याचा उघड अर्थ असा आहे की भारतामध्ये अर्थकारण, राजकारण आदी सर्वच क्षेत्रांमध्ये जी अवकळा प्राप्त झाल्यासारखी दिसते, तिचे जनक या पिढीतलेच आहेत आणि तिचे संगोपनही तीच पिढी करते. अन्यायाला, विषमतेला, भ्रष्टाचाराला विरोध करण्यास उभे राहण्याऐवजी अंगचोरपणा करून स्वत:ला धक्का न पोचेल असे वागणे अथवा तिच्यापासून स्वत:च्या पदरात काही पाडून घेणे शक्य असल्यास ते पाडून घेण्याचा प्रयत्न करणे, यातच ती इतिकर्तव्यता मानते ! उच्च वर्गांतील मूठभर लोक, मग ते सत्तारूढ असोत वा धनारूढ असोत त्यांच्या विरोधात उभे न राहता शक्य तितके त्यांच्यामध्ये मिसळून जाण्याचीच इच्छा मध्यम वर्गात बलवत्तर होते आहे. ते लोक आणि आपण यांची बेरीज केली, तरी भारतीय समाजामध्ये ती फारतर पंचवीस किंवा तीस टक्के ठरेल आणि इतर सत्तर टक्के समाज अज्ञानी, दरिद्री, राष्ट्रीयत्वाचे भान ठेऊ न शकणारा, असा राहील याची जणू काही त्यांना दखलच नाही. कनिष्ठ आणि दलित वर्गीयांच्या भावनांशी आपल्या भावनांचे धागे कसे जुळतील, याचा विचार न करता सत्ताधीश आणि धनाधीश यांच्या पंक्तीत आपणालाही पाट कसा मिळेल, या दिशेने मध्यमवर्गाची पावले पडताना दिसतात.

आधी राजकीय की सामाजिक असा वाद स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा सुरू झाला, तेव्हा असा युक्तिवाद करण्यात येई की भारताभोवती पडलेले परवशतेचे पाश आधी तोडू या म्हणजे मग जातींचे,रूढी-विषमतांचे, पाश तोडणे सोपे होईल. ही विचारधारा गतिमान करण्याचे कार्य त्यावेळच्या काही मध्यमवर्गीयांनी केले होते आणि त्या काळच्या परिस्थितीनुसार त्यांच्या त्या युक्तिवादात काही अंशी तथ्यांशही होता. पण झाले असे की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजपरिवर्तनाच्या दिशेने पावले उचलली गेली नाहीत. समाजपरिवर्तनाची निकडच वाटेनाशी झाली. आर्थिक विषमता दूर करण्याबाबतही ते 'गरिबी का वाटायची आहे? आधी संपत्ती निर्माण होऊ दे मग वाटण्याचे बघू'-असे म्हणत म्हणत त्यांनी देशाला अनुल्लंघनीय अशा आर्थिक विषमतेपर्यंत आणून पोचविले आहे. जातिसंस्था आणि धर्मसंस्था पूर्वीपेक्षाही अधिक टणक बनत आहेत. याचाच अर्थ असा की सध्या सर्व प्रकारच्या क्रांतीची वाट पुसून गेल्यासारखी झालेली आहे. ती साफ करण्याची उच्च वर्गाला गरज वाटत नाही, तर शोषित व दलितांना ते कार्य पार पाडण्याइतके सामर्थ्य नाही आणि भानही नाही. इकडे मध्यमवर्गाकडे पहावे तर तो सतत फुगत चालला आहे आणि सुस्तावत आहे. त्यामुळे या मध्यमवर्गांतील तरुणांचे व

तरुणींचे पुन्हा जागरण करण्याचे काम हाती घेतल्याखेरीज गत्यंतर दिसत नाही. त्यांची आणि समाजाच्या तळांतील सुप्त शक्तींची जेव्हा सांगड बसेल, त्याच वेळी चालू घडीला अडकून पडलेला समाजस्थित्यंतराचा गाडा पुनश्च वाट चालू लागण्याचा संभव ! आता प्रबोधन, परिश्रम व त्याग, ही मूल्ये स्वातंत्र्यपूर्व इतिहासांत जमा झाली-आता त्यांची काही उपयुक्तता नाही असे मानणे हे आत्मघातकीपणाचे ठरेल. संदर्भ बदलले असतील,नव्हे आहेत. पण या बदललेल्या संदर्भातसुद्धा ही मूल्ये जर कायम ठेवली तरच भारताची एकात्मता यथार्थपणे साधता येईल, नाहीतर नाही.

***



बुद्धिं शरणं गच्छामि।

बुद्धिप्रामाण्यवाद्यांसमोर आज फार मोठी आव्हाने उभी आहेत. गेल्या १०० वर्षांत बुद्धीच्या जोरावर माणसाने अभूतपूर्व प्रगती केलेली आपण पाहतो. अमेरिका आणि रशिया या दोन देशांनी तर बुद्धिजन्य विज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत फार मोठी आघाडी मिळवलेली आहे. ही जशी दोन्ही राष्ट्रे बलोपासक आहेत, तशीच ती विज्ञानाची उपासकही आहेत. त्यापैकी अमेरिकेतील जनता बहुतांशी सश्रध्द तर रशियातील समाज बहुतांशी अश्रद्ध आहे. परंतु त्यांपैकी कोणीच खऱ्या अर्थाने बुध्दिवादी नसल्याने आपल्या ज्ञानसाधनेतून प्राप्त झालेले आणि होत असलेले सामर्थ्य मानवजातीच्या उद्धारासाठी वापरावे, असे काही त्यांना वाटत नाही ! सर्व जगाचा नाश ओढवला तरी चालेल पण आपले वर्चस्व कायम राहिले पाहिजे अशीच त्यांची स्वार्थी भूमिका असल्याचे आढळून येते. समाधानाची गोष्ट अशी की या दोन्हीपैकी रशियाचे सर्वश्रेष्ठ नेते श्री. गोर्बाचेव्ह यांच्या अलीकडील भाषणांमधून मात्र ही व्यापक शांतीची व हिताची जाणीव डोकावताना दिसते आहे. हे पक्व बुद्धीचे लक्षण आहे, असे मी मानतो.

आपल्या देशाकडे आपण जर नजर वळविली, तर येथे तर आपल्या बुद्धीला खग्रास ग्रहण लागत चालले आहे की काय, अशी शंका येते. विज्ञानात आपण काही फार मोठी मजल मारलेली नाही हे श्रीहरिकोटा येथे नुकतेच सिध्द झालेले आहे. परंतु त्यामुळे नाउमेद व्हावे असे मी म्हणत नाही. कारण रोगराई दूर करण्यात, अधिक धान्य पिकविण्यात, सिंचनाखाली अधिकाधिक क्षेत्र आणण्यात आपण पुष्कळच मजल मारलेली आहे. परंतु विज्ञानात थोडीफार प्रगती करीत असताना भारतातीतल सुशिक्षित व अशिक्षित जनतेमध्ये अंधश्रध्देचे प्रमाण वाढतच चाललेले दिसते. २१ व्या शतकात जाण्याची भाषा पंतप्रधानांपासून सर्वजण बोलत असतात. तसे बोलणे ही आता एक फॅशनच झालेली आहे. पण आपल्या हे लक्षात येत नाही की आपण जेव्हा २१ व्या शतकात असू, त्या वेळी खरा महत्त्वाचा प्रश्न हा असेल की २१ व्या शतकातील भारत हा सत्तर कोटी किंवा शंभर कोटी लोकांचा एक जोमदार, परस्परांमध्ये बंधुत्वाची भावना असणारा आणि समाजाच्या अंगोपांगी नवा आत्मविश्वास बाळगणारा देश बनलेला असेल की आज ज्या तऱ्हेचा तो आहे त्याचीच आणखी जीर्ण व फाटलेली आवृत्ती आपणांस २१ व्या

शतकात पाहावयास मिळेल ?

भारतातील धार्मिकता ही खरे पाहू जाता ९९.९९% अंधश्रद्धा आहे ! पंजाबसारख्या ठिकाणी तर ती पिसाट आणि उन्मत्त बनलेली दिसते. यल्लमा अथवा रेणुका देवीला मुली अर्पण करणे म्हणजेच देवीच्या नावाने मुलींना वेश्या बनविणे, आणि 'सत् श्री अकाल' म्हणून बायका-पुरुषांना गोळ्या घालणे, असले धर्मश्रद्धेचे अद्भुत प्रकार भारतात घडत आहेत ! क्षणभर थांबून कोणी असाही विचार करायला तयार नाही की भारतामध्ये एकीकडे लोक अधिकाधिक धर्मनिष्ठ बनताना दिसतात आणि त्याच वेळी ते अधिकाधिक क्रूर व भ्रष्ट होतानाही दिसतात, हा प्रकार काय आहे ? बुद्धीशी पूर्ण फारकत घेतल्यामुळेच अशा प्रकारची धर्माच्या नावाने धर्माची विटंबना होऊ शकते. भारतातील सुशिक्षित माणसेही जातिद्वेषाने आणि धर्मद्वेषाने भारलेली, अंधश्रद्धांना कवटाळणारी बनत आहेत.

अशा समाजात 'बुद्धिप्रामाण्यवादी' असे स्वत:ला म्हणविणारांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडेल. ईश्वर न मानता, अंधश्रध्दांना न गोंजरता, समाजहिताचे भान ठेवून माणसाला सदाचरणाने वागता येते, हे स्वत:च्या आचरणाने त्यांनी सिध्द केले पाहिजे. स्वातंत्र्यासाठी लढताना जशा प्रकारचे आचरणाचे आणि निष्ठेचे आदर्श त्या तरुणांनी आपल्यासमोर ठेवले होते, तशाच प्रकारचे आचरण आणि निष्ठा आजच्या बुद्धिवाद्यांनी ठेवण्याची आवश्यकता आहे. आपल्या मताचा आग्रह त्यांनी 'नम्रत्वे पण दृढनिश्चयाने' ठेवला पाहिजे. पाच हजार वर्षे चालत आलेल्या अंधश्रद्धा आणि रुढी शेपन्नास वर्षांच्या, अर्ध्या कच्च्या दिलाने केलेल्या पुस्तकी प्रचाराने नाहीशा होतील अशी आशा बाळगणे म्हणजे आपल्याला कोणत्या आव्हानाला तोंड द्यायचे आहे, याची नीटशी कल्पना नाही असा त्याचा अर्थ होय. आज शहरांतून आणि खेडयापाडयांतून उदयास येत असलेल्या नव्या पिढीसमोर आपण निर्भयपणे आपली भूमिका सांगण्यात जरासुध्दा हयगय करता कामा नये.

इंग्रजांच्या साम्राज्यशाहीविरुद्ध लढा देत असताना राष्ट्रवादाला पूरक म्हणून आपल्याकडे एक प्रकारचा 'पुनरुज्जीवनवाद' निर्माण झाला. 'आमच्या देशात प्राचीन काळी सर्व काही होते. आदर्श समाज होता, लोकशाही होती, आधुनिक विज्ञान होते, आधुनिक शस्त्रे-अस्त्रे होती; अगदी विमानेही होती' असे म्हणणाऱ्यांची वाहवा होऊ लागली. तोच भ्रामक राष्ट्रवाद आजही अंधश्रद्धा सेवूनच पुनरुज्जीवित होतो आहे की काय, अशी शंका येते. अवर्षणावर उपाय म्हणून ढगांवर काही प्रक्रिया करून पाऊस पाडण्याचे प्रयोग चालू झाल्याबरोबर कोणीतरी असे सांग-

ण्यास पुढे आले की ऋग्वेदाच्या १०व्या मंडळातील ८६व्या सुक्तांत वृषकपी नावाचे एक यंत्र ढगात सोडून कृत्रिम पाऊस पाडण्यात आमच्या प्राचीन वैज्ञानिक ऋषींनी यश मिळविले होते. (साधना, पा. २३, ५-३-८७) पाश्चात्य देशांत कॉम्प्यूटर निघाल्याबरोबर आमच्या श्रीगणेशाथर्वशीर्षात कॉम्प्यूटरचे रहस्य साठविले आहे असे काही शहाणे सांगू लागले. (तरुण भारत, १९-३-८७) विकृत आणि पश्चात बुद्धी राष्ट्रवादाचीच ही सर्व रूपे आहेत. कारण त्यातून राष्ट्राचे कोणतेच हित साधत नाही. फक्त गतकालाबद्दलची निरर्थक अहंता निर्माण होते. उद्या जर कॅन्सरवर कोणी प्रभावी औषध काढले, तर आपल्यापैकी कोणीतरी पुढे येऊन 'हा उपाय गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीपासून आम्हास ठाऊक आहे' असे सांगू लागला तर आपणाला नवल वाटू नये! बुद्धिवादाला पोखरणारेच हे सर्व सूक्ष्म प्रयत्न आहेत.

बुद्धिवाद म्हणजे चार्वाकवाद; चार्वाकवाद म्हणजे स्वैरवाद, अशी बिन-बुडाची व द्वेषमूलक समीकरणे मांडून बुद्धिवादाची निंदा करणारे तर अनेक आहेत. पण आम्ही ज्या बुद्धिवादाचा आग्रह धरतो, तो अनुशीलन मानणारा आहे. स्वैराचाराला उत्तेजन देणारा नाही. व्यक्तीचे व समष्टीचे नियंत्रण करणारा कोणी ईश्वर आहे, हा सिद्धांत जेव्हा बुद्धिवादी नाकारतात, तेव्हा बुद्धिवादी समाजाने स्वयं-शासित असले पाहिजे असे ते मानीत असतात. आणि म्हणूनच त्यांचा विश्वचालक परमेश्वराला जसा विरोध असतो, तसाच समाजचालक हुकूमशहालाही विरोध असतो. बुद्धिवादी हा तत्वत:च लोकसत्तावादी, समतावादी आणि विषमताविरोधी असतो. बुद्धिवादी हा धर्माला समाजसापेक्ष व कालसापेक्ष समजतो. म्हणून कोणत्याही धर्माचा तो द्वेषी नसतो तसा अनुयायीही नसतो, मात्र अभ्यासक असतो. मानवी संस्कृतीच्या एकेका टप्प्याचा निदर्शक म्हणून तो धर्माकडे पाहतो.

सर्वधर्म समभाव बुद्धिवादी मानतो तो या अर्थी की, सर्वच धर्म आता कालबाह्य झालेले असून ते माणसा-माणसात वितुष्ट आणणारे आहेत असे त्याचे मत असते. सर्व धर्म जर सारखेच खरे असते तर इतके धर्म निर्माण झालेच असते कशाला ? आणि एका धर्माच्या प्रवक्त्याने अन्य धर्मानुयायी नरकात जातील अशी शापवाणी उच्चारली असती कशाला ? तथापि सर्वधर्म समभावाची कल्पना जर स्वीकार्य ठरली आणि धर्मापायी होणारा रक्तपात थांबला तर बुद्धिवाद्याला आनंदच होईल.

परंतु धर्माच्या पांगुळगाडयांची अथवा कुबडयांची गरज मानवाला आता राहिलेली नसून तो आता मानवी समानतेच्या ऐहिक पातळीवर पोचलेला असल्यामुळे आवश्यक झालेल्या मानवी समत्वाची जाणीव कोणाही बुद्धिवाद्याला

धर्मसमभावापेक्षा अनेक पटींनी स्वीकारार्ह व संतोषदायी वाटेल. तो आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची उत्पादनक्षमता, संपर्क व संचार क्षमता आणि त्याचबरोबर त्यांची विध्वंसनक्षमता यासंबंधीची पूर्ण जाणीव ठेवणारा असल्यामुळे राष्ट्रीय सीमांच्या मर्यादा त्यांना अपुऱ्या पडत आहेत आणि त्यांच्या प्रभावामुळे सर्व राष्ट्रे व समाज जागतिक ऐक्याच्या वास्तवाकडे क्रमाक्रमाने का होईना खेचले जाणार आहेत हे तो ओळखतो. म्हणून अतिरेकी राष्ट्रवाद त्याला मान्य होत नाही.

बुद्धिवादी कोणास म्हणावे ? या प्रश्नाला मी असे उत्तर देईन की माणसाला पंचेन्द्रियांसह प्राप्त झालेली जी बुद्धी तिलाच जो वस्तुजाताचे मूल्यमापन करण्याचे एकमेव साधन मानतो तो. यो बुद्धेः परतस्तुसः ही ईश्वरासंबंधीची कल्पनासुध्दा शेवटी बुद्धिजन्यच नव्हे का ? बुद्धीपासून अलग होऊन कितीही जरी कोलांटया मारण्याचे आपण ठरवले, कितीही स्वप्ने पाहिली आणि साक्षात्कार अनुभवले तरी त्यांना शेवटी बुद्धीच्या थापटणीने ठोकून पहावे लागते आणि त्यानंतरच त्यातले फुटके टाकून देण्याच्या लायकीचे किती आणि संग्रही ठेवण्याला पात्र किती, ते ठरते ना ? माझ्यापुढे कोणी जरी अमृताचा वाडगा आणून ठेवला तरी त्याची चव घेण्यासाठी माझ्यापाशी जिभेवाचून कोणते साधन आहे बरे ? मुमुक्षूच्या वाटेत भेटणाऱ्या सिद्धींच्या मोहात न फसणारा साधक त्या सिद्धी आहेत, मोक्ष तो हा नव्हे हे तरी कोणती कसोटी लावून ठरवतो ? बुद्धीचीच की आणखी कोणती ? ईश्वरमुक्त बुद्धी हाच खरा मोक्ष, तीच खरी स्वायत्तता आणि स्वतंत्रता.

म्हणून बुद्धिवादी बुध्दीला कधीच हीन लेखीत नाही. बुद्धिवादी म्हणजे भोगवादी हे समीकरणच चुकीचे आहे. बुद्धिवादी सुखवादी असतो, पण तो त्याकरता कष्टाची, त्यागाची किंमत मोजण्यास काकू करीत नाही. तो व्यक्तीच्या मोक्षाहून समष्टीची दास्यमुक्ती, शोषणमुक्ती उच्चतर मानतो. तो राष्ट्रवादी असतो पण मानवतावादाला तो श्रेष्ठतर स्थान देतो. माणसे म्हणजे विश्वचक्रावर बसवलेली बाहुली, जगच्चालकाने नाचवलेल्या त्या कठपुतळ्या ही कल्पना त्याज्य मानल्यामुळे बुद्धिवादी स्वतःला समष्टीचा अविभाज्य घटक मानतो आणि समाजाला अपाय न पोचेल असे वागण्याची जबाबदारी आपल्यावर आहे हे गृहित धरतो. ईश्वर मानून अधम कृत्ये करण्यापेक्षा ईश्वराचा त्याग करून जबाबदारीने वागणारा समाजाचा मित्र की शत्रू ?

मात्र बुद्धिवाद्याने धर्माची आणि लोकभ्रमाची मुळे जनमानसात किती खोलवर रुजलेली आहेत ते समजून घ्यावयास हवे. धर्मने जे विहित वा निषिद्ध ठरवले, धर्मने जे यज्ञस्वरूपी कर्मकांड प्रत्येक समाजात प्रचलित केले, धर्माचे जे अंग जादू

टोण्याच्या आणि मंत्रतंत्रांच्या रूपाने प्रकट होत गेले, ती सर्व तत्कालीन समाजात बुद्धीने व कार्यक्षमतेने जे कोणी श्रेष्ठ होते त्यांनी, पंचमहाभूते आणि मानव यांच्यातील संबंध शोधून काढण्याचे जे प्रयत्न केले,त्यांची फलिते होत. मानवी मनात ज्या वासना व कामना प्रकट अथवा अप्रकटपणे वावरत असतात त्यांना सफल करण्याची युक्ती जादू टोण्यासारखे ग्राम्य आचार, यज्ञयागासारखे शिष्ट आचार आणि नामजपासारखे मृदु आचार माणसाला पुरवीत असतात. वशीकरण वाजीकरणाच्या मंत्रापासून ते यज्ञयागापर्यंतच्या सर्व क्रिया-कलापामधून, एकेका कालखंडातील मानवी समाजाची वाटचाल जशी समजून येते तशीच त्याची त्या काळातील संस्कृतीही ध्वनित होत असते. मला मिळणाऱ्या एखाद्या लग्न पत्रिकेवर मी जेव्हा "वेताळ शर्वाणी प्रसन्न" किंवा "म्हाळसा-खंडोबा प्रसन्न" अथवा "विठ्ठल रखुमाई प्रसन्न" असा मथळा वाचतो आणि आम्ही नोंदणी पद्धतीने विवाहबद्ध होत आहोत असे वाक्य दुसऱ्या लग्न पत्रिकेवर वाचतो तेव्हा वेताळ पूजा प्रचलित होती तेव्हापासून नोंदणी विवाहाच्या आजच्या काळापर्यंत पोचलेल्या मानवी समाजाचेच दर्शन मला घडत असते. आजच्या घडीला सुध्दा वेताळाचे स्मरण करून शुभकार्याचा प्रारंभ करणारे सुशिक्षित लोक आपल्या मित्रपरिवारातच आहेत ! ह्यावरून आपल्यामधील काही दैवते किती प्राचीन आहेत आणि ती सफारी पोशाख घालणाऱ्या आधुनिकातील आधुनिक व्यक्तींच्या अंतरंगातही कशी घट्ट रुतून बसलेली आहेत याचा बोध होऊन बुद्धिवादी विचारांचा प्रसार किती कठीण आहे, तेही अशा प्रसंगी लक्षात येते.

तेव्हा बुद्धिवाद्यांसमोरील आव्हान फार मोठे आहे आणि त्याच्यावर मात करताना स्वजनाशीच दोन हात करावे लागणार आहेत, याबद्दल शंकाच नाही. परंतु या क्षेत्रातील विजय जरी सहजसाध्य नसला तरी तो असाध्यही नाही. मात्र त्याकरता विचार आणि आचार ह्या दोन्ही आघाडया बुद्धिवाद्यांना सांभाळाव्या लागतील. बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा पक्ष मात्र बनवू नये. त्याचप्रमाणे महानुभावाप्रमाणे त्यांचा गुप्त पंथही बनू नये. त्यांचे आवार सर्वांना खुले राहावे व त्यांच्या सर्व चर्चा उघडया मैदानात व्हाव्या. कोणा व्यक्तीचे, ग्रंथाचे अथवा संघाचे दास्य बुद्धिवाद्यांनी कटाक्षाने टाळले पाहिजे. कारण विश्वाच्या पसाऱ्याप्रमाणेच तो शोधू पाहाणारा बुद्धिवादही अखंड आणि अनंत असावयास हवा.

***

साने गुरुजींच्या निधनानंतर लिहिलेला लेख

स्वप्न-भाषण

बिऱ्हाडाच्या दारात मी जेव्हा जेव्हा पाऊल टाकतो तेव्हा तेव्हा माझे डोळे तुमच्या त्या तसबिरीवर क्षणमात्र तरी विसावतातच. खोलीमध्ये दारासमोरच्या भिंतीवर तुमचे ते मध्यम आकाराचे छायाचित्र टांगलेले आहे. कोणत्या फोटोग्राफरने ते छायाचित्रण केलेले आहे, मला ठाऊक नाही. पण निःसंशय त्याने क्षण अगदी योग्य साधला आहे. ते तुमच्या पार्थिव देहाचे चित्रण आहे, असे वाटतच नाही. फोटोमध्ये तुमच्या अंगात सदरा आहे, डोक्यावर टोपी आहे. पण जगात वावरताना जिवाला देहाचा आश्रय करावा लागतो आणि देहाला वस्त्रप्रावरणांचा आश्रय करावा लागतो, म्हणूनच तो सदरा व ती टोपी छायाचित्रात दिसत आहेत. नाही तर ते छायाचित्र आहे तुमच्या मनाचे, नव्हे तुमच्या अंतःकरणाचे. डोळे टिपता टिपता हसणाऱ्या आणि हसता हसता डोळे टिपणाऱ्या तुमच्या मनाचे. अर्ध्या फुललेल्या, अर्ध्या घामाळलेल्या तुमच्या अंतःकरणाचे. कधी कधी बिऱ्हाडातले सगळे मित्र बाहेर गेले आणि बिऱ्हाडात मी एकटाच उरलो की मी तुमच्या त्या चित्राकडे पहात बसतो. मुंबईसारख्या उद्योगनगरीतली दुपारची शांतता ही एक मजेदार आणि सुखकारक गोष्ट आहे, नाही ? रात्रीच्या शांततेहून ऐन दुपारची शांतता हा एक वेगळाच अनुभव आहे. त्या वेळी सगळे काही डोळ्यांना स्पष्ट दिसत असते. आणि तरीही ते कसे स्वप्नवत वाटत असते. दुधात साखर मिसळावी किंवा त्याहीपेक्षा अधिक समर्पक उपमा द्यावयाची तर नदीच्या निर्मळ प्रवाहात दुपारचे ऊन विरघळावे त्याप्रमाणे शहराचा प्रचंड कोलाहल अखंड वाहणाऱ्या कालप्रवाहात बेमालूमपणे मिसळून ही शांतता निर्माण झालेली असते. त्यामुळेच की काय, तिला एक प्रकारची मुखरता प्राप्त होते. ऐन दुपारच्या वेळी नदीच्या प्रवाहात बुडी मारली म्हणजे तळाशी बसलेल्या दगड-शिंपा आपल्या डोळ्यांना दिसतात; कानांना प्रवाहाचा मंद आणि सनातन षड्‌जध्वनी ऐकू येतो. आणि नागडया अंगाला सगळीकडून पाण्याचा थंड पण उबदार असा स्पर्शही जाणवत असतो. तसाच अनुभव मला दुपारच्या शांत वेळी येतो. म्हणून दुपारची ही उबदार प्रकाशमय आणि मुखर शांतता मला प्रिय वाटते. डोळ्यांवर पेंगेची फुलपाखरे अलगद उतरलेली असतात, आणि वास्तव जगाचे बंध जरा जरा मोकळे करून मन अंतराळात पोहू लागलेले असते. जाणीव

आणि विस्मृती यांचे शुभ्र आणि श्यामल प्रवाह एकमेकाला खेटून वाहत असतात. त्यांचा एक मजेचा गोफ विणला जात असतो. इहलोकाच्या सीमा ओलांडून केव्हाच पलीकडे गेलेल्या सुहृदांना परत बोलावून त्यांच्याशी निर्भ्रांतपणे गप्पा माराव्याशा जर वाटत असतील तर सत्य आणि स्वप्न यांच्या सीमारेषेवर मन रेंगाळत असतानाच्या या वेळेसारखी दुसरी वेळ मिळणार नाही. जाणिवेच्या जान्हवीचे आणि विस्मृतीच्या कालिन्दीचे मिसळत असलेले पण अद्यापि एकजीव न झालेले प्रवाह कौतुकाने पाहत असता या वाळवंटावरून मी कधी कधी तुम्हाला साद घालतो.

हीच वेळ तुमच्याशी बोलत बसण्याची. वर आकाशामध्ये तारे कुडकुडत असताना रात्रीच्या काळोखातून तुम्ही जर माझ्याजवळ आलात तर मी तुमच्याशी बोलण्याच्या मन:स्थितीत तरी राहीन की नाही कोण जाणे ! माझ्या संवेदनशक्ती कदाचित तुमच्या दर्शनाने थिजून जातील. पण अशा दुपारच्या वेळी जर तुम्ही आलात तर माझे संज्ञाप्रवाह थिजणार नाहीत. उलट झुळूझुळू वाहू लागतील. मनाशी मी म्हणेन की, वर्षाऋतूच्या आरंभी दूर देशी गेलेला हा सान पक्षी आज किती तरी दिवसांनी आपल्या कोटरात परत आला आहे ! होय हे तुमचेच घरटे आहे. 'यत्र विश्वं भवत्येकनीडम्' अशा वृत्तीने तुम्ही जगाकडे पाहिलेत, ते तरी या घरटयात बसूनच ना ? दिवस-मास या घरटयाची एक एक काडी जरी गळून पडत आहे तरी हे तुमचेच घरटे म्हणून जग त्याला आज ओळखते आहे आणि शेवटपर्यंत ओळखील. ती पाहा दाराजवळ उन्हाची तिरपी चौकट उमटलेली आहे-जिच्यापाशी बसून तुमचे अखंड लेखन चालू असे आणि उंबरठयापलीकडचा तो कट्टा येथून स्पष्ट दिसतो आहे-ज्याच्यावर बसून तुम्ही सायंकाळच्या छायांकडे तासन् तास पाहत राहत असा.

पहा, जमुना-जान्हवीचा भुरा प्रवाह आता चांगलाच श्यामल झाला असून त्याच्या उदरातून पूर्व घटनांचे कळे वर येऊ लागलेले आहेत. १९३१ साली मी प्रथम तुम्हाला पनवेलीस पाहिले तेव्हापासूनच्या गेल्या अठरा वर्षांतल्या तुमच्या अनेक मूर्ती माझ्या डोळ्यांसमोर आकार घेत आहेत आणि विरून जात आहेत. तुमच्या बाह्य स्वरूपात या कालखंडामध्ये जरी फरक पडत गेला असला तरी तुमच्या मूळ प्रकृतीत फरक पडल्याचे मला कधी आढळले नाही. ते मौन, ते देह जाळीत राहिलेले दु:ख, ती सदा व्यथित दृष्टी; आणि नवीन पकडून आणलेला हरणाचा बछडा जरा कुठे खुट्ट झाले, जरा वारा निराळा आला तरी जसा चमकतो, बावरून जातो, तसे तुमचे ते वागणे. कोणत्या हिरव्या रानात निश्चिंत मनाने चरत

असताना तुम्हाला कोणी फासे टाकून पकडले आणि आमच्या या दुनियेत आणून सोडले ! म्हणूनच का तुम्ही सदैव कोठला तरी कानोसा घेत असल्याप्रमाणे वागत असा ?

पण तुमची ती वृत्ती पाहून मला तुमचा केव्हा केव्हा मनापासून राग येत असे. मी म्हणे, तुम्हाला किती सूक्ष्म, तरल आणि संवेदनाक्षम मन प्राप्त झालेले आहे ! सृष्टीमधल्या नानाविध वस्तू,नानाविध भावना, नानाविध संबंध यांचे रसग्रहण करण्यासाठी बुद्धीची विशेष प्रकारची पात्रता ज्याप्रमाणे हवी असते, त्याच-प्रमाणे त्या रसग्रहणाला शब्दाकार देण्यासाठी वाणीचीही विशेष प्रकारची पात्रता हवी असते. या दोन्ही पात्रता एकाच व्यक्तीच्या ठिकाणी क्वचित दिसून येतात. पण त्या ज्या वेळी एकत्र जमतात त्या वेळी महाकवीची सामग्री तयार झाली असे मानावयास हरकत नाही. अशी खरोखर दुर्मिळ, दसलाखांतून एखाद्याला मिळणारी सामग्री तुमच्या ठिकाणी जमून आलेली होती. पण त्यातून महाकाव्य जन्मास येऊ शकले नाही, याचे कारण काय ? तुमच्या मनाला ऐहिकापलीकडची लागलेली ओढ, हेच तर याचे कारण नसेल ? हे ऐहिक जग आपले नव्हे, इतकेच केवळ तुम्हाला वाटत नव्हते, तर या ऐहिकामधल्या एकूण एक व्यापारांना दोषाचा मळ चिकटलेला आहे, असे वाटून तुमचे मन अगदी विटून, उबगून जाई. शेवटी तर या उद्विग्नतेचा कहरच झालेला आम्ही पाहिला.

मी असे विचारतो की, या जगतामध्ये असे काय आहे की, ज्यासाठी मनुष्याने सदैव खंतच करीत राहावे ? या जगामध्ये प्रकाश आहे त्याचबरोबर अंधारही आहे. फुलासमवेत काटे आहेत आणि सज्जनांप्रमाणे दुर्जनही आहेत ही गोष्ट खरी. पण म्हणून आपले सगळे जीवन संघर्षमय करून टाकण्याची काही आवश्यकता आहे काय ? 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' ही तुकारामाची उक्ती मला रुचत नाही, पटत नाही. रात्रंदिवस युद्ध कोणाशी ? कशा करिता ? रात्रंदिवस युध्द ही कल्पनाच किती भयंकर आहे, नाही का ? रात्रंदिवस युद्ध याचा अर्थ असा की, तेथे उसंत नाही. त्यात वगळावगळ नाही, त्यात क्षमा नाही. राजकारणामधला एकसत्तावादाचा पुरस्कर्ता ज्याप्रमाणे सारे व्यवहार, साऱ्या प्रवृत्ती, साऱ्या भावना सारी साधने एका ध्येयाच्या सिद्धीसाठीच वापरतो त्याच जातीची ही तुम्हा ध्येयवाद्यांची आणि ब्रह्मवाद्यांचीही वृत्ती नव्हे काय ? एक गोष्ट मी मान्य करतो ती ही की, ब्रह्मवाद्याची समरभूमी म्हणजे त्याचे स्वत:चे मनच असते. कदाचित तिची व्याप्ती त्याच्या आप्तेष्टांपर्यंत किंवा कुटुंबापर्यंत असेल; पण त्यापलीकडे तो कोणाशी सहसा झगडत नसल्याकारणाने राजकीय एकसत्तावाद्यांसारखा तो सर्व विरोधी भावनांचा

व व्यक्तींचा काळ बनत नाही. पण तरीही त्याच्या संघर्षातील उग्रता कमी समजण्याचे कारण नाही.

या अखंड युद्धामध्ये इंद्रिये आणि आत्मा हे परस्परविरोधी पक्ष मानले गेल्याकारणाने इंद्रियजन्य अथवा इंद्रियद्वारा प्राप्त होणाऱ्या सुखद अथवा दु:खद अनुभवांना तुमच्यासारख्यांच्या जीवनामध्ये योग्य स्थान तरी कोठून मिळणार? स्पर्श, रुची, गंध आदिकरून संवेदनांमध्ये खरोखर किती प्रकार आहेत? वाईट आणि चांगले एवढे दोनच प्रकार त्यांमध्ये असतात असे नव्हे. स्पर्श म्हटला की मऊ अथवा खरबरीत, थंड अथवा उष्ण इतकेच भेद त्यामध्ये नसतात. एका मऊपणात किती किती प्रकार आणि त्यात पुन्हा किती प्रती लावता येतील. फुलाच्या पाकळीचा मऊपणा निराळा, शहामृगाच्या पिसाचा मऊपणा निराळा, समुद्राच्या वाळूचा मऊपणा निराळा, बालकाच्या देहाचा मऊपणा निराळा आणि युवतीच्या अवयवांचा मऊपणा निराळा. जी गोष्ट स्पर्शसंवेदनांची तीच रुचिसंवेदनेची. कडू अथवा गोड एवढेच भेद रुचीमध्ये नाहीत. तिच्यात अनंत भेद आहेत. कटुतेत गोडी आणि गोडीत कटुता येथपर्यंत ते भेद पाडता येतात. ज्या विषयाची रुची चाखावयाची त्याच्या अंगच्या रुचीतील भेदामुळे प्रकार निर्माण होतील हे तर काहीच नव्हे. रुची घेणाऱ्यांतील म्हणजे भोक्त्यांतील भेदानुसार रुचीमध्ये प्रकार मानावे लागतात. अपत्याचे चुंबन घेणारी आई आणि रमणीचे अधरपान करणारा प्रियकर यांच्या आस्वादाचा विषय जरी ओठ हाच असला आणि दोघांच्याही आस्वादाचे माध्यम जरी चुंबन हेच असले तरी ह्या दोन चुंबनांची रुची फार वेगळी आहे हे सांगण्याची गरजच नाही. स्वर आणि शब्द यांच्या संवेदनांबद्दलही असेच म्हणता येईल आणि या संवेदनांचे जसजसे मिश्रण होत जाईल, तसतसे तर त्यांच्यामध्ये इतके स्वादवैचित्र्य निर्माण होत जाते की पुसता सोय नाही.

पण तुमच्या सारख्यांना मनाच्या या स्वादक्षमतेची भीतीच वाटत असावी. त्यामुळे तुमची मने स्वादपराङ्मुख बनत जातात किंवा कोठल्यातरी एकाच स्वादाची भक्त बनतात. व्यक्तित्वाचे रसग्रहण करतानासुध्दा तुम्हांला त्यातले वैचित्र्य उपभोगता येत नाही. कारण तुम्हांला मानवामानवांमधला जणू एकच भावबन्ध मान्य असतो, तो भावबंध म्हणजे प्रेमाचा; आणि प्रेमामधलीसुध्दा एकच छटा मान्य होते, ती म्हणजे वात्सल्याची. तुमच्या मनाच्या ह्या एकारलेल्या घडणीमुळे असे झाले की, तुमच्या वाङ्मयातील साऱ्या पात्रांवर व प्रसंगांवर एकाच रंगाची डूब चढली. वाङ्मयाला महत्ता प्राप्त होण्यासाठी सृष्टीमधल्या अपार वैचित्र्याचे प्रतिबिंब जे त्यामध्ये उतरावयास हवे तेच नेमके उतरले नाही. लांबी, रुंदी व उंची

या त्रिप्रमाणामुळे वस्तूला ज्याप्रमाणे सघनत्व प्राप्त होते, त्याप्रमाणे वास्तवता, वैविध्य व आशय या त्रिप्रमाणामुळे वाङ्मयाला घनत्व प्राप्त होते. पण तुमच्या सर्व कृतींना ही तिन्ही प्रमाणे प्राप्त होण्याऐवजी त्यानी तुमच्या मनातील आशयाचे एकमेव प्रमाण प्राप्त होत गेले आणि तुमच्या कृतींना प्रचाराचा म्हणजे सगळ्यांमध्ये एकच रस पाहण्याच्या व सगळ्यांना एकाच वृत्तीचे बनविण्याच्या प्रयत्नांचा वास लागून त्या कृतींत न्यून निर्माण झाले.

आपल्या ठिकाणचे मोठयातले मोठे असे जे लेखणीचे व वाणीचे सामर्थ्य ते निष्परिणामी ठरत आहे हे पाहून तुम्ही अधिकच कष्टी झालात काय ? पण तुम्हांला जर मानवी जगाचा कंटाळा आलेला होता तर तुमच्या मनाला एवढी खंत का वाटावी ? जे कटू आहे ते न का होईना मिष्ट ? जे वक्र आहे ते न का होईना सरळ ? जे दुष्ट आहे ते न का होईना सुष्ट ? आपण आपल्याकडून प्रयत्न करावयाचा तो केलात ना ? करीत होतात ना ? मग 'फले स्पृहा' कशाकरिता होती ? आपल्या शक्तीतली एक एक समिधा जीवनयज्ञात तुम्ही टाकीत होता यात शंका नाही. पण ती समर्पण करीत असताना मनाला जी अविचल स्थिरता व निरामय आनंद प्राप्त व्हावयास हवा, तो का बरे तुम्हांला मिळाला नाही ? इंद्रियांच्या द्वारा ऐहिक जगाचा उपभोगही तुम्ही घेतला नाही आणि इंद्रियदमन करून ऐहिक जगाची सेवा करताना खऱ्या निवृत्ताला साजेशी 'मा फलेषु' ची भूमिकाही तुम्हांला साधली नाही. त्यामुळे तुमच्या मनाची तगमग होत राहिली, कर्तव्ययज्ञ चालू राहिला; पण अखेरपर्यंत प्रसन्नतेचे पायस तुम्हांला लाभले नाही.

साधकांच्या आयुष्यातील ट्रॅजेडी यातच आहे. तुमच्यासारखे जे साधक आहेत, त्यांना आमच्यासारखे जडांचे समाधान तर मिळत नाहीच. कारण तुमच्या संवेदना अति सूक्ष्म, नाजूक आणि चोखंदळ असतात, पण त्या संवेदनांमुळे मनात उठणारे कल्लोळ प्रसन्न दृष्टीने पाहता यावे यासाठी जी बैठक साध्य करून घ्यावी लागते, तीही तुम्हाला प्राप्त झालेली नसते. रोकडया व्यवहारवाद्यांसारखेही तुम्ही वागत नाही, स्थिरप्रज्ञाप्रमाणे संपूर्णतया समर्पण बुद्धीनेही नाही. मार्गावरचे काटे दूर करता करता तुमचे हात रक्तबंबाळ झाले, पण काटे सरत ना आणि तुमच्याने थांबणे होई ना...

पण एवढी ही तळमळ तुमच्या देहपाताबरोबर शमली असेल असे कबूल करण्यास माझे मन तयार होत नाही. पणती फुटली, दिवा विझला. हा न्याय तुमच्यासारख्यांच्या बाबतीत मान्य करणे मला जड वाटू लागले आहे. तेल संपले म्हणून विझतात ते दिवे निराळे आणि फुंकर मारून जे घालविण्यात येतात ते दिवे

निराळे ! अशा बळेच विझलेल्या शक्तींचे अवशेष कोठेतरी राहात असावेत. राहतील तर बरे असे मनाला वाटते, एवढी गोष्ट खरी. त्यामुळेच तुमचे ते छायाचित्र पाहिले आणि अशी निवांत वेळ मिळाली की तुम्हांला बोलावून घेण्याचा मोह मनाला पडतो. असे वाटते की, तुमच्या ओठावरचे ते रडवेले हसू जरा अधिक प्रकट व्हावे आणि आईच्या हातासारख्या तुमच्या त्या खरबरीत मऊ हातांनी माझा हात एक वेळ तरी पुन्हा दाबला जावा....

***

शहाबानू : सूक्ष्म क्रांतिकारक !

बैठकीच्या खोलीत मी प्रवेश करताच, प्रमिला मला म्हणाली- 'नानासाहेब, अलिकडे ज्यांचे नाव सगळीकडे गाजते आहे, त्या या शहाबानू, इंदूरच्या.'

मी पाहिले तर माझ्या समोर कोचावर एक वृद्धा बसलेली होती. डोक्यावरच्या बहुतेक बटा पांढऱ्या झालेल्या, मुखावर म्हातारपणाच्या खुणा. पण नाक तरतरीत आणि काजळ घातलेल्या डोळ्यांतील नजर अभिमानी पण अदबीची. अंगावर रेशमी सलवार कमीज व दुपट्टा. बरोबर एक नातवंड. मी मनात म्हटले ह्या शहाबानू तर. मूर्ती लहान पण कीर्ती थोर. त्या भेटल्यामुळे मला आनंद वाटला.

अशी रुढीची बंधने तोडणारी माणसे भेटली की मला नेहमी आनंद होतो. आपल्या समाजाचा इतिहास म्हणजे रुढींच्या ओझ्याखाली पार दुमडून गेलेल्या समाजाचा इतिहास. बंधनावर बंधने, बंधनावर बंधने. रुढीच्या ह्या काळसर्पांनी आपला वेटाळून टाकलेला समाज पाहिला की मला वाटते की या विळख्यात गुदमरलेल्या या समाजपुरुषाला कोणता पुरूषार्थ साधता येणार ? त्याचे सगळेच अवयव जखडलेले ! म्हणून त्यातले एखादे वेटाळे जरी कोणी सैल केले तरी मला समाधान वाटते. शहाबानूच्या हातून एक मोठे वेटाळे उखडले गेले आहे आणि ते देखील आरडाओरडा, दणदणाट न करता. त्यांना भेटून मला विशेष आनंद झाला तो यामुळे.

पंजाब करार, आसाम समझोता अशासारख्या घटना घडल्या की त्यांनी निर्माण केलेल्या लाटा सर्व देशभर पसरतात. सगळ्यांना जाणवते की राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहाने एक नवे वळण घेतले आहे. या घटनांमध्ये मोठे जनसमुदाय अन्तर्भूत झालेले असतात. त्यांची उग्र आंदोलने चालू असतात, शेकडो लोकांचे रक्त सांडते, कुटुंबे उध्वस्त होतात.त्यामुळे त्या घटनापर्वाचा जेव्हा शेवट होतो तेव्हा तो लोकांच्या नजरेत सहजासहजी भरावा हे साहजिक आहे.

पण राष्ट्रजीवनातल्या सर्व प्रवाहांचे रूप इतके स्थूल नसते. त्यापैकी काही प्रवाह तर अगदी सूक्ष्म रेखामात्र असतात. परंतु त्यातून निर्माण होणारी ऊर्जाशक्ती इतकी प्रचंड असते की ती मानवी जीवनाचा एक संपूर्ण थर उलटून टाकू शकते. इंदूर येथील शहाबानूंच्या पोटगीविषयी सर्वोच्च न्यायालयाने अलिकडे दिलेला निर्णय माझ्या दृष्टीने हा सूक्ष्म स्फोटकाप्रमाणे आहे.

एका परित्यक्त स्त्रीच्या पोटगीची रक्कम सर्वोच्च न्यायालयाने १७९ रुपयावरून ५०० रुपयापर्यंत वाढवून दिली ही घटना तसे पाहू गेले तर मामुलीच नव्हे का ? पण त्यामुळे आमचे सर्व भारतीय मुस्लिम बांधव इतके हादरुन गेले की जणू कोठे आठ नऊ रिश्तर प्रमाणातला कंप होऊन इस्लामची सर्व इमारत कोसळून पडली आहे ! खुद्द शहाबानूवर कशा प्रकारचे दडपण या धास्तावलेल्या मंडळीकडून आणण्यात येत आहे ते त्यांच्या पुढे दिलेल्या मुलाखतीवरून दिसून येईल. पण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे असे काय अघटित घडले आहे ? या प्रश्नाचे उत्तर दोन प्रकारे देता येईल : एक असे की अघटित असे काहीच घडलेले नाही आणि दुसरे असे की फार मोठे अघटित घडलेले आहे. इस्लामने तलाक दिलेल्या स्त्रियांना अमुक इतकी पोटगी अमुक कालापर्यंत द्यावी असे सांगितलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने जर असे म्हटले की याहून अधिक पोटगी अधिक काळपर्यंत देऊ नये असा या वचनाचा अर्थ न लावता इतके तरी किमान काळपर्यंत द्यावे असा जर लावला आणि तलाक देणाऱ्या पुरुषाची कमाई लक्षात घेऊन पोटगीचा आकार व काळ जर वाढवला तर त्यात निषिद्ध ते काय ? तहानलेल्याला ओंजळभर पाणी पाजा अशी जर धर्माज्ञा असेल तर ओंजळभरच पाणी द्या असा तिचा अर्थ करायचा आणि कोणी गडवाभर दिले तर ते निषिद्ध ठरवायचे, की ते धर्म विहितच मानायचे असा हा साधा सरळ प्रश्न आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने तसाच अर्थ लावला आहे. पण इस्लाममधील कट्टर पंथीयांचे म्हणणे असे की ओंजळभर म्हणजे ओंज़ळभरच त्यात अणुमात्र जास्तकमी करण्याचा हक्क न्यायालयाला नाही. त्यातून येथे जर इस्लामी राज्य असते आणि इस्लामी न्यायालय असते तर काही वेगळा विचार क्षम्य समजता आला असता. पण येथे तर सर्व काफिरांचा मामला. त्यांना कुराणांचा उदार अर्थ लावण्याचासुध्दा अधिकार असता कामा नये. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो त्याचे काय ? ह्या निकालामुळे भयंकर असे काही तरी घडलेले आहे असे जे मानतात त्या मुस्लिमांचा युक्तिवाद हा असा असतो. आपण जर ह्या कट्टर मंडळींना विचारायला गेलो की चीनमध्ये व रशियामध्ये क्रोडो मुसलमान आहेत ते कोणत्या कायद्याप्रमाणे राहातात. त्यांचा शरीयतचा आग्रह तेथे कोणी चालू देईल काय ? तर त्यावर त्याचे उत्तर असे की तेथे बोलून चालून हुकुमशाहीच आहे. म्हणजे जेथे हुकूमशाही आहे तेथे शासनाने काही केले तरी चालते. इंडोनेशिया, इजिप्त, मलेशिया अशा देशांत मुस्लिम राज्ये असल्यामुळे त्यांनी शरियतमध्ये काही फेरफार केला अथवा त्याचा वेगळा अर्थ लावला तरी चालते. पण भारतामध्ये लोकशाही आहे आणि म्हणूनच

येथील शासनाला अथवा न्यायालयाला आमच्या कायद्यात कोणताच फेरफार-उदार फेरफारसुध्दा, करता येणार नाही.

तेराशे वर्षांपूर्वीच्या अथवा त्यापूर्वीच्या विचार-कवचीत राहाण्याचा आग्रह माणसे किंवा समाज का धरतात या प्रश्नाचे उत्तर मला सापडू शकलेले नाही. सत्यस्थिती पाहू गेले तर असे दिसते की त्या काळचे सर्व विधिनिषेध पाळले जात नसतात. पावलापावलागणिक त्यांचे उल्लंघन चालू असते. किंबहुना ते विधिनिषेध धर्माचे नाव न घेता जे आचरतात त्याची हेटाळणी करण्यात येते, त्यांना जुनेपुराणे मानण्यात येते. कवच्यातला मगज खुशाल फेकून देण्यात येतो पण कवच मात्र मोठया सावधगिरीने जपले जाते. असे का व्हावे ? सत्यनारायणाची महापूजा बांधण्यातला समाजकंटकांचा उत्साह कोणी पाहिलेला नाही ! अशा उत्साही धर्मवेडयाविरूद्ध शहाबानूसारख्या स्त्री-पुरुषांना झगडावे लागते. अनेकदा असे घडते की या प्रकारच्या झगडयात बहुधा असत्याचा, कांगावखोरांचा आणि धर्मपुंडांचाच विजय होतो. वैचारिक मगजाला गुदमरवून टाकण्यात रूढीचे कवच विजयी झाल्याचे अनेक दाखले इतिहासात सापडतात. क्वचित एखाद्या प्रसंगी अशा घटना घडून येतात, की जेथे व्यक्तीला न्यायासनाचे पाठबळ मिळते व शासनाचेही मिळते तेथे समाजाभोवती पडलेल्या ह्या वेटाळ्यातली पाच दहा वेटाळी एकदम गळून पडतात. ज्या शहाबानूमुळे मुस्लिम स्त्रियांच्या मुक्तीचा एक महत्त्वाचा टप्पा चटकन पार पडला आहे त्यांची मुलाखतच मी पेट्रिअटमधून उद्धृत करतो म्हणजे झाले.

प्रश्न : तुमचा विवाह, तुमचा तलाक आणि तुम्ही पोटगी संबंधी लावलेली फिर्याद या संबंधीची पार्श्वभूमी तुम्ही आम्हाला सांगता का ?

उत्तर : तुम्ही या क्रमात जरासे चुकता आहात. माझ्या पतीने मला तलाक देण्यापूर्वी मी पोटगीसाठी न्यायालयात गेले होते. माझे लग्न १९३४ मध्ये झाले. १९४६ पर्यंत घर सुरळीत चालू होते. नंतर गडबडीची चाहूल कानावर येऊ लागली. माझ्या पतीने सवत घरात आणली. १९७४ पर्यंत आम्ही एकाच घरात राहात होतो नंतर माझ्या सवतीने माझ्या पतीला मला घराबाहेर काढावयास प्रवृत्त केले. त्याच मोहल्ल्यातील एका छोटया घरात आम्ही बिऱ्हाड हालवले. माझे पती हजारो रुपये कमवीत पण त्यांनी मला मासिक २०० रुपयांची पोटगी सुरू केली.

मी आणि माझे मुलगे तेवढया पोटगीत कसेबसे गाडे रेटीत होतो. तेवढयात माझ्या पतीने ती रक्कम देण्याचेही बंद केले. सवतीने कळ लावल्यामुळे माझ्या पतीचे व माझे संबंध बिनसले होते. मनात म्हटले क्षणभर रागावले असतील, त्यांचे

मन बदलेल, त्या आशेवर आम्ही बराच काळ जगलो. पण सुधारणेचे कुठलेच चिन्ह दिसेना तेव्हा मी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचे ठरवले.

प्रश्न : न्यायालयात जाण्याचा निर्णय तुम्ही स्वत: घेतला की तुमच्या मुलांनी तुम्हाला प्रवृत्त केले ?

उत्तर : दुसऱ्याची मदत कशाला ? माझा हक्क तुडवला गेला होता, म्हणून मीच ठरवले.

प्रश्न : तुम्हाला खूप अडचणी आल्या असतील, नाही ? त्यांच्याबद्दल थोडे सांगाल ?

उत्तर : माझे पती खानसाहेब मोठया लौकिकाचे होते, सर्वश्रेष्ठ न्यायालयाचे ते वकील. सुरवातीला त्यांच्या विरुद्ध माझ्या बाजूने उभे राहण्यास कोणी तयार होईना. शेवटी सिराज अख्बर मियानी माझी बाजू स्वीकारली. १९७० मध्ये खालच्या कोर्टाने निकाल दिला की मला २५ रुपयांची मासिक पोटगी मिळावी. खानसाहेबांनी कोर्टात सांगितले होते की आपले दागदागिने घेऊन मी घर सोडलेले आहे. त्या दागदागिन्यांचे मला व्याजापोटी दरमहा १५० रुपये मिळतील असे कोर्टाने आपल्या निकालात म्हटले होते. पण दागदागिने माझ्यापाशी होते कुठे ! ते होते खानसाहेबांच्या नावावर बँकेच्या तिजोरीत. म्हणून आम्ही हायकोर्टाकडे धाव घेतली. हायकोर्टाने मला मासिक १७९.२० रुपयांची पोटगी मंजूर केली. पुढे तीन महिन्यांच्या आत खानसाहेबांनी सर्वश्रेष्ठ न्यायालयाकडे अर्ज केला की हायकोर्टाचा हा निर्णय मुस्लिम कायद्याच्या विरुद्ध जाणारा आहे. ही मुस्लिम कायद्यात ढवळाढवळ (दखल अंदाजी) आहे असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. पण न्यायालयाने माझ्या बाजूचा निकाल देऊन माझी पोटगी ५०० रुपये ठरवली.

प्रश्न: बनातवाला आणि सुलैमान यासारख्या मुस्लिम नेत्यांनी या निर्णयावर झोड उठवली आहे की हा मुस्लिमांच्या खाजगत कायद्यात हस्तक्षेप आहे. ते म्हणतात की इस्लामी कायद्यानुसार "इद्दत" ची मुदत संपल्यावर मुसलमान स्त्रीचा संभाळ तिच्या आईबापांनी, चुलत्यांनी, मामांनी आणि इतर नातलगांनी करायचा असतो. या टीकेला तुम्ही काय उत्तर देणार ?

उत्तर : सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा पवित्र कुराणाचाच आधार घेतला होता ना ? त्यांनी कुराणाचाच उल्लेख केलेला नाही काय ? २४१ वी आयत त्यांनी आधारभूत मानलेली असून अशी पोटगी मिळणे हा घटस्फोटित पत्नीचा अधिकार मानलेला आहे.

प्रश्न : संसदेच्या बहुतेक मुसलमान सदस्यांनी या निर्णयाला आपला विरोध दर्शवलेला आहे. क्रिमिनल प्रोसिजर कोड बदलण्यात यावी अशी त्यांनी मागणी केली आहे.

उत्तर : मी एक विचारते की हे लोक कुराणशरीफचा दाखला देतात ना ? मग याच्या व्यतिरिक्त कुराणात कितीतरी गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यांचे काय ? पुरुष ज्या वेळी दुसरी बायको करतो त्यावेळी त्याच्यासाठी ज्या कडक अटी घातलेल्या आहेत त्यांचे काय ? अशा पुरुषाने दोन्ही बायकांना समान वागणूक दिली पाहिजे अशी स्पष्ट मर्यादा घातलेली आहे. एका पत्नीला जर काही कपडे दिले तर तेवढे, त्या दर्जाचे कपडे दुसऱ्या पत्नीला द्यावयाला हवे. त्या नियमाचे पालन होते की नाही इकडे कितीजण लक्ष देतात. न्यायालयाचा हा निर्णय तेवढा त्यांना कुराणाला सोडून दिसतो.

न्यायालयाचा निकाल जाहीर झाल्यापासून माझ्यावर असे दबाव आणण्यात येत आहेत की हा निर्णय इस्लामवर आक्रमण आहे असे निवेदन मी द्यावे ! कबरस्तानाकडची अर्धी वाट मी चालून आलेली असता मी जर असे निवेदन दिले तर माझी धर्मरक्षक म्हणून जगभर कीर्ती होईल असेही मला सांगण्यात येते. पण मी काय म्हणून हे मानू ? मी संकटात सापडले होते तेव्हा हे थोर लोक कुठे दडले होते ?

प्रश्न : संसदेच्या ज्या मुसलमान स्त्रीसदस्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवला आहे त्यांच्याविषयी तुमचे काय म्हणणे ? नजमा हेपतुल्ला आणि बेगम अबीदा अहमद पंतप्रधानांकडे या निर्णयाच्या विरुद्ध शिष्टमंडळ घेऊन गेल्या होत्या ना ?

उत्तर : भिताहेत आपल्या पतिदेवाना. भिताहेत की निवडणुकीत मते मिळणार नाहीत म्हणून.

प्रश्न : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा परिणाम काय होईल याची कल्पना आहे का तुम्हाला ?

उत्तर : कां नाही ? निर्णयामुळे माझ्या ज्या भगिनी आहेत त्यांना असा अन्याय सोसावा लागणार नाही आणि बायकोला तलाक देण्यापूर्वी नवरेही विचार करतील. या आधी त्यांना असा काही विचार करण्याची गरज भासत नसे. शिवाय यानंतर नवरे बायकांना अधिक आदराने वागवतील.

प्रश्न : आपण राजीव गांधीना मंगळवारी भेटलात. आपल्याला ते काय म्हणाले ?

उत्तर : भला माणूस आहे तो. माझ्यावर येणाऱ्या दडपणापासून माझे रक्षण करण्याचे आश्वासन त्यांनी मला दिले.

प्रश्न : आता शेवटचा प्रश्न. या निर्णयामुळे मुस्लिम स्त्रियांसमोर उभ्या असलेल्या समस्येतील एक समस्या दूर झाली. पण अजून कितीतरी बाकी असतील. त्या दूर व्हाव्यात म्हणून आपण काही करणार का ? आपल्या अधिकारासाठी त्याना उभे राहाता यावे म्हणून त्यांची संघटना बांधणार का ?

उत्तर : माझे आता वय झाले. माझी प्रकृतीही चांगली रहात नाही. पण मी शक्य तेवढे करीन. प्रारंभ म्हणून मी इंदूरला परतले की सगळ्या तलाकपीडित स्त्रियांना संघटित करून त्यांना न्याय मिळतो असे पाहीन. नंतर इतर समस्यांना हात घालण्यासाठी संघटना बांधीन. काही सुशिक्षित धडाडीच्या तरुणी मला मदतीला हव्या. हळूहळू ही चळवळ इंदूरातून बाहेर पडावी आणि देशभर पसरावी, असा माझा प्रयत्न असेल. सध्याच्या पुरुषप्रधान समाजात अजून पुष्कळ काही घडायला हवे आहे. बायकांना स्वत:चे मन उघडे करण्याची तरी मोकळीक हवी. हा निर्णयच घ्या. बहुतेक सर्व मुसलमान त्याच्या विरोधात आहेत असे म्हटले जाते. पण मला ठाऊक आहे की बहुतेक मुसलमान स्त्रियांना बरे वाटले आहे. पण त्यापैकी कितीजणींची पुढे येऊन आपला विचार बोलून दाखविण्याची हिंमत आहे ? मूठभर माणसे ह्या निकालाच्या विरुध्द आहेत पण ती आरडाओरड करणारी आहेत. खेदाची गोष्ट म्हणजे हा निर्णय इस्लाम विरोधी आहे असा लोकांमध्ये गैरसमज पसरण्यासाठी मुल्ला मंडळी मशिदीमधून प्रचार करू लागली आहेत.

अशी ही शहाबानूंची मुलाखत तेरा शतकाहून अधिक काल चालत आलेल्या परंपरेला एक प्रकारे आव्हान देणारी. पोटगी नाकारणाऱ्या खानसाहेबांचे मत भारतातील मुसलमान स्वीकारणार की न्यायासाठी उभ्या राहिलेल्या शहाबानूंचे ?

***

हिंसा युग आणि शास्त्रज्ञ

आपल्याकडील पारंपारिक समजुतीप्रमाणे सध्या चालू असलेले युग कलि-युग आहे. आपली अशी समजूत आहे की, कलियुगामध्ये सर्व प्रकारचा अनाचर सर्वत्र माजेल; रक्ताचे पाट वाहतील आणि पराकाष्ठेची अनागोंदी निर्माण होऊन माणसे हैराण होऊन जातील. या सर्व अपप्रवृत्तींची परिसीमा झाली म्हणजे ईश्वर कलंकीच्या रुपाने अवतीर्ण होऊन परत भूमीवर सत्ययुग अवतरेल. अशा भवि-ष्यामध्ये निश्चित असे काहीच नसते. म्हणजे या आतंकापासून वाचविणारा ईश्वरी अवतार केव्हा प्रकट होणार, याचा जो तपशील दिलेला असतो, तो वाचताक्षणीच असे वाटते की काहीतरी मनास आले ते आकडे दिलेले आहेत आणि माणसाच्या मनाला धीर यावा म्हणून ईश्वरी अवतार होणार, असे आश्वासन दिले आहे.

ते काही असो, चौफेर नजर टाकल्यावर एक विलक्षण दृश्य आपणाला दिसते, यात शंका नाही. एका बाजूला पहावे, तर विज्ञानाची प्रगती सर्वच बाजूंनी इतक्या झपाट्याने होत आहे की कालचे जग आज नाही आणि आजचे उद्या दिसेलच अशी खात्री देता येत नाही. शेती, उद्योग, दळणवळण, व्यापार, शिक्षण, आरोग्य, इत्यादी क्षेत्रामध्ये विज्ञानाच्या बळावर माणसाच्या हाती एवढे सामर्थ्य आले आहे की कोणालाही हालअपेष्टात जीवन कंठण्याचे कारण उरलेले नाही. सर्वच देशांतून माणसाची आयुर्मर्यादा वाढलेली आहे. एका क्षणात आपण पृथ्वीच्या दुसऱ्या टोकाला असणाऱ्या माणसाशी बोलू शकतो, विचारविनिमय करू शकतो. आता मनुष्य महासागराच्या तळापासून अंतराळापर्यंत मनास येईल तसे भ्रमण करू शकतो आणि मनुष्याच्या जन्मकुंडलीत जेवढे ग्रह दाखवले आहेत तेवढया सर्वांची छायाचित्रे तर त्याला घेता येतातच, परंतु त्यांपैकी काही ग्रहांवर तो उतरूही शकतो.

पण चालू युगाचे हे लोभसवाणे चित्र पाहतापाहता विरून जाते आणि त्याऐवजी आपल्या नजरेसमोर अंध तमसाची एक भयाणअमावास्या दिसू लागते. तिच्या प्रदेशात शिरले की उसासे, यातना, किंकाळ्या अश्रू आणि रक्तपात यांचा एकच रेंदा झालेला आहे आणि माणसे श्वापदापेक्षा कितीतरी अधिक पटीने क्रूर बनली असून ती एकमेकांना फाडून खात आहेत, अशी दृश्ये दिसू लागतात. मनाला अशी शंका वाटू लागते की, या काळरात्रीमध्ये आपणही बदलून जाऊ, आपल्या-

लाही खून चढेल. महाभारतात, द्वारकेच्या अस्तकाळी यादवी माजली असताना एका यादवाने हातात गवताचे पाते जरी घेतले तरी त्याचे शस्त्र बने आणि ते दुसऱ्या यादवाचा नि:पात करी असे वर्णन वाचावयाला मिळते. पुन्हा लवकरच तशी वेळ येणार की काय, अशा शंकेने मन खचून जाते. मनुष्य कोणत्या वाटेने सुसाट निघाला आहे व तो शेवटी कोठे पोचणार आहे, याचा मनाला थांगपत्ता लागेनासा होतो.

हा विचार माझ्या मनात आला, तो गेल्या आठवडयात ६ ऑगस्टच्या दिवशी. बरोबर ४० वर्षांपूर्वी याच दिवशी सकाळी सव्वा आठ वाजता हिरोशिमावर अमेरिकेच्या एका लष्करी विमानाने अणुबाँब टाकला. त्याचा स्फोट होताच 'दिवि सूर्यसहस्त्रस्य भवेत् युगपदुत्थिता' अशी प्रभा सर्वत्र पसरली आणि एका क्षणात त्या २ लाखाच्या शहराचे मसणवटीत रुपांतर झाले. हा बाँब युरेनियम २३५ या द्रव्यापासून बनविलेला होता. त्यानंतर तीन दिवसांनी जपानमधील दुसऱ्या एका शहरावर म्हणजे नागासाकीवर दुसरा अणुबाँब टाकण्यात आला आणि तेथेही हिरोशिमाची पुनरावृत्ती झाली. प्लुटोनियम २३९ या द्रव्याचा तो बाँब बनविलेला होता. क्षणार्धात शहरेच्या शहरे बेचिराख़ होत आहेत हे पाहिल्यावर जपानच्या बादशहाने लष्कराला शरणागती स्वीकारण्याचाच आदेश दिला. जपान दीनवाणा झाला आणि दोस्त राष्ट्रांना विजयोन्माद चढला. पण ज्या शास्त्रज्ञांनी या संहारक शस्त्राची निर्मिती शक्य केली, ते मात्र मनात चरकले. ओपनहॅमरसारखा अणुशास्त्रज्ञ उघडपणे म्हणाला की अणुशक्ती आम्ही अशाप्रकारे विकसित करायला नको होती. परंतु त्या काळी विज्ञान क्षेत्रात केवळ हिमालयच मानला गेलेला जो अल्बर्ट आईन्स्टाईन यानेच तर अमेरिकेचा अध्यक्ष रुझवेल्ट याला पत्र लिहून, अणुशस्त्र बनविण्याची विनंती केली होती. कारण त्याला भीती वाटत होती की अमेरिकेने त्वरा करून जर हे अस्त्र निर्माण करण्यात आघाडी मारली नाही, तर जर्मनी ते तयार करील आणि एवढे संहारक अस्त्र जर हिटलरसारख्या माथेफिरूच्या हाती गेले, तर तो त्याचा कसा वापर करील ? किंबहुना त्याचा वापर करून तो सर्व जगाला आपले गुलाम करील, असेच त्यांना वाटले होते. शास्त्रज्ञांना असे का वाटले ?

अणुशस्त्र निर्मितीची बहुतेक सर्व वैज्ञानिक सामुग्री सिद्ध करणाऱ्या वैज्ञानिकांपैकी एकाददुसरा अपवाद वगळता बाकीचे वैज्ञानिक ज्यू होते हे त्या भीतीचे कारण. त्यांना हिटलरबद्दल घृणा वाटावी, हे साहजिकच म्हटले पाहिजे. आईन्स्टाईनने अध्यक्ष रुझवेल्ट यांना जे पत्र लिहिले ते या प्रामाणिक समजुतीने की फॅसिस्ट हिटलरच्याऐवजी लोकसत्तावादी रुझवेल्टच्या अमेरिकेने किंवा चर्चिलच्या इंग्लंडने जर अणुबाँब बनवला, तर त्याचा गैरवापर होणार नाही. त्या बिचाऱ्या

वैज्ञानिकांना हे समजले नाही की कोणतेही शस्त्र असो की अस्त्र, ते एकदा सिद्ध झाल्यावर त्याचा उपयोग कसा करावा, कोठे करावा हे ठरवण्याची सत्ता आपल्या हाती रहात नाही तर ती राजकारण्यांच्या आणि सेनापतींच्या हाती जाते. अणुबाँबच्या बाबतीतही हाच प्रकार घडलेला आहे. लक्षात ठेवायची गोष्ट अशी की, अमेरिकेमध्ये ज्यावेळी अणुबाँब बनविण्याचे प्रयत्न चालू होते, त्यावेळी जर्मनी किंवा जपान स्वस्थ बसलेले होते असे दिसत नाही. माणसांना हजारोंच्या संख्येने कसे मारता येईल, याबद्दल त्यांचेही संशोधन दुसरीकडे सुरु होतेच. जर्मन शास्त्रज्ञ डॉ. मेंडले याने ऑस्विच येथील ज्यू कैद्यांवर जे अमानुष प्रयोग चालविले होते, त्यांचा जगभर फार मोठा गवगवा झाला आणि दोन महिन्यापूर्वी दक्षिण अमेरिकेत दडून बसलेला डॉ. मेंडले वारल्याची बातमी प्रसिध्द झाली, तेव्हा सर्व जगात तो एक चर्चेचा विषय होऊन राहिला. दुसऱ्या महायुद्धकाळातल्या ज्यू कैद्यांच्या या छावण्या अजूनही आपणास पहावयास मिळतात आणि तेथे बळी गेलेल्या आबालवृद्धांचे अवशेष पाहून आपले मन उदास नव्हे तर उद्ध्वस्त होते. मला जो अनुभव आला तो असा की मारण्यात आलेल्या स्त्रियांच्या केसांचे ढीग व लहान मुलांची इवलीइवली पादत्राणे पाहून मला मनमुराद रडावेसे वाटले पण रडू येईना. अश्रूंनी व्यक्त न करता येण्याइतके हे मोठे दु:ख होते. इतके उदास वाटले होते की माझ्या मनाला थकवा आला होता. भावनांना शब्दरूप देणे अशक्य झाले होते.

एका मानवाने दुसऱ्या मानवाला अपमानित करून, इतके हालहाल करून, इतक्या बीभत्सपणे मारावे ? या विचाराने माझे मन स्तब्ध झाले. तशीच माझ्या मनाची अवस्था परत झाली. जेव्हा मी जपानच्या लष्करातील '७३१' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वैज्ञानिकांच्या तुकडीने केलेल्या प्रयोगाबद्दल वाचले तेव्हा. १९४२ साली जपानच्या वैमानिकांनी पर्ल हार्बरवर अनपेक्षित रीतीने छापा मारला आणि तेथील अमेरिकेचा नाविक व वैमानिक तळ उद्ध्वस्त करून टाकला. पॅसिफिक महासागरातीला हे मोक्याचे ठिकाण उद्ध्वस्त करीत असताना दुसरीकडे त्यांनी ब्रिटिशांच्या ताब्यातले सिंगापूर काबीज केले आणि मग या दोन मोक्यामधल्या प्रदेशात त्यांनी मनसोक्त धिंगाणा घातला. शेकडो, हजारो दोस्त राष्ट्रांचे सैनिक त्यांनी युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले. त्या युद्धकैद्यांना जपानने किती निष्ठुरतेने वागवले हे सर्व जगाला ठाऊक आहे. 'द ब्रिज ऑन द रिव्हर क्वाय्' या चित्रपटामुळे जपानी सेनाधिकाऱ्यांचे निर्दय वर्तन दुनियाभरच्या प्रेक्षकांना जसे दिसले, त्याचप्रमाणे जे भारतीय सिंगापूरच्या पाडावानंतर त्यांच्या ताब्यात सापडले होते, त्यांच्यापैकी जे परत आले त्यांच्या तोंडूनही मला ऐकावयास

मिळाले. मेजर कीर्तने, मेजर सुदामे, यांच्यासारख्या माझ्या परिचयाच्या सेनाधिकाऱ्यांच्या तोंडून मी ते ऐकले. परंतु केवळ मी नव्हे तर जगात कोणीच आतापर्यंत जे ऐकले नव्हते ते अलीकडे कानावर येऊ लागले आहे. त्याची साद्यंत हकीकत कधीकाळी प्रसिध्द होईल ती होवो; परंतु अमेरिकेच्या संग्रहातील गुप्त कागदपत्रांचे प्रकाशन होऊ लागल्यामुळे 'तुकडी क्रमांक ७३१' यांनी केलेल्या निर्घृण संशोधनाची माहिती उजेडात आली आहे. मुकडेन येथे या तुकडीचे मुख्य कार्यालय होते. या केंद्रात वैज्ञानिक शिरो इसी आणि त्यांचा भाऊ ताकियो इशी, नाइओ इकेडा, बुसाओ योशिमुरा, इत्यादी शास्त्रज्ञ होते. हे सर्व आपापल्या शाखातले नावाजलेले विद्वान होते. त्यांच्याकडे सोपवलेली कामगिरी अशी होती की त्यांनी त्यांच्या ताब्यातील युद्धकैद्यांवर नाना प्रकारचे प्रयोग करून निरनिराळी द्रव्ये आणि वायू यांचे मानवी शरीरावर काय परिणाम होतात, त्याचे संशोधन करावे. पीतवर्णीय माणसांपेक्षा गौरवर्णीय माणसांची या द्रव्यांसंबंधीची प्रतिक्रिया सारखीच असते की वेगळी, त्यांना विषबाधा किती लवकर होते, विषबाधा झाल्यापासून मरेपर्यंत किती वेळ लागतो, इत्यादींचे संशोधन त्यांनी करायचे होते. त्यासाठी जिवंत माणसाचा देह जरी फाडावा लागला किंवा कापावा लागला तरी तो कापावा किंवा फाडावा. मनाची कोणतीही चलबिचल होऊ न देता हे वैज्ञानिक असे प्रयोग जिवंत कैद्यांवर करीत आणि त्यांचा उल्लेखही 'लाकडाचे ओंडके' म्हणून करीत. आपल्या या भीषण संशोधनाची टिपणे ते ठेवीत आणि त्यातून काय बोध झाला तेही नमूद करीत. जपानचा पाडाव झाल्यानंतर त्या सर्व प्रयोगशाळा त्यांतील सर्व मुद्देमालासह अमेरिकेच्या कब्जात आल्या. अमेरिकेने असे ठरवले की जपान हा भावी काळात आपला मित्र म्हणून राहिला पाहिजे. जर्मनीप्रमाणे त्याची बदनामी होऊ देता कामा नये. म्हणून हे सर्व भीषण सत्य अमेरिकेने जगापासून इतकी वर्षे गुप्त ठेवले होते. ती संशोधन केंद्रे ज्यांनी चालवली, ते वैज्ञानिक अजून हयात असून संशोधक म्हणून त्यांच्यापैकी काहींचा बहुमानही झाला आहे.

हे वाचले म्हणजे मनात विचार येतो तो असा की अधिक क्रूर कोण? हिरोशिमा-नागासाकीवर अणुबाँब टाकणारे अमेरिकन की मानवाला लाकडी ओंडके समजून त्यांची जिवंतपणी चिरफाड करणारे, निरनिराळी विषारी इंजेक्शने देऊन आणि धूर सोडून त्यांची सामुदायिक हत्या घडवून आणणारे जर्मन आणि जपानी? अधिक पापी कोण? अणुबाँब सिद्ध करणारे वैज्ञानिक की युद्धबंद्यांच्या छावणीतील कैद्यांवर प्रयोग करणारे जर्मन आणि जपानी वैज्ञानिक? अणुबाँबमुळे जे मारले गेले, त्यांच्यासाठी जर अश्रु ढाळायचे, तर मग या छावण्यांमधून ज्यांना

उंदीर-घुशींप्रमाणे प्रयोगादाखल मारण्यात आले, त्यांच्याबद्दल अश्रु ढाळायचे की नाही ? आणि याप्रमाणे विज्ञानाचे जर विष होत असेल, तर ही प्रक्रिया थांबवायची कशी आणि कोणी ?

हे विचार माझ्या मनाला भंडावून सोडतात आणि माझ्या अमेरिकेच्या वास्तव्यात मी एका तरुण शास्त्रज्ञाला विचारला होता तो प्रश्न येथे जाहीरपणे विचारावासा वाटतो तो असा की वैज्ञानिक व संशोधक विज्ञानाच्या आणि संशोधनाच्या कोणत्या तरी टप्प्यावर असे ठामपणे म्हणणार आहेत का की विज्ञानाच्या या शाखेत या पुढचे आम्ही संशोधन करणार नाही, कारण पुढे गेल्यास सर्वनाश आहे!

या कलियुगातून अथवा हिंसायुगातून मानवाचे तारण करणारा कलंकी शास्त्रज्ञांच्या अशा सामुहिक नकारातूनच झाला तर निर्माण होईल. नाहीतर हे हिंसायुग असेच चालू राहणार !

जगातल्या शास्त्रज्ञांसमोर जो रोकडा सवाल आज उभा आहे, तो असा : आपण काय होणार ? हिंसेचे पुजारी की हिंसेचे विरोधक ?

***

काळ आणि काळे, बदलत आहेत

मागच्या खेपेला मी फिलाडेल्फियातील 'मूव्ह' चळवळीविषयी लिहीत असतानाच माझ्या मनात प्रस्तुत लेखाचा विचार चालू होता. मला वाटत होते की, तो लेख वाचणाऱ्याचा असा ग्रह होईल की, मूव्हची विचारसरणी व कार्यसरणीही अमेरिकेमधील काळ्यांची प्रातिनिधिक चळवळ आहे, आणि येथील काळ्या समाजात वर्णद्वेष नुसता खदखदत आहे. वाचकांची तशी गैरसमजूत होऊ नये म्हणून मी हा लेख लिहण्याचे तेव्हाच ठरवले होते. गेल्या दहा वर्षांत मी चार वेळा येथे आलो आणि काळ्यांच्या परिस्थितीत काळाबरोबर कसा कसा फरक पडत चाललेला आहे त्याचे ढोबळ निरीक्षण करीत गेलो. तेवढया स्थूल निरीक्षणावरून सुद्धा माझ्या लक्षात येत गेले की, काळे व गोरे हे दोन शब्द जरी परस्परविरोधी प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर आणीत असले तरी वास्तवात त्यांचे परीघ एकामेकांजवळ आलेले आहेत आणि ते टकरीच्या अथवा संघर्षाच्या पवित्र्यात जवळ येत नसून मिलाफाच्या व संगमाच्या स्वरूपात जवळीक साधीत आहेत. मात्र 'होंगे कामयाब एक दिन' **(We shall overcome)** ही मार्टिन ल्यूथर किंगची भविष्यवाणी सार्थ ठरायला अजून अनेक वर्षे लागतील हे निःसंशय. कारण काळे गोरे हा जो भेद पाश्चात्य देशात-खास करून अमेरिकेत दिसून येतो तो केवळ अशिक्षित-सुशिक्षित, गरीब-श्रीमंत, शोषित-शोषक असा नाही. तो भेद तर आहेच पण त्याहीपेक्षा, अटळपणे व उग्रपणे लक्षात येणारा एक भेद त्यांच्यात आहे, तो म्हणजे रंग भेद. सुशिक्षित-अशिक्षित, श्रीमंत-गरीब, शोषक-शोषित यांतले भेद पुष्कळदा पाहिल्याबरोबर कोणाच्याही लक्षात येतील असे नसतात. फैजपूरच्या १९३६ च्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी इजिप्तमधील एका प्रमुख पत्राच्या बातमीदाराने मला एक मोठा मार्मिक प्रश्न टाकला होता. त्याने विचारले होते की, मी येथे हजारोंच्या संख्येने जमलेल्या प्रतिनिधींकडे जेव्हा पाहातो तेव्हा मला ते सगळेच सारखे दिसतात, हे कसे ? कोण पुढारी, कोण सामान्य सदस्य, कोण श्रीमंत कोण गरीब हे कळत नाही. मी म्हटले की आम्हा सर्वांना खादीत गुंडाळणाऱ्या गांधी नावाच्या माणसाचा हा पराक्रम आहे ! त्यावेळी सरदार पटेल, राजेंद्रप्रसाद, राजगोपालाचारी, पट्टाभिसीतारामय्या, सुभाषचंद्र हे सगळे नेते त्यांच्या अनुयायांप्रमाणेच धोतर कुडत्यात मिरवीत असत. अगदी पंडित नेहरु सुद्धा ! हा मुद्दा

सांगण्यातला मतलब असा की हे ज्ञानातले व धनातले भेद झाकता येतात, काही काळ तरी पडद्याआड करता येतात. पण येथला वर्णभेद सहज बघणाऱ्याच्या डोळ्यांत एकदम घुसतो. म्हणूनच तर ह्या संगतीच्या, संवादाच्या सहवीर्याच्या प्रक्रियेचे महत्त्व असाधारण ठरते. आणि ही प्रक्रिया अमेरिकेत अडखळत का होईना चालू आहे असा पुरावा येथे उपलब्ध होतो. येथल्या विस्तीर्ण उद्यानांतून फिरायला गेले की, काळा पुरूष आणि गोरी स्त्री, किंवा काळे-गोरे विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र फिरताना, धावताना आणि खेळताना अनेकदा पहावयास मिळतात. काळे आणि गोरे यांचे पीळ एकीकडे उलगडत जात असताना दुसरीकडे काही नवे गुंते निर्माण होत आहेत, हेही खरे ! पण इतिहासाची ही खोडच आहे. मला वाटते, मार्क्सने हे फार पूर्वीच म्हणून ठेवलेले आहे की, कोणतीही एखादी समस्या घेतली तर ती सोडवण्याची इतिहासाची पद्धती अशी की नवे प्रश्न निर्माण करायचे ! तसा प्रकार अमेरिकेतही घडेल. पण ती पुढची गोष्ट झाली. आजचा काळ्यांच्या जीवनाचा प्रवाह कोणते वळण घेतो आहे तेवढे पाहू या.

एक गोष्ट तर स्पष्ट आहे, ती अशी की, काळे म्हणजे तिरस्करणीय हे जुने समीकरण लयाला जाऊन काळे ते सुंदर (ब्लॅक इज ब्यूटिफुल) असे नवे समीकरण रूढ करण्यात काळी प्रजा यशस्वी ठरते आहे. अर्थातच केवळ घोषणा करून हे नवे समीकरण साध्य किंवा सिद्ध झालेले नाही. संगीत, नाटय, क्रीडा, संशोधन अशा नानाविध क्षेत्रांत कृष्णवर्णियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केलेले असून काही क्षेत्रात तर ते 'उस्ताद' म्हणूनच सर्वत्र मानले जातात. 'काळ्यांचे अन्तरंग' (दी सोल्स ऑफ ब्लॅक फोक) हा ग्रंथ डब्ल्यू. ई. बी. हुबाय यांनी १९५३ साली प्रसिध्द केला, तेव्हा त्यांनी असे विधान केले होते की, 'वर्णभेदाची समस्या हीच विसाव्या शतकासमोरची प्रमुख समस्या असेल'-त्यांच्या ह्या विधानाचा 'भविष्यवाणी' म्हणून त्या काळच्या विचारवंतांनी गौरव केला होता. त्यानंतरचा जमाना म्हणजे मार्टिन ल्यूथर किंग यांच्या नेतृत्वाचा जमाना. ॲलेक्स हॅलेची जगभर गाजलेली इतिहासकथा 'मुळे' (रुट्स) प्रसिद्ध झाली तेव्हा वाचकांची मने फार गलबलून गेली. दक्षिण आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या गांबियामधील खेडयात पिढयान पिढया छोटीशी शेती करून राहणाऱ्या ओमोरो व बिटा किन्टे या निग्रो जोडप्याला मुलगा होतो तेव्हापासून म्हणजे १७५० सालापासूनच्या निग्रोंच्या दुर्दैवाचे महाभारतच त्याने जगापुढे उघडे केले होते. त्या किंवा किन्टेच्या सातव्या पिढीतला सायमन हॅले दुसऱ्या महायुध्दात अमेरिकन सेनादलातला सार्जंट म्हणून लढतो, युध्द संपल्यावर शेतकी कॉलेजातून पदवी घेतो आणि आपल्या देशातील (!)

शेतकीखात्यात नोकरी करून ८३ व्या वर्षी मरण पावतो अशी सात पिढयांची गाथा मोठया वेधक शैलीत येथे सांगितलेली आहे. ह्या ग्रंथाने हॅलेला आणि त्याच्याबरोबर काळ्यांना मोठे केले.

आफ्रिकेतून ज्या निग्रोंना शिकार करून अमेरिकेत आणण्यात आले त्यांतले अनेक मुसलमान होते अथवा दैवत पूजक होते. खास त्यांची अशी काही समाज-चौकट त्यांच्यापाशी होती. पण त्यांचे ते संस्कारधन गुलामगिरीत पार उद्ध्वस्त झाले. त्यांची खरेदी-विक्री झाली, त्यांच्या बायकामुलींचा मनात आले त्यांनी उपभोग घेतला, गोऱ्या लोकांनी रानच्या जनावराची करावी तशी त्यांची पारध केली. उरला तो इतिहासहीन, धर्महीन, रीतिहीन, संस्कारहीन उघडानागडा निग्रो ! म्हणजेच काळा आदमी. सामाजिक दृष्टया याचा एक अर्थ असा होतो की, बुकर टी. वॉशिंग्टनपासूनच्या गेल्या शे-दीडशे वर्षांत ह्या काळ्या आदमींना गोऱ्या माणसाच्या गेल्या तीन हजार वर्षांच्या विकासाच्या पायऱ्या चढून यावे लागलेले आहे. म्हणून आजच्या अमेरिकेतील काळ्यांच्याकडे जर पाहिले तर दृश्य दिसते ते असे की, शिडीच्या अगदी पायथ्याच्या पायरीवर जरी कोणी नसले तरी सगळेच मधल्या किंवा वरच्या पायरीपर्यंत पोचलेले नाहीत. गुलामगिरीच्या अंधाऱ्या तळघरातून तो निश्चितच मोकळ्या हवेत आलेला आहे, पण मोकळा झाल्याबरोबर तो विखुरला जात आहे आणि त्या विखरणीतून त्याच्या आजच्या व उद्याच्या समस्याही निर्माण होणार आहेत. ज्या डुबॉयच्या ग्रंथाचा वर उल्लेख येऊन गेला आहे त्याने काळ्या लोकांच्या अन्तरंगात चाललेल्या रस्सीखेचीचे वर्णन अशा शब्दांत केलेले आहे की, 'काळ्या माणसाला जीवनातले हे दुहेरीपण सतत जाणवत असते : आपण अमेरिकन आहोत आणि आपण निग्रोही आहोत. आपली दोन मने आहेत, दोन विचार आहेत, कधीच एकत्र न येऊ शकणाऱ्या दोन प्रेरणा आहेत, दोन परस्पर विरोधी ध्येये आहेत, एकाच कृष्ण देहात स्फुरणारी. त्या देहात जबरदस्त पीळ असल्यामुळेच त्यांची दोन भकले पडलेली नाहीत.'

आपला मित्र अलेक्झांडर क्रुमलेविषयी लिहिताना डुबॉय म्हणतात : 'त्या हरिण-डोळ्यांच्या पोरासमोरच्या त्या ओसाड पिवळट करडया भरड माळावर, त्याला तीन चकवे दिसले होते, पहिला तांबडया दिवस फुटीबरोबर प्रकट झालेला द्वेषाचा चकवा. भर दुपारचे ऊन झाकोळून टाकणारा निराशेचा दुसरा चकवा आणि कातर वेळेला अंधारासंगे चोर पावलांनी येणारा संशयाचा तिसरा चकवा. त्यांना बाजूस सारून त्या पोराला ज्या अपमानाच्या आणि मृत्यूच्या दऱ्यादरकुटया पार कराव्या लागल्या त्याही लक्षात घ्या.' हे शब्द वाचताना माझ्या डोळ्यांसमोरून श्री.

खरात, दया पवार, लक्ष्मण माने, पार्थ पोळके अशी किती नावे आणि त्यांनी रेखाटलेली किती शब्दचित्रे सरकन् गेली म्हणून सांगू !

डुबॉयने रेखाटलेले काळ्या माणसाचे हे मानसिक तणाव पंचवीस-तीस वर्षांनंतर सुद्धा जसेच्या तसेच राहिलेले आहेत की त्यातले बरेचसे तणाव ढिले आणि सौम्य पडत जात आहेत हा विषय येथे प्रस्तुत आहे. त्याचे उत्तर मला माझ्या निरीक्षणातून जे मिळाले होते त्याचाच पाठपुरावा न्यूजवीक मधील आणि न्यूयॉर्क टाईम्समधील दोन लेखांनी केला हे विशेष. हे तिन्ही लेख स्तंभलेखकांनी अनेक काळ्या कुटुंबातील मातापित्यांच्या, मुलामुलींच्या आणि विद्यार्थ्यांच्या गाठी भेटी घेऊन लिहिलेले आहेत. पाश्चात्य देशामध्ये सरसकट सर्व मुलाखती फीत-नोंदणी पध्दतीने केल्या जात असल्यामुळे त्यांच्या लेखातील विधाने खरी असावी असे मी मानून चालतो.

दुसऱ्या महायुद्धानंतर काळ्या समाजात फार मोठे फेरबदल झाले असल्याचे दिसून येते. हा बदल वृत्तपत्रातील, मासिकातील आणि दूरदर्शनातील जाहिराती नीट पाहाणाऱ्याच्या सुद्धा नजरेतून सुटणार नाही. मग त्या जाहिराती खाद्य पदार्थांच्या असोत, कपडयालत्त्यांच्या असोत, की नृत्य-नाटक-क्रीडांच्या असोत. त्यात काळी मंडळी दिसली नाही असे सहसा घडणारच नाही. आपल्याकडील हमलोगसारखी अखंड कथा सध्या येथे चालू आहे, जेफर्सन, ती तर एका काळ्या कुटुंबाची कथा आहे. जरा निराळ्या प्रकारची, डिफरन्ट स्ट्रोक्स् ही कथा असली तरी तिच्या मधील मुख्य पात्र असलेला मुलगा काळाच आहे. बिल क्रॉसबी हा तर अमेरिकन दूरदर्शनावरील कमाल लोकप्रिय नट झाला आहे. या प्रसिद्धीच्या झोतात वावरणारी मंडळी ज्या मध्यम सुखवस्तू वर्गातील आहेत त्याच वर्गातील निरनिराळ्या वयोगटांतल्या स्त्री-पुरुषांच्या मुलाखती न्यूज वीक व न्यूयॉर्क टाइम्सने प्रसिध्द केलेल्या आहेत. लहानपणी डाऊन टाउनमध्ये किंवा झोपडपट्टीमध्ये राहाणारी काळी मंडळी आता चाळिशीत किंवा पन्नाशीत आली आहेत. जसे त्यांचे वय पुढे सरकले आहे तसे त्यांचे निवासस्थानही बदलले असून ते गेल्या पंधरावीस वर्षात शहराजवळच्या नव्या उपनगरांतून घरे बांधून राहू लागलेले आहेत. ह्या स्थलांतराचा उद्देश काय असे विचारणाराला जे उत्तर मिळते ते असे की, आमच्या मुलामुलींना गोऱ्या मुलामुलींशी स्पर्धा करावी लागते. त्यामुळे त्यांचे शिक्षण सुधारते आणि पुढच्या जीवनात बहुसंख्य गोऱ्यांच्या समाजात जर रहावयाचे आहे तर जे आचार विचारांचे वळण लागावयास हवे ते त्यांना मिळत जाते. पण तुमच्या नात्यागोत्यातली माणसे, मित्रमंडळी तर मागेच राहातात, त्यांचे काय ? असा प्रश्न

जेव्हा उपस्थित केला गेला तेव्हा त्याला उत्तर असे मिळाले की सणासुदीला आम्ही त्यांच्याकडे जातो, पूर्वीच्या क्लबाचे सभासदत्व कायम ठेवतो ! नव्या वस्तीतली गोरी माणसे प्रथम आमच्याकडे ज्या भावनेने पहात, तिरस्कार दाखवीत, ते वातावरण आता मावळत चालले आहे. वर्गामध्ये काळीगोरी मुले पूर्वी मिसळत नसत, आता मिसळू लागली आहेत. आता काळा मुलगा व गोरी मुलगी यांचे "डेटिंग" ही होऊ शकते. आचरणातला हा मोकळेपणा उत्तरेपेक्षा दक्षिणेकडे कमी आहे. पण वातावरणात मोकळेपणा येत आहे, तसे वारे वाहात आहेत याचा अनुभव सर्वत्र येतो आहे.

असा सुखद अनुभव मला नुकताच आला आणि तो घरच्या घरी घेता आला. माझ्या दोन्ही नाती जुई आणि सायली परीक्षा उत्तीर्ण झाल्या. एक रॉचेस्टर विद्यापीठातून तर दुसरी एलिस स्कूल मधून. तिच्या इष्टमित्रांना भोजनासाठी बोलावले होते. तो मेळावा पाहून माझे मन तृप्त झाले. काळे-गोरे विद्यार्थी तर होतेच. एक दोन पिवळेही होते. जरा देखील भेदभाव जाणवत नव्हता. जुईसायलीच्या आईवडिलांचे काळे मित्र मैत्रिणी त्या आनंदात सहभागी झाल्या होत्या. जुईची मैत्रीण टोनी टुसाँत तर नंतर दोन दिवस जुईकडेच राहिली. पिकायला आलेल्या जांभळाच्या रंगाची, हैतीमध्ये जन्मलेली टोनी, मोठया आनंदाने जुई-सायली बरोबर राहिली. एवढेच नाही, तिने पोळी आणि बटाटयाची भाजी चांगली चापली. सायलीच्या वर्गातल्या गोऱ्या-काळ्या मैत्रिणी तर नेहमी फोन करतात, घरी येऊन हक्काने जेवतात. सायलीला शाळेकडून खास प्रशस्ति-पत्र मिळाले आहे. त्यात अभ्यासू विद्यार्थी, क्रीडापटू या विशेषणांच्या नंतर जगन्नागरिक **(World Citizen)** असेही विशेषण लावलेले पाहून मला खूप समाधान वाटले. काळी माणसे आता पूर्णतया शापमुक्त झालेली नसली तरी ती मुक्तीचा मार्ग चालत आहेत याचे दर्शन मला बसल्या जागीच मिळाले होते. समानतेचा ध्वज अजून उंचावर फडकू लागला नसला तरी तो वरवर चढत आहे याचे जरी समाधान वाटत असले तरी त्या प्रक्रियेमधूनच जी नवी प्रश्नचिन्हे प्रगट होऊ लागलेली दिसतात त्यांचाही विचार करावयास हवा. त्यांपैकी दोन प्रश्नचिन्हे तर या घटकेलासुध्दा ठळकपणे दिसू लागलेली आहेत. काळ्या लोकांमधून जे लोक सुशिक्षित होतात, पैका कमावू लागतात, प्रतिष्ठित धंद्यात नाव कमावतात, तेच उपनगरातून बंगले बांधतात, आपल्या मुलांना भारी खर्चाचे शिक्षण देतात. पण त्याचबरोबर ते स्वजनापासून दुरावतातच. हा पहिला प्रश्न. त्यांचे बोलणे, वागणे, विचार करणे गोऱ्यांच्यासारखे होऊ लागते. शिल्लक राहातो तो केवळ रंग. ही गोष्ट झाली सध्या जे चाळीशीत

आणि पन्नाशीत आहेत त्या स्त्रीपुरुषांची. पण त्यांच्या मुलामुलींना तर गोऱ्या संस्कृतीने बालपणापासून इतके वेढून आणि विळखून टाकलेले असते की त्यांना रंगाशिवाय आपली संस्कृती काही वेगळी होती आणि आहे याचे भानही नसते. निग्रोमधील अस्मिता जागवावी म्हणूनच ना हॅलेसारख्या लेखकाने अमेरिकेच्या शासकीय दप्तरातून हजारो कागदपत्रे धुंडाळली आणि गांबियामधील बिंटा किन्टे ह्या अडीचशे वर्षांपूर्वी गुलाम झालेल्या आपल्या पूर्वजांचा शोध लावला ? त्याच उद्देशाने नाडुबायने निग्रोंच्या माणसांचा ठाव घेण्याचे प्रयत्न केले?ही अस्मितेची गाथा समानतेच्या लाभाबरोबर नष्ट होणार की काय ? मग निग्रोंची अस्मिता कशी टिकावी ? हाच तो वेगळेपण जपण्याचा दुसरा प्रश्न. सामाजीकरण हवे आहे, पण सामिलीकरण नको आहे, असा हा बिनतोड पेच असून त्याचे उत्तर केव्हा आणि कसे मिळेल ते सांगणे कठीण दिसते. त्याचे उत्तर जर निग्रो लोकांना शोधून काढता आले तर अमेरिकेमध्ये वास्तव्यासाठी आलेल्या भारतीयांसकट सर्वच अल्पसंख्याकांना ते उपयोगी पडणार आहे. कारण त्यांच्यासमोर तोच पेच पडलेला मला दिसतो.

सहजच मनात विचार आला की, भारतामधील राष्ट्रीयत्व निर्माण करण्याची समस्या बऱ्याच अंशी अमेरिकेतील ह्या समस्येसारखीच नाही काय ? भारतामधील गेल्या शंभर वर्षांतली सामाजिक वाटचाल जर लक्षात घेतली तर असे दिसून येते की, समाजातील जे मोठे मोठे स्तर शेकडो वर्षे निद्रिस्त अवस्थेत जागोजाग पडलेले होते त्यांच्यात जागृतीची धुगधुगी प्रथम निर्माण झाली आणि ती प्रचंड मढी उठून बसली. सभोवार पाहू लागली. त्यांच्या सुकून आठळी बनलेल्या मनाला आशा-आकांक्षाचे कोंब फुटू लागले. आपल्याही जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी ते नव्याने वसत असलेल्या समाजातले स्वत:चे स्थान हुडकू लागले. राजकीय स्वातंत्र्याचा हात धरून औद्योगीकरणाचा जमाना सुरू होताच ह्या प्रबोधनाच्या क्रियेला आता आर्थिक आधार मिळालाय. दुर्लक्षित, उपेक्षित आणि दलित समाजाची शासनाला गरज आहे हे लक्षात येताच त्या त्या समाजातील नेते राजकीयपदावरआणिबड्याअधिकाराच्याखुर्च्यांवरबसूलागले, 'वाघिणीचेदूध' पिऊ लागले. पण एकीकडे ही समानतेची प्रक्रिया सुरू होताच त्यांची बहुजन समाजांशी असलेली नाळ कापली जाऊ लागली. ते देखील अमेरिकेतल्या निग्रोप्रमाणे उपनगरात आणि नगरात बिऱ्हाडे थाटू लागले. थोडक्यात ते पांढरपेशे बनू लागले! पण समानीकरणाच्या या बिन्दूवर पोचताच आपला वेगळेपणा जपण्याची उलटीप्रक्रियाअलीकडेसुरूहोतानादिसतआहे. पुढेसरकण्याच्याआणिमागेफिर-

ण्याच्या ह्या एकाच वेळी चालू असणाऱ्या क्रिया-विक्रियातून कोणते सामाजिक मन अमेरिकेत अथवा भारतात निर्माण होते आहे त्याकडे सतत लक्ष ठेवले पाहिजे. कारण ते एका मूर्च्छितावस्थेत पडून राहिलेल्या समाजाचे चित्र नसून एका सजीव आणि सक्रिय समाजाचे हालते चित्र असणार आहे. माझी कल्पना अशी आहे की, ह्या प्रक्रियेमधील समानीकरणाच्या प्रवाहाचा जोर अधिक राहील. प्रथक् संस्कृतीची बेटे थोडीफार उरतील. पण ती मागच्या आठवणी काढून दोन दिवस साजरे करण्यापुरती. भारतात जे 'म्लेंच्छ, हूण, यवन, शक' आले ते आता कोठे आहेत ? तीच गत अवशिष्टांची होऊन दोन चार प्रसरणशील संस्कृती निर्माण होतील आणि त्यांच्यातही फारसे अंतर उरणार नाही.

***

कुराण-सार

अमेरिकेत पिट्सबर्गमध्ये आल्यावर मी प्रथम होमरचे इलियड वाचावयास घेतले. ते वाचून पूर्ण केल्यावर महम्मद पैगंबरांचे कुराण वाचू लागलो. हे दोन्ही ग्रंथ वाचण्याची इच्छा पूर्वीपासून होती. पण ती तशीच राहून गेली होती. इलियडची तुलना रामायणाशी करण्यात आल्याचे कोठे तरी वाचनात आले होते, ग्रीक पुराणातील काही कथा माझ्या बी.ए.च्या अभ्यासक्रमात होत्या आणि सर्व पाश्चात्य संस्कृतीची गंगा ग्रीसमधील होमर, सोफोक्लीज, प्लेटो, ॲरिस्टॉटल अशा पर्वत-प्राय उंचीच्या मानवी शिखरातून उगम पावलेली असल्याची जाणीवही मला होती. म्हणून इलियड, एनिड इत्यादी महाकाव्ये वाचण्याची इच्छा होई. त्यापैकी इलियड वाचून झाले.

कुराण वाचावयाचे होते ते यासाठी की जगातल्या ४५ कोटी लोकांनी ज्या ग्रंथाला वंद्य मानलेले आहे, इतकेच काय पण ज्याचे आठ नऊ कोटी अनुयायी भारताचे आज नागरिक आहेत, त्यांचा धर्मग्रंथ आपण वाचलेलासुद्धा नसावा ही गोष्ट माझ्या मनाला खटकत होती. म्हणून येथे पोचताच मी कुराण आणवले आणि ते वाचले. हा ग्रंथ मॅकमिलन कंपनीने प्रकाशित केलेला असून मूळ अरबी भाषेतून त्याचा अनुवाद डॉ. आर्थर जॉन आरबेरी यांनी केलेला आहे. ह्या ग्रंथाची मांडणी अनुवादकाने दोन खंडात केलेली असून प्रथम खंडात १ ते २० सुरा आणि दुसऱ्यात २१ ते ११४ सुरा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. सुरा म्हणजे आपल्याकडले सर्ग किंवा अध्याय.

कुराण वाचताना ही गोष्ट सहज लक्षात येते की बायबलमधील जुना करार आणि नवा करार पायाभूत धरून त्यावर कुराणाचे बांधकाम झालेले आहे. ज्यू लोकांच्यासाठी नोहापासून येशूपर्यंत जे जे प्रेषित ईश्वराने पाठवले ते ते प्रेषित कुराणाने मान्य केलेले आहेत आणि त्यांच्याविषयीचा भाग जर कुराणातून वगळला तर कुराण हा खूपच आटोपशीर ग्रंथ होईल. येशूचा व माता मेरीचा उल्लेख कुराणामध्ये आदरपूर्वक केलेला आढळतो. पण येशूला प्रेषित मानणाऱ्या कुराणाने त्याला ईश-पुत्र मानण्यास मात्र नकार दिलेला आहे. कारण ईश हा सदैव एकमेव आहे, त्याचा कोणी पुत्र तर नाहीच पण त्याच्या बरोबरीचेही कोणी नाही, ही कुराणाची ठाम भूमिका आहे. त्यामुळे नव्या करारातील पिता, पुत्र व पवित्र भूत (फादर, सन

व होली घोस्ट) ही त्रयी कुराणाने स्वीकारलेली नाही.

कुराण ईश्वराचा शोध घेत नाही. त्यात उपनिषदाप्रमाणे अथवा बुद्धाच्या धम्माप्रमाणे तर्क, युक्तिवाद, चर्चा यांना स्थान नाही. 'नासदासीत् तदानीम् ।' अशा उपनिषदातील शंकावादाला अथवा जैन मतातील अनेकान्तवादाला कुरानात थारा दिलेला नाही, कुरानात अनुमाने नाहीत, सडेतोड निर्णय आहेत. ईश आणि त्याचा प्रेषित जे सांगतो आहे ते ऐका नाही तर नरकात पिचत राहा, अशी कुरानाची रोखठोक भूमिका आहे. ईशाने आरबी भाषेतून मनुष्य प्राण्याला दिलेला अपरिवर्तनीय आणि शंकातीत असा महम्मदांच्या द्वारा दिलेला संदेश म्हणजेच कुराण, अशी ही स्वयंभू व अपरिवर्तनीय भूमिका आहे.

मराठीभाषिकांना कुराणाचे सत्य सांगावे म्हणून मी रचलेली काही सूत्रे पुढे देत आहे. कुराणाचे सामाजिक व तात्त्विक मूल्यमापन करावयाचे झाल्यास ते स्वतंत्र लेखामध्ये करावे लागेल. मात्र ज्या डॉ. आरबेरींच्या अनुवादाच्या आधारे मी ही छंदोबद्ध सूत्रे लिहिली आहेत, त्यांना कुराणाचे मूल्यमापन ऐतिहासिक वा सामाजिक मापे लावून करणे मुळीच पसंत नाही. ते कुराणामधील शब्दमाधुर्यावर आणि नाद सौंदर्यावर इतके लुब्ध झालेले आहेत की ते त्यातील सामाजिक वा सात्त्विक तथ्य शोधू पाहाणाऱ्यांना हीन रुचीचे समजतात. मी मात्र डॉ. आरबेरींच्या मताशी सहमत होऊ शकणार नाही. येशू आणि महम्मद यांच्यासारखे महापुरुष सहाशे-साडेसहाशे वर्षांच्या फरकाने ज्या जमिनीच्या पट्टयात जन्माला आले तेथील रहिवाशांच्या सामाजिक, आर्थिक व बौद्धिक वास्तवाचे प्रतिबिंब त्यांच्या प्रतिभेच्या भिंगात पडल्यावाचून कसे राहील ? तेव्हा त्या भिंगाचे ईक्षण सामर्थ्य तपासण्यात गैर ते काय ? परंतु तो प्रयत्न पुढे केव्हा तरी करता येईल. असा प्रयत्न भारतातील मुसलमानांना मुळीच पसंत पडणार नाही याची मला जाणीव आहे. त्यांना माझी पुढे दिलेली रचनाही बहुधा मानवणार नाही.

हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन आणि इस्लामी या चार प्रमुख धर्मांकडे पाहाता असे दिसते की एकटया बुद्धानेच आपल्या धर्मामागे ईश्वरी प्रेरणा असल्याचा दावा केलेला नाही. स्वत:च्या मनना-चिंतनातून जी आर्यसत्ये प्रकट झाली तोच त्याच्या धम्माचा पाया ! बुद्धांना ईश्वराची गरजच भासली नाही.

कुराणातील मी वेचलेली अनुष्टुभे अशी :

अल्ला ईश मुळारंभी, देव तैसाच इब्लिस ।
अल्लाने रचिले विश्व मानवासह नंतर ॥ १ ॥
मनुजां निर्मिले ईशे मातीमधुनिया स्वयें ।

ईशाज्ञा मानुनी त्यांना देवांही वंदिले त्वरें ॥ २ ॥
इब्लीस नमला नाही, ईशाज्ञा झिडकारिता ।
म्हणे या बाहुल्यांना मी नाचवीन हवे तसे ॥ ३ ॥
सर्वज्ञानी, सर्वसाक्षी, कर्ताहर्ता जगत्प्रभू ।
निर्मी, नाशी विश्वयंत्र, अल्ला त्याचा प्रचालक ॥ ४ ॥
अल्लासी तुलना नाही, त्याचा क्रोध अनावर ।
सीमा नसे दयेलाही तयासी पूजिले तर ॥ ५ ॥
मायाजालीं इब्लिसाच्या फसती स्वार्थ साधण्या ।
मूर्तीना पूजती वा जे तयांचा परि काळ तो ॥६॥
अल्लाने मनुजोद्धारा दूत कित्येक धाडिले ।
मुसा, जेकब, जोहान, अब्राहामादि प्रेषित ॥ ७ ॥
अक्षतयोनी मेरीचा पुत्र येशूहि त्यातला ।
दूतांच्या मालिकेमाजी महम्मद अखेरचा ॥ ८ ॥
इस्लाम धर्म ईशाचा त्याचा दूत महम्मद ।
तयाचा शब्द पाळावा नम्रत्वें दृढ निश्चयें ॥ ९ ॥
शब्दा जे पाळिती ते ते देहान्तीं स्वर्ग भोगती ।
पाळिती ना, तयांसाठी नरकीं अग्निकुंडची ॥ १० ॥
मुस्लीमांतहि जे जेष्ठ झुंजती धर्मकारणीं ।
पडती, त्याहुनी निंच जे घरी स्वस्थ बैसती ॥ ११ ॥
रणयज्ञ बळी जाती त्यांना स्वर्गी सुखासने ।
बागा खजूर-डाळिंबी, झरे झुळझूळ वाहती ॥ १२ ॥
पुष्टस्तनी हरीणाक्षी अप्सरा मनमोहक ।
कामवर्जित सेवेला, लवंडे खूबसूरत ॥ १३ ॥
अश्रद्धांची असो संख्या कितीही जबरी, तरी ।
रणात विजयी तेची अल्ला ज्यांचा सहायक ॥ १४ ॥
नराचे क्षेत्र त्या नारी, नारींना स्थान ना दुजे ।
परिणाव्या यथाशक्ती दोन वा तीन चार वा ॥ १५ ॥
वृद्ध पंगू अनाथांसी रक्षावे धर्म बोलला ।

विधिवत् दानही द्यावे करावे उपवासही ॥ १६ ॥
दास-दासींस रक्षावे वन्दावे नित ईश्वरा ।
उच्छेदावे अधर्म्यांना आज्ञा ही धर्म देतसे ॥ १७ ॥
कल्पांतीं सर्व प्रेतांना जागवील जगत् प्रभू ।
आलिंगील मुसलमाना, पाखंडया तुडवील तो ॥ १८ ॥

***

बिचारे शिवाजीमहाराज, बिचारी भवानी आई...

१५ फेब्रुवारी १९८६ च्या काळरात्री फलटणमधील दलित वस्तीवर जो हल्ला सवर्णांकडून चढवण्यात आला, त्याची सविस्तर वर्णने ज्या मराठी वृत्तपत्रांनी दिली, त्यांनी आपली कामगिरी तर इमानाने बजावली आहे; परंतु त्याचबरोबर त्यांनी मराठी मनाचे एक छुपे परंतु अत्यंत हिडीस असे अंगही प्रकाशात आणले आहे. भारतामधील महाराष्ट्राबाहेरची प्रजा खूपच मागासलेली; महाराष्ट्रातील लोकहितवादी, म. फुले, शाहू छत्रपती, डॉ. आंबेडकर, आगरकर यांच्यासारखे थोर समाजसुधारक इतरत्र झालेले नाहीत आणि समाजप्रबोधनही झालेले नाही, असे आम्ही मराठी माणसे थोडया अहंकाराने म्हणत होतो. आमचा हा अहंकार किती भ्रामक होता, ते फलटण येथे दलितांची जी घरे पेटवण्यात आली, त्या पेटवलेल्या घरांच्या जाळाने दाखवून दिले आहे. वृत्तपत्रांनी दिलेल्या भीषण बातम्यांनंतर महाराष्ट्रामध्ये जनतेच्या पातळीवर आणि शासनाच्या पातळीवर काय प्रतिक्रिया उमटल्या, ते अजून तरी स्पष्ट झालेले नाही. पुणे महानगरपालीकेसारख्या एखाद्या संस्थेने आपला निषेध जरी नोंदवला असला, तरी सर्वसाधारण जनतेतील प्रतिक्रिया 'मला काय त्याचे' अशा स्वरुपाचीच असावी असा तर्क करण्यास पुरेसा वाव आहे. शासनाची प्रतिक्रिया तर त्याहूनही अधिक बेफिकीरपणाची वाटते. अर्थात त्यात आश्चर्य करण्यसारखे काही नाही. कारण १५ फेब्रुवारीच्या रात्री दोन-तीन तासांहून अधिक काळ चाललेल्या या हल्ल्याकडे फलटणच्या पोलिसांनी जे संतापजनक दुर्लक्ष केले, त्यावरून अशा घटनांच्या बाबतीत पोलिस खात्याने फारशी तत्परता दाखवण्याची गरज नाही, अशा स्वरूपाच्या सूचना शासनाकडून त्या खात्याला मिळालेल्या असाव्यात, असे दिसते.

फलटणमधील या घटनेमुळे अनेक प्रश्न उत्पन्न होतात. ताबडतोब जो प्रश्न येतो तो असा की मानवी समतेचा विचार हा मुळी भारतीय माणसाने मनापासून कधी स्वीकारलेलाच नाही. भारतीय समाजातली, अस्पृश्यतेच्या रूपाने व्यक्त होणारी पराकोटीची विषमता भारतातील बहुसंख्य नागरिकांचा जो धर्म म्हणजे हिंदुधर्म, त्याने मान्य केलेली आहे. या गोष्टीचा इन्कार कोणीही प्रामाणिकपणाने करू शकणार नाही. बौद्ध धर्माचा प्रचार झाला, इस्लाम भारतात पसरला; महानुभाव वा वीरशैव पंथासारखे समतेचा विचार आग्रहाने प्रतिपादणारे पंथ इथे निर्माण झाले.

जवळजवळ तीन शतके भक्तिसंप्रदायातील संतांनी, 'भेदाभेद अमंगळ' आहेत, असे नाना परींनी सांगितले. इंग्रजांच्या आगमनानंतर आपल्यापैकी अनेकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वखुशीने स्वीकार केला. चक्रधरापासून आंबेडकरांपर्यंतच्या नाना महात्म्यांनी व संतांनी हे भेदभाव निपटण्याचे प्रयत्न केले आणि शेवटी कळस म्हणून 'मानव तितुका एकचि आहे । उच्च न कोणी, नीच न कोणी' अशा अर्थाची कलमेही आपण आपल्या संविधानामध्ये समाविष्ट करून या अनिष्ट रूढींना आपण बेकायदा ठरवले. परंतु चाकण वा फलटन येथे नुकत्याच घडलेल्या घटनांवरून हा हजार-दोनहजार वर्षे चाललेला समाजसुधारणेचा खटाटोप व्यर्थच ठरला आहे, असे मानणे क्रमप्राप्त ठरते. सज्जनांची वाणी आणि शासनाचा राजदण्ड ही दोन्ही जेथे असमर्थ ठरतात, तेथे 'सर्व उपाय थकले' असा निष्कर्ष काढून स्वस्थ बसावयाचे की काय, असा प्रश्न उत्पन्न होतो आणि त्याचे उत्तर शोधणे हे भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने आद्य महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

फलटण येथील हल्ल्याची जी वर्णने आली आहेत, त्यांतील अमानुष क्रूरपणा जसा डोळ्यात भरतो, त्याचप्रमाणे हल्लेखोरांनी दलित वस्तीवर हल्ले करताना 'जय शिवाजी, जय भवानी' - अशा ज्या घोषणा दिल्या त्यावरून दलितांवर हल्ला चढवताना त्यांना आपण पुण्यकृत्य अथवा पराक्रम करीत आहोत असे वाटत असावे, ही गोष्ट उघड दिसते. तसे नसते, तर महाराष्ट्रात घरोघरी ज्यांची पूजा होते, त्यांची नावे त्यांच्या जिव्हांना उच्चारविलीच नसती ! तुळजाभवानी आणि छत्रपती शिवाजी केवळ स्पृश्य समाजांची नव्हे तर हिंदुमात्राची अधिदैवते आहेत. मग त्यांचा जयघोष करून कोणाला पापी कामे करावीशी वाटेल ? दलित समाजाची तरूण मुले आपल्या बरोबरीने संघटन करू लागली. वेगवेगळ्या क्षेत्रांत आपल्याशी स्पर्धा करू लागली, ही कल्पनाच त्यांना सहन होऊ शकली नसावी. आपल्या गावची दलित समाजातील पोरे जर ताठ मानेने चालत असतील तर त्यांना धडा शिकविला पाहिजे, 'पायातील वहाण पायातच ठेवली पाहिजे,' या हेतूने ही धाड घालण्यात आली असावी. नामान्तराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात पुलोद सरकारच्या राजवटीत जे घडले त्याचीच ही पुनरावृत्ती आहे, असे म्हणण्यात काहीच गैर नाही. हे सरळसरळ वर्णलढ्याचे उदाहरण आहे. लढाई आणि प्रेम यांमध्ये काही जरी केले तरी गैर ठरत नाही-अशा अर्थाची जी म्हण आहे, तदनुसार दलित स्त्रियांचे लुगडे फेडीत असताना किंवा त्यांची घरे पेटवीत असताना फलटणच्या हल्लेखोर तरुणांना शिवाजीमहाराजांचे नाव घेण्यात आपण काही भयंकर चूक करीत आहोत असे वाटले नसावे.

भारताच्या संविधानाची सर्व उभारणी समानतेच्या आधारशिलेवर केलेली आहे. म्हणजे जशी ती धर्मनिरपेक्षता मानते, त्याचप्रमाणे ती जाति-लिंग आदी बाबतींतही निरपेक्षता मानते, परंतु भारतात अलीकडे जे घडत आहे, त्यावरून असे दिसते की आम्ही, या लोकसत्तेला मूलाधार असलेल्या तत्त्वालाच हरताळ फाशीत आहोत. आमचा सर्व व्यवहार जणू काही घटनाविरोधातच चालू आहे. धर्मवर्चस्व, जातिवर्चस्व, पुरूषवर्चस्व, यांचा सर्रास उपयोग आपण व्यवहारात करीत असूनही आपण व्यासपीठावरून मात्र सर्व तऱ्हेच्या समानतेची भाषा बोलत असतो. ढोंगी-पणाची कमाल यात आहे की आपल्या 'कथनी आणि करणी' मधील हे भयानक अंतर आपल्याला जरासुद्धा जाणवत नाही ! शीख बांधव सांगणार की भारताचे संविधान आम्हाला मान्य आहे; परंतु आमच्या गुरुद्वारांत राष्ट्रद्रोही जरी एकत्र आले, तरी तेथे पोलिसदल अथवा सैन्य यांनी प्रवेश करता कामा नये. आमचे इस्लामी बांधव असा दावा करणार की आम्ही म्हणू तोच शरीयतचा अर्थ शासनाने आणि न्यायासनाने मान्य केला पाहिजे. आणि आमचे मराठवाडयातले व फलटणमधले हिंदू बांधव म्हणणार की संविधानात काहीही असो आम्ही आमच्या रोजच्या व्यवहारात चातुर्वर्ण्याचाच आग्रह धरणार व दलितांना कदापीही बरोबरीचा दर्जा देणार नाही. अर्थातच या सर्वांच्या पाठीमागे त्यांचे त्यांचे धर्मशास्त्र अथवा त्यांची परंपरा उभी आहे. विशेष नवलाची गोष्ट ही नव्हे काय की भारताची लोकशाही जशीजशी जुनी होत आहे तशीतशी हे परंपरावेड आणि धर्मवेड क्षीण होण्याऐवजी उतत-मातत चालली आहेत ? म्हणजे धर्म पुढे सरत आहेत आणि शासन मागे हटत आहे. सुवर्णमंदिरात अनेक घातक शस्त्रास्त्रे जमविल्याचे सांगण्यात येते, एवढेच नव्हे तर पाकिस्तानचा कोणी एक हस्तक सध्या सुवर्णमंदिरात दडलेला आहे, येथपर्यंतच्या बातम्या कानावर येतात. परंतु बहुमताने निवडून आलेले आणि आज मुख्यमंत्रीपदावर आरूढ असलेले सरदार बर्नाला यांना हात जोडून स्वस्थ बसावे लागत आहे. कारण परंपरा तशी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या शाहबानो प्रकरणातील निकालामुळे इस्लामचे पुरस्कर्ते खवळून उठतात आणि सरकारला मुसलमानांसाठी वेगळा कायदा करण्यास भाग पाडतात. कारण महंमद पैगंबरांच्या आदेशाप्रमाणे इस्लामी समाज चालणार; मग तो भारताच्या संविधानाचा शपथपूर्वक स्वीकार करणारा संसद्सदस्य असो की सामान्य नागरिक असो. उद्या फलटणमधील अतिरेक्यांतर्फे जर कोणी असे सांगू लागला की 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्' असे आमच्या धर्मात कोण्या पैगंबरांनी नव्हे तर परमेश्वरानेच सांगितले आहे आणि त्याने शूद्रांचे समाजातील स्थानही ठरवून टाकले आहे, तर

संविधानाच्या आदेशानुसार त्याला कसे शासन करता येईल ?

मला वाटते की आपले संविधान घडवताना आणि ते स्वीकारताना भारतातील शेकडो परंपरा, संकेत आणि रूढी यांच्याशी संविधानाला झगडा देत देत, संघर्ष करीत करीत पुढे जावे लागणार आहे याची पुरेशी जाणीव दाखवली गेलेली नाही. धर्म, रूढी आणि परंपरा पुढे सरकत आहेत आणि शासन मागे हटत आहे असे जे मी म्हटले, त्याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे राजीव शासनाने घेतलेली तलाक-पीडित स्त्रियांबाबतची भूमिका. समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात आणि भारतात एकात्मता आणण्याच्या बाबतीत शासनाचे म्हणून काही कर्तव्य आहे की नाही, याचा एकदा पक्का निर्णय व्हावयास हवा. इस्लाम मानणाऱ्यांसाठी जे विधेयक संसदेपुढे मांडण्यात आले आहे, त्याचा विचार करण्यासाठी राजीव गांधींनी संसदसदस्यांसमोर जे भाषण केले, ते मला विस्मयकारक वाटले आणि खेदजनकही. त्यांच्या भाषणाचा आणि त्यांच्या शासनाकडून मांडण्यात येणाऱ्या विधेयकाचा सरळ अर्थ असा आहे की भारतामध्ये समान नागरी कायदा कधीही होणार नाही. याचाच अर्थ असा की हे महत्वाचे सूत्र जवळ जवळ निकाली काढण्यात आले आहे. संविधानात प्रत्यक्ष बदल घडवून न आणता त्याला या विधेयकाद्वारा कायमचा शह देऊन ठेवलेला आहे. आपल्या पक्षाच्या संसदसदस्यांसमोर आपली बाजू मांडताना राजीव गांधींनी असा एक मुद्दा मांडला आहे की क्रि. प्रो. च्या १२५ आणि १२७ कलमांप्रमाणे मुस्लिम स्त्रियांना न्यायासाठी फार काळ तिष्ठत बसावे लागत होते, त्याऐवजी आता त्यांना ३० दिवसांत न्याय मिळेल. हे विधेयक जर राजीव गांधी म्हणतात त्याप्रमाणे मुस्लिम स्त्रियांना न्याय जलद मिळवून देणार असेल, तर मग ते सर्वच स्त्रियांच्या बाबतीत लागू का करू नये ? मग त्याला 'मुस्लिम महिला तलाकोत्तर हक्क संरक्षण विधेयक' असे म्हणण्याचे कारण तरी काय ? खरे तर या बिलाने मुस्लिम पुरुषांच्या हक्काचे रक्षण होणार आहे ! परंपरेने चालत आलेला वर्णीय अहंकार आणि त्याच्या जोडीला लोकशाही संख्याबलामुळे प्राप्त झालेली सत्ता यांची विचित्र सांगड भारतातील सर्व राज्यांत निर्माण झालेली आहे. ती जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत भारतातील दलितांना चिंताग्रस्त अवस्थेतच जीवन कंठावे लागेल, पण जर त्यांना खरे स्वातंत्र्य व समता प्राप्त करून घ्यावयाची असेल, तर त्यांना वरिष्ठ वर्गीयांशी संघर्ष करावयाची तयारी ठेवावी लागेल. असे संघर्ष जेव्हा उभे राहतील, त्यावेळी वरिष्ठ वर्गातील समाज परिवर्तनवाद्यांची अग्निपरीक्षा होणार आहे. कारण शासनच जर स्वत: रूढीनिष्ठ सामाजिक गटांचे कैवारी बनले तर या देशातील अनेक समाज आपापल्या रूढींना कायद्याची प्रतिष्ठा प्राप्त करून

घेण्यास पुढे येतील. समतेवर आधारलेल्या भारतीय लोकशाहीचेच स्वरूप, ही प्रक्रिया जर अशीच चालू राहिली तर, पार विद्रूप बनून जाईल. गेल्या शंभर-दीडशे वर्षात मानवी मूल्ये भारतामध्ये प्रस्थापित करण्यासाठी ज्यांनी जिवापाड मेहनत केली आणि 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही, मानियले नाही, बहुमता' या वचनाप्रमाणे जे वागले, त्यांचे आणि आपणच बनवलेल्या संविधानाचेही आपण हसे केल्यासारखे होईल.

फलटणसारख्या या घटनांमधून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो तो असा की अशा घटना जर घडत राहिल्या, तर ज्यांना त्यामुळे दारूण शारीरिक आणि मानसिक यातना सहन कराव्या लागतात, त्यांना आपल्या समाजाबद्दल, धर्माबद्दल आणि राष्ट्राबद्दल आपलेपणा काय म्हणून वाटावा ? समाजप्रेम,देशप्रेम अथवा धर्मप्रेम हे काही स्वयंभू मूल्य आहे की ते परिस्थितिसापेक्ष मूल्य आहे ? माझ्या मते ही सर्वमूल्ये परिस्थितिसापेक्ष आहेत, कोणतीही व्यक्ती अथवा गट रोजच्या रोज बहिष्कृताचे जीवन जगत असताना समाजनिष्ठ अथवा देशनिष्ठ होऊच शकणार नाही, असे माझे मत आहे. भारतामध्ये खऱ्या अर्थाने कोणताही हक्क अथवा प्रतिष्ठा नसलेले कोटयावधी लोक जर आपण राहू दिले, तर ते अंतिम राष्ट्रहिताच्या दृष्टीने हिताचे ठरेल की अहिताचे, याचाही विचार सर्वांकडून गंभीरपणे व्हावयास हवा. ज्या स्त्रियांचा विनयभंग १५ जानेवारीच्या रात्री फलटणमध्ये झाला, त्यांना धीर देण्यासाठी महाराष्ट्रातल्या क्रांतिकारक महिलाही पुढे आल्याचे दृश्य पहावयास मिळालेले नाही. आपली अब्रू कोणीही केव्हाही घेऊ शकतो, असे ज्या स्त्रीला अथवा पुरुषाला वाटेल, तिला अथवा त्याला धर्मांतर करावे, जरूर तर देशांतरही करावे, असे का वाटणार नाही ? भारताच्या इतिहासात अशा प्रकारचे प्रश्न शतकानुशतके उपस्थित झालेले आहेत. परंतु त्यांपासून काही बोध घ्यावयाचाच नाही असा निर्धार ज्या आंधळ्यांनी केला आहे, त्यांना कोण समजावू शकणार ?

***



येशूचा वधस्तंभ

मी जेव्हा बायबलातील जुन्या करारातून नव्या करारात प्रवेश केला तेव्हा मला हे पटले की येशूला क्रूसावर ठार मारण्यावाचून तत्कालीन प्रस्थापित ज्यू समाजाला गत्यंतरच राहिलेले नव्हते. कारण बायबलातील जुन्या आणि नव्या संहितांमधील भूमिका इतक्या भिन्न आहेत की अब्राहम-मुसापासून चालत आलेल्या धर्मकल्पनांशी येशूच्या धर्मकल्पनांचा सांधा जोडून घेणे आजही अशक्य वाटावे. जुन्या करारामधील धर्मविषयक कल्पना म्हणजेच ईश्वरविषयक आणि कर्मकांडविषयक कल्पना, कोणत्याही अन्य भटक्या जमातीच्या धर्मकल्पनांप्रमाणेच ढोबळ व उथळ वाटतात. पशुबली, पुरुषप्रधान संस्कृती, स्त्री म्हणजे केवळ प्रजोत्पादनाचे साधन, देवाची अनिर्बंध सत्ता, सामाजिक अस्थैर्य, टोळीगणिक राज्ये आणि जगाचे अतिशय मर्यादित ज्ञान अशी जुन्या करारातील ज्यू समाजाची अवस्था होती. डेव्हिड अथवा सॉलोमनसारखे जे नृपती ज्यूमध्ये होऊन गेले ते सत्ताकलह, वैभव आणि सुखोपभोग यांत सदैव निमग्न झालेले दिसतात. सॉलोमनची गीते म्हणून जो भाग जुन्या करारात समाविष्ट केलेला आहे, तो वाचीत असताना मला हाल्लाच्या सप्तशतीमधील शृंगारिक काव्यांची आठवण झाली. ज्याला आपण तत्त्वज्ञान अथवा वेदान्त म्हणतो तशा तऱ्हेच्या विवेचनाचा किंवा सिद्धान्तांचा जुन्या करारामध्ये मागमूसही सापडत नाही.

नव्या करारामध्ये प्रारंभी देवाने सृष्टी कशी उत्पन्न केली, ती किती दिवसात उत्पन्न केली इत्यादी विषयांसंबधी काहीच उल्लेख केलेला नाही. अब्राहमपासून येशूपर्यंत बेचाळीस पिढया झाल्या असा उल्लेख करून ज्यांनी ज्यू समाजावर पूर्वी सत्ता गाजवली त्या वंशाशी येशूचा संबंध जोडून दिल्यानंतर लगेच त्याच्या जीवनचरित्राची कहाणी सुरू होते. येशूचा बाप्तिस्मा वनवासी जॉनकडून झाल्यानंतर येशूने लगेच तपश्चर्या आरंभली. सैतानाच्या कारवायांना तो बळी पडला नाही आणि त्यानंतर थोडयाच काळाने त्याने आपले विचार जनतेसमोर मांडण्यास सुरवात केली असे मॅथ्यूच्या बखरीवरून दिसते. त्या वेळी येशूचे वय काय होते, तो कोठे वाढला, कितपत शिकला याचा काहीच उल्लेख नव्या करारात आढळत नाही. प्रथम प्रथम आपल्या प्रवचनांमधून येशू जरी असे म्हणत होता की, मी देवाचे काम पूर्ण करण्यासाठी आलो आहे, नष्ट करण्यासाठी नव्हे, तरी पुढे त्याला जसजसा अनुभव येत गेला तसतसा त्याच्या प्रतिपादनात बदल होत गेला आणि त्याचे उद्गार

अधिकाधिक प्रखर होत गेले. येशूला असा अनुभव येत गेला की ज्यू समाजातील प्रस्थापितांचा म्हणजेच जहोवाचे देऊळ आणि देवळाच्या अनुषंगाने वाढलेला पुरोहितांचा आणि श्रेष्ठींचा वर्ग नष्ट केल्यावाचून आपल्याला अभिप्रेत असलेले 'देवाचे राज्य' (**Kingdom of God**) प्रस्थापित करणे अशक्य आहे. जेरूसलेमच्या व इतर ठिकाणच्या मंदिरामध्ये जाऊन तेथे आपले विचार येशूने मांडले. परंपरागत चालत आलेल्या बलिदानासारख्या कर्मकांडाचा धिक्कार करून पाहिला. त्याने पुरोहितांवर व धनिकावर घणाघाती टीकाही केली. 'सुईच्या नेढयातून एक वेळ उंटही जाऊ शकेल; पण धनिकाला स्वर्गाच्या दारातून प्रवेश करता येणार नाही.' अशीही कडक भाषा त्याने वापरली. पण या त्याच्या उपदेशाचा परिणाम पालथ्या घडयावरील पाण्याइतकाच होत असे. बाहेरचा जनसमुदाय मात्र त्याच्यामागे झपाटल्यासारखा धावत होता. गॅलिलीच्या समुद्राच्या काठचे मच्छिमार, आणि कॉपरनॉमसारख्या गावातील सर्वसामान्य लोक, स्त्रिया-पुरुष तरूण-वृद्ध व मुले, त्याच्याभोवती जमत. मुलांत तर तो फारच रमत असे; पण ही सर्व गर्दी आपण जे चमत्कार करतो त्यासाठी जमत असते, आपले विचार ग्रहण करण्यासाठी नाही, हे येशूच्या लक्षात येऊन तो अनेकावर जनसंमर्दाला सोडून एकांतात जाऊन बसत असे. शेवटी या धर्ममंदिराचा चिरा नि चिरा उलथल्यावाचून राहणार नाही अशा अर्थाची परखड भाषा तो जेव्हा बोलू लागला तेव्हा त्या मंदिरांच्या सावलीत आपापल्या स्वार्थाच्या टपऱ्या घालून बसलेल्या ज्यूंनी त्याला जगातून नाहीसा करून टाकण्याचे ठरवावे यात नवल ते काय ?

येशू खेडयापाडयात आणि वस्त्यावस्त्यावर आपले विचार सांगत फिरत होता. लोकप्रिय होत होता, सदाचरणाचा उपदेश करीत होता तोपर्यंत विशेष काही बिनसत नव्हते. ते श्रेष्ठींना परवडण्यासारखे होते. सदाचरणाचे असले घुटके बहुजनसमाजाला कोणीतरी पाजीत असावे असे प्रस्थापितांना सुध्दा वाटत असते ! बहुजनसमाज जितका समजूतदार, इमानी आणि विनम्र होईल तितके बरेच असते. कारण तेवढयाने त्यांच्या हितसंबंधांना बाधा उत्पन्न होत नाही. सामान्यजन जितके अधिक देव देव करतील तितके देवळांचे व पुरोहितांचे प्रस्थ वाढत जाते. पण गाव भाग सोडून येशू जेव्हा देवळाच्या आवारात घुसला, तेथील दुकानदार, सावकार, यांनाच हुसकण्याच्या गोष्टी करू लागला आणि पुरोहिताशी व धर्ममार्तंडांशी वाद घालू लागला, शतकानुशतके त्यांनी सांभाळलेल्या प्रथांना आव्हान देऊ लागला तेव्हा या माणसापासून समाजव्यवस्थेला धक्का लागण्यापूर्वीच त्याचा काटा काढला पाहिजे असा निर्णय श्रेष्ठींनी घेतला.

जुन्या नव्यातील संघर्ष जेव्हा अशा बिंदूपर्यंत येऊन पोचतात की जेथे दोहोंपैकी कोणीतरी एकच राहू शकतो तेव्हा घ्यावे लागणारे निर्णय नेहमी कडकच असतात. पाप-पुण्याच्या, धर्माधर्माच्या कल्पनाच येशू नव्याने मांडीत नव्हता तर त्या कल्पना ज्या समाजरचनेच्या आधारे जगत होत्या ती देऊळ संस्कृती त्याच्या पुरोहितवर्गासकट नष्ट होण्याचा क्षण प्राप्त झाला होता. अशा वेळी लागणारे ऐहिक पाठबळ येशूपाशी नव्हते. बहुजन समाजातून आपल्याकडे आलेले पीटरसारखे आपले शिष्यही ऐन प्रसंगी आपल्याला साथ देणार नाही हे येशू ओळखून होता. त्याने तसे बोलूनही दाखवले होते आणि शेवटी घडलेही तसेच. येशू एकटाच जागेवर उरला ! आणि त्यालाच आपला सूळ खांद्यावर घेऊन वधस्थळापर्यंत आपल्या पायांनी चालत जावे लागले.

कोणत्याही काळातले क्रांतिकारक विचार समाजधुरीण किती मर्यादेपर्यंत समजून घेतात याचा शोध घेणे उद्बोधक ठरेल. ज्ञानदेवांनी रेडयाकडून वेद वदवले तेव्हा पैठणचे पंडित चकित झाले. पण त्यांनी ज्ञानदेवादिकांना फार कडक शिक्षा केली नाही. माझ्या मनात असा विचार आला की ज्ञानदेवांनी रेडयाऐवजी चार महार मुलांकडून जर वेदोच्चार करून घेतला असता तर ? तर मग त्या भावंडाना त्यांचे वडील विठ्ठलपंत ज्या मार्गे गेले तो मार्ग पत्करावा लागला नसता काय ? मग इंद्रायणी काठी प्रतिवर्षी एवढा भक्तसमुदाय पाहावयास मिळाला असता काय ? मग ज्ञानदेवे रचिला पाया असे घडले असते काय ?

येशूच्या मृत्यूनंतर ऐन वेळी पळून गेलेले त्याचे शिष्य परत एकत्र झाले. त्यांनी येशूचा पुण्य पण अरुंद मार्ग रुंद करण्यासाठी प्रयत्न चालवले. पण त्या चिंचोळ्या पायवाटेचे राजरस्त्यात रुपांतर तेव्हा झाले, की जेव्हा येशूच्या दर्शनामागे राजसत्ता उभी राहिली. मग पूर्वीच्या यज्ञ स्थंडिलावर खुद्द येशूचे व मेरी आईचे पूर्णाकृती पुतळेच स्थापले गेले. येशूचा क्रूसावरचा रक्तबंबाळ नग्नप्राय देहच धर्मध्वज बनला आणि त्याच्यावर सोने-रुपे चढले. रत्ने जडवली गेली आणि जेहोवाच्या अथवा बाबिलोनच्या मंदिराहून वरचढ भव्य उत्तुंग मंदिरे चर्च म्हणून उभारली गेली. ख्रिस्तासाठी रक्ताचे पाट वाहवण्यात आले आणि माणसांच्या पायांत गुलामीच्या बेडया पडल्या. केवळ देवाचे राज्य प्रस्थापित व्हावे म्हणून !

ही शोकांतिका केवळ येशू दर्शनाची नाही. धर्माची व सत्तेची युती झाल्याशिवाय धर्मतत्त्वांच्या सांगाडयावर अनुयायांचे मास चढत नाही आणि ज्यावेळी धर्म पुष्ट झाला असे दिसू लागते त्याच वेळी त्याचा ऐन तात्त्विक गाभा सडू लागलेला असतो असा अनुभव सर्व दर्शनांच्या बाबतीत येतो. बौध्द धर्माचा

स्वीकार सम्राट अशोकाने केला; झोरोस्टर दर्शनाचा स्वीकार इराणचा राजा विष्टास्प याने केला; ख्रिस्त दर्शनाचे अनुयायित्व रोमच्या बादशहाने पत्करले आणि पैगंबर महम्मदानी तर स्वत:च शासनाची धुरा हाती घेतली ! त्यामुळे त्या धर्माचा गाजावाजा त्रिखंडात झाला खरा, पण त्यातील दार्शनिक कस झिजू लागला, नष्टप्राय झाला असे मला वाटते.

येशूच्या जीवनाबद्दल असलेली माहिती फार त्रोटक स्वरूपाची आहे. मॅथ्यू, जॉन, ल्यूक इत्यादी त्याच्या शिष्यांनी त्याचा संदेश जगाला पोचवण्यासाठी येशूची वचने त्यांना आठवली तशी एकत्र केली आणि त्यांना जोडून येशूच्या चरित्राविषयी त्यांनी थोडीफार माहितीही दिली. पण त्यामध्ये एकवाक्यता नाही. उदाहरणार्थ येशू जन्मला तेव्हा मेरीच्या मांगराला पूर्वेकडूनआलेल्या ज्ञात्यांनी मौल्यवान वस्तू भेट म्हणून दिल्या असे मॅथ्यू म्हणतो. पण सेंट ल्यूकच्या निवेदनात बाळ येशूचे दर्शन आसपासच्या धनगर मंडळीनी प्रथम घेतले असे म्हटलेले आहे. तसेच बैथलहेम-मध्ये तुझा प्रतिस्पर्धी जन्माला येणार असे भविष्य राजा हेरॉडला भगतांनी सांगितले होते म्हणून तो बेथलहेमच्या सर्व नवजात अर्भकावर पाळत ठेवून होता. पण येशूच्या बापाला साक्षात्कार होऊन या अर्भकाला घेऊन इजिप्तमध्ये निघून जा असा आदेश आधीच मिळाला. त्याप्रमाणे बाळ येशूला हेरॉडच्या मृत्यूपर्यंत इजिप्तमध्ये ठेवले होते असे मॅथ्यू सांगतो. तो असेही सांगतो की, येशूचा नक्की ठावठिकाणा कळेना म्हणून राजाने बेथलहेमच्या पंचक्रोशीतली सर्वच बालके मारून टाकली. हा कथाभाग येशूच्या सर्व चरित्रकारांनी दिलेला नाही. येशूचे शिक्षण झाले की न झाले, तो प्रवचने करू लागण्यापूर्वी कोठे गेला होता, त्याचा काहीच उल्लेख आढळत नाही. येशू काश्मीरमध्ये येऊन विद्यासंपन्न झाला अशीही दंतकथा ऐकावयास मिळते. तिचा उल्लेख लो. टिळकांनी गीता रहस्यात केलेला आहे. येशू आणि जॉन हे दोघे प्रेषित आणि दोघेही समकालीन. जॉनचा जन्म येशूच्या आधी केवळ सहा महिने झाला. येशू कुमारी आईच्या पोटी तर जॉनचा जन्म गर्भक्षमता नष्ट झालेल्या एलिझाबेथच्या पोटी. वयाने जरा मोठा असलेला जॉन येशूचा पारमार्थिक अधिकार आपल्याहून मोठा आहे हे स्वत: गर्भात असल्यापासून ओळखून होता, इत्यादी कथाभाग इतर पौराणिक कथांसारखाच आहे. त्यात पुढे येशूने आंधळ्यांना दृष्टी दिली, पांगळ्यांना पाय दिले, तो सागरावरून चालला अशा अनेक चमत्कारांची भर पडत गेलेली आहे, तथापि या सर्व आख्यायिकांचा चोथा दूर करून पाहू लागले की हे स्वच्छ लक्षात येते की येशूचा श्रोतृसमुदाय निराळा होता, तो प्रामुख्याने बहिष्कृतांचा, तिरस्कृतांचा व दलितांचा होता. त्याचे

बोलणे सरळ रोखठोक व अन्तरीच्या तळमळीचे होते. परंपरागत धर्मकल्पनांवर घणाघात करावे लागणार हे तो जाणून होता, व तसे प्रहार तो करीतही होता. शेवटी ह्या नवविचारांची किंमत स्वत:चे प्राण देऊन आपणाला मोजावी लागणार, त्या प्रसंगी आपला एकही शिष्य आपल्या पाठीशी राहणार नाही, याचीही त्याला कल्पना होती. येशूच्या निर्भय थोरवीची व स्थितप्रज्ञतेची पुरेशी साक्ष यातच मिळते.

येशूच्या काळी जेरूसलेमच्या प्रदेशावर अधिसत्ता होती ती टायबेरियस सीझरची म्हणजेच रोमन सम्राटाची. त्याच्यातर्फे गव्हर्नर म्हणून पाँटिअस पायलट कारभार हाकीत होता. रोमन सत्तेविरूद्ध येशूने ब्रही उच्चारलेला नाही. उलट सीझरचे सीझरला द्या आणि देवाचे देवाला द्या असे सूत्रमय वाक्य त्याच्या तोंडी घातलेले आढळते. याचा अर्थ उघड आहे की येशूने सुरू केले होते ते धर्मयुध्द होते, सत्तायुद्ध नव्हते. यज्ञयागांच्या रूपाने प्रस्थापित झालेल्या ब्राह्मणांच्या वर्चस्वाला बुद्धाने आव्हान दिले असले तरी राजसत्तेला त्याने कधीच आव्हान दिले नव्हते, त्याची येथे आठवण होते. म्हणूनच पायलट पुढे जेव्हा येशूला ज्यू शिष्टमंडळाने उभे केले तेव्हा त्याने कोणताच गुन्हा केलेला नाही असे त्याने उद्गार काढले आणि तुम्ही त्याला काय शासन करायचे ते करा असे तो म्हणाला. ज्यू जमातीच्या पंचांच्या हाती त्या काळी राजकीय नसली तरी जमातीपुरती बरीच स्वायत्तता असावी असे दिसते. त्यांनीच येशूला सुळावर चढवावे असा आपला निर्णय सांगितला आणि त्याच्या बदल्यात बाराबास नामक चोराची शिक्षा रोमन राज्यपालाकडून माफ करून घेतली. त्यांच्या दृष्टीने चोऱ्या करणाऱ्या बाराबासपासून त्यांच्या वर्चस्वाला काहीच धोका नव्हता; पण येशू यज्ञ, बळी, पिढीजात पुरोहितपणा करणारे पुजारी (लेव्हीकुळ) मंदिर व त्याच्या परिसरातील शेट-सावकार, गुंड-पुंड, वेश्या सगळ्यांचेच उच्चाटन व्हायला हवे, कारण प्रचलित धर्म हा देवाचा धर्मच नव्हे असे जळजळीत पाखंडाचे निखारे सगळीकडे पेरीत चाललेला नव्हता काय ? त्याला एकदा सुळावर चढवला की सगळे पाखंड थंड होईल हा त्यांचा अंदाज होता. तो खरा ठरला.

येशूच्या जन्माच्या अगोदरपासून तत्रस्थ समाजात खूप घालमेल चालू होती हे मात्र निश्चित. जुन्या करारातील शेवटच्या प्रकरणात (पहा : झेकारिया, मलाच्छो) कोण्या तरी प्रेषिताच्या अवताराच्या सूचना नमूद केलेल्या आहेत. 'देवाचे राज्य येत आहे,' 'पापाचरण बंद करा' असे इषारे ठायी ठायी आढळतात. यावरून तत्कालीन ज्यू समाजाच्या अधोगतीची कल्पना करता येते. येशूच्या काळात बौद्ध धर्म तेथे पोचलेला असो वा नसो. भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र याच्या किनारपट्टीतल्या

इटली, इजिप्त, जुडिया व अरबस्थान येथील रहिवाशांना तेव्हा भारताची बरीच ओळख झालेली होती यात शंकाच नाही. तेर, कोल्हापूरसारख्या ठिकाणच्या उत्खननात रोमन दारूचे कुंभ, काचमणी सापडतात त्यावरून सुद्धा हे दिसून येते. बरे, हा व्यापार एकतर्फी नव्हता, हे व्हर्जिलच्या एनिडमध्ये भारताचे दोनदा उल्लेख येतात आणि त्यापैकी एकामध्ये भारतीय हस्तिदंताचा उल्लेख येतो त्यावरूनही सिध्द होते. त्या काळात ज्यू लोकांमध्ये अनेक धर्मनिषिद्ध देवदेवतांची पूजा चाले हे तर निर्विवाद आहे, सालोमनच्या ७०० पत्नी व ३०० नाटकशाळा असून त्यांच्या नादाने सालोमनने निरनिराळ्या दगडी, लाकडी व धातूच्या देवतांची मंदिरे बांधल्याचा उल्लेख जुन्या करारात सापडतो. जेरेमियाच्या प्रकरणात तर दूर देशांतून आलेल्या उसाचाही उल्लेख येतो ! ज्यू धर्मानि ज्या देवदेवतांना निषिध्द मानले त्यांची उपासना ज्यू स्त्रिया करीत. त्या प्रथेला उद्देशून जेरूसलेम नगरीला जुन्या करारात बाजारबसवी वेश्या, व्यभिचारी **(harlot, whore)** अशा चक्क शिव्या हासडलेल्या आहेत. उपरान्त रोमचे शासन तेथे आले आणि त्याच्या अनुषंगाने रोमन देवही आले, भाषा आली. ग्रीक भाषा व देव तर पूर्वीपासून प्रचारात होतेच. क्रूसाची शिक्षा झालेल्या येशूचा क्रूसावर, त्याचा परिचय करून देणारा जो फलक लिहिलेला होता तो 'नाझारेथचा येशू-ज्यूंचा राजा' असा असून तो पायलटने ग्रीक, लॅटिन व हिब्रू अशा तीन भाषांमध्ये लिहवून घेतलेला होता असे सेंट जॉन सांगतो. यावरून तेथील त्रिभाषिक समाजाची कल्पना करता येते. अशा प्रकारे खिचडी झालेल्या त्या समाजात आणि आंतरराष्ट्रीय रहदारीच्या मार्गावरील त्या प्रदेशात बुद्धाचे विचार पोचले नसतीलच अशीही हट्टी भूमिका कोणी घेण्याचे कारण मला दिसत नाही. ते कसेही असो, येशूचे विचार ज्यू धर्मपरंपरेतून सहजासहजी उगवलेले भासू नयेत इतका वेगळेपणा व ताजेपणा त्यामध्ये होता याबद्दल शंका उरू नये. हिंदू, बौध्द, ईसाई अथवा इस्लाम यांचा विचार करताना जी एक आश्चर्यकारक गोष्ट लक्षात येते ती अशी की ईश्वराचे अस्तित्व, पुनर्जन्म, पाप-पुण्य याविषयी त्यांच्यात कितीही मतभेद असले तरी ते सर्व अवतारवादीच होते. चार कर्त्यासवरत्या, शहाण्या माणसांनी एकत्र बसून धर्मप्रवर्तन अथवा समाजप्रवर्तन केले असे त्यापैकी कोणीच मानलेले नाही ! त्याचमुळे हे सर्व धर्म पुढे जाता नृपसत्तेचे समर्थक बनले असावेत. कारण आकाशात जसा ईश्वर तसा भूमीवर नृपती !

येशूला जुन्या करातील धर्मविषयक विचारापेक्षा सर्वस्वी निराळे असे विचार मांडण्याची प्रेरणा बुद्ध धम्मासारख्या विचारप्रणालीपासून मिळाली की काय अशी

शंका आत्तापर्यंत अनेकांनी व्यक्त केलेली आहे आणि अशा विद्वानांमध्ये काही पाश्चात्य विद्वानांचाही समावेश आहे हे लक्षात घेतले पाहिजे. येशूच्या आधी पाच-सहा शतके गौतम बुद्ध होऊन गेले आणि इसवी सनापूर्वी तीन शतके आधी होऊन गेलेल्या सम्राट अशोकापासून बुद्ध धम्माच्या प्रचाराला प्रचंड वेग प्राप्त होऊन बौध्द भिक्षूंनी भारताच्या पूर्वेला चीन, कोरिया, जपान, सयाम, जावा, सुमात्रा, ब्रह्मदेश तर दक्षिणेला श्रीलंका आणि पश्चिमेला अफगाणिस्तान, इराण व भूमध्य-समुद्रावरील किनारपट्टी येथपर्यंत आपली धर्मविषयक मते पसरविली होती हे आता ऐतिहासिकदृष्ट्या सिध्द झालेले आहे. मात्र लोकमान्य टिळकांनी आपल्या गीतारहस्यात याबद्दल केलेल्या विवेचनात मृतसमुद्राजवळ धम्ममतासदृश्य मते स्वीकारलेल्या ज्या एसी पंथीय लोकांबद्दल उल्लेख करताना मॅथ्यू, जेम्स आणि कृत्ये या नव्या करारातील प्रकरणांचा संदर्भ दिला आहे. (गीतारहस्य पृ. ५८३) तो संदर्भ मला नव्या करारात कोठे सापडू शकला नाही. परंतु तसा संबंध प्रस्थापित करता आलाच पाहिजे, त्याशिवाय येशूच्या अभिनव विचारांची उपपत्ती लावता येणार नाही असे समजण्याचेही कारण नाही. भारतामध्ये यज्ञसंस्थेचा आणि चातुर्वर्ण्याचा सर्वत्र जोर असताना गौतमाला जर निरीश्वरवादी धम्माची भूमिका स्वयंप्रज्ञेने सुचली तर येशूलाही ती त्याच प्रकारे का सुचू नये ? येथे एवढेच लक्षात घ्यायचे की नव्या करारातील येशूचे प्रतिपादन जुन्या करारातील विचारसरणीला अजिबात मिळते-जुळते नसून येशूचे प्रतिपादन ही एक स्वतंत्र विचारधारा आहे आणि ती विचारधारा प्रतिपादन केल्याबद्दलच त्याला सुळावरचे मरण पत्करावे लागले. क्रान्तिकारकाला, मग तो राजकीय क्षेत्रातला असो की सामाजिक क्षेत्रातला असो, ह्या सुळाचे भान ठेवावेच लागते !

***

प्लेटोचा आदर्श समाज

प्लेटोचा 'रिपब्लिक' (लोकशासन) हा ग्रंथ जगभर गाजलेल्या ग्रंथापैकी एक आहे. तो वाचीत असता अनेक विचार मनात गर्दी करतात. प्लेटोच्या गुरूभक्तीचे दर्शन यामधून घडते ते अशामुळे की, यातील बहुतेक प्रतिपादन हे त्याने आपला गुरू जो सॉक्रेटिस, त्याच्या तोंडी घातलेले आहे. विषयाची मांडणी करण्याची त्याची पद्धतीही मला अनोखी वाटली. कारण विषय अतिगंभीर स्वरूपाचे असूनही त्यांचे प्रतिपादन संभाषणाच्या द्वारे केलेले आहे. सॉक्रेटिसाने प्रशंसिलेल्या 'डायलेक्टिक पद्धती'ने, म्हणजे पूर्वोत्तर पक्षाच्या पद्धतीने त्यांची मांडणी केलेली आहे. भगवद्गीतेतसुद्धा प्रारंभीच्या अध्यायांत अशीच मांडणी जरी केलेली दिसत असली, तरी पुढे पुढे त्याचे संवादात्मक रूप टिकून राहात नाही. 'रिपब्लिक' मध्ये मात्र अखेरपर्यंत संवाद आहेत आणि त्यांत सहभागी होणाऱ्या सॉक्रेटिस, थ्रेसिमॅक्स, ग्लुकॉन, आदिमँन्टिस आदी ज्या व्यक्ती आहेत, त्यांच्यांतील समभाव कुठेही लुप्त होऊ दिलेला नाही. म्हणजे सॉक्रेटिस सांगतो आणि बाकीचे निमूटपणे ऐकतात, असे दृश्य त्यात कोठेही नाही ! परस्परांचे मुद्दे आवेशाने खोडून काढणे, असे करीत असताना सॉक्रेटिसवर सरळसरळ हल्ला चढविणे, त्याचा क्वचित् उपहास करणे, असे खटक्याचे प्रसंगही त्यात वर्णन केलेले आढळतात. 'मिलिंद प्रश्ना'त असे काहीसे चित्र दिसते. पण मिलिंद राजा हा मूळचा यवन म्हणजे ग्रीक होता आणि नागार्जुन हा गौतम बुद्धाचा शिष्य होता; या कारणामुळेही कदाचित मिलिंद प्रश्नाचे प्रश्नोत्तर-स्वरूप अखेरपर्यंत टिकून राहिले असेल.

लोकशासनाचा भार वाहणारा जो चालकवर्ग या प्रतिपादनात गृहीत धरलेला आहे, त्याला प्रशिक्षित करीत असताना सॉक्रेटिसाने अंकगणित, भूमिती, घन-भूमिती यांवर भर दिलेला आहे. काव्य-संगीतादी विषय येतात पण ते दुय्यमस्थानी. गणितासारख्या विषयांच्या अभ्यासातून जगाचेमूल द्रव्य अथवा तत्त्वचअसा जो आनंद त्याची प्राप्ती होते म्हणून त्या विषयांचा अभ्यास पालकवर्गाकडून म्हणजे २० ते ३५ च्या वयोगटातील निवडक युवायुवतींकडून करून घेतला पाहिजे-असा जो आग्रह धरला आहे, त्यावरून त्याचे विचार आपल्याकडील सांख्य विचारांशी जुळते होते की काय असा विचार मनात आला. सॉक्रेटिसची आनंदा (गुड) विषयीची कल्पना आपल्याकडील सच्चिदानंदाच्या कल्पनेसारखी वाटते. कारण

तो आनंद 'शब्दातीत आहे, केवळ मनोगम्य आहे' असे तो सांगतो. ज्ञान आणि सत्य ही त्या अंतिम तत्त्वाची व्यक्त स्वरूपे असली तरी ते तत्त्व या दोहीहून श्रेष्ठ आहे, खडतर मानसिक तयारीनंतर प्रकाशित होणारे ते तत्त्व आहे; शब्दाने त्याचे वर्णन करता येणार नाही, अशी सॉक्रटिस-प्लेटोची भूमिका आहे. 'फिलॉसॉफर किंग' या अठराव्या अध्यायापासून पंचविसाव्या अध्यायापर्यंतचे वाचन करीत असताना तर अनेक वेळां गीतेतील प्रतिपादनाची आठवण होते. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' असे स्वमुखाने सांगणाऱ्या कोण्या भगवंताचा उल्लेख सॉक्रेटिस जरी करीत नसला, तरी त्याचा दैवावर तसाच जन्मजात गुणावरही विश्वास होता, असे दिसते. दहाव्या अध्यायातील 'शास्त्यांची निवड' या प्रकरणात समाजातील तीन वर्णांचा स्पष्ट उल्लेख असून ज्यांच्या मातीमध्ये सोन्याचे प्रमाण अधिक असेल ते शास्ते; रुपे अधिक आहे ते उपशासक आणि ज्यांच्यात कासे अधिक आहे ते कास्तकार, कारूनारू इत्यादी : अशी वर्णव्यवस्था मान्य केलेली दिसते. स्वतःच्या चालू युगाला 'लोहयुग' 'कलियुग' म्हटले आहे ! गीतेमधील अर्जुनाप्रमाणेच सॉक्रेटिसालाही वर्ण-संकराची धास्ती वाटते.

प्लेटोचा जन्म ख्रिस्तपूर्व वर्ष ४२८ आणि मृत्यू ख्रिस्त पूर्व वर्ष ३४८ असे मानले जाते. सॉक्रेटिस हा त्याचा गुरू म्हणजे त्याचा काल ख्रि. पू. ५ व्या शतकात धरला तर तो होमरच्या नंतर (ग्रीसमधील आद्य कवी) चार-साडेचारशे वर्षांनी होऊन गेला असे अनुमान काढता येते. म्हणजे गीता दर्शन आणि बौद्ध दर्शनानंतरचा सॉक्रेटिसाचा काळ आहे हे निश्चित. म्हणून गीतेपासून बुद्धाच्या काळापर्यंत समाजविषयक व तत्वज्ञानविषयक जे आचारविचार भारतात रूढ झालेले होते, त्यांचे हे प्रतिबिंब असावे अथवा भारतीय समाजाच्या विकास अवस्थेसारखीच ग्रीसमधील समाजविकासाची अवस्था झाल्यावर समान परंतु स्वतंत्र असे विचार सॉक्रेटिस व प्लेटो यांना सुचले असावेत; यांपैकी कोणतेही अनुमान काढता येण्यासारखे आहे. समाजाच्या ऐहिक विकासाच्या दृष्टीने त्याच्या विचारप्रवासांचा ज्यांना अभ्यास करावयाचा आहे, त्यांना प्लेटोच्या 'लोकशासन' या प्रबंधातील व भारतीय तत्त्वज्ञानातील हे विचारसादृश्य लक्षणीय वाटेल. अशी साम्ये दाखविण्याची स्थळे या ग्रंथात अनेक आहेत. तत्त्वज्ञानी नृपाची कल्पना तर मला विदेही जनकाच्या वर्णनाची आठवण करून देणारी वाटली.

सॉक्रेटिसाच्या वादचातुर्याची पुरेपूर कल्पना या ग्रंथावरून उत्तम प्रकारे येते. एखाद्या विषयाचा पाठलाग तो एखाद्या अव्वल शिकाऱ्याने सावजाचा पाठलाग करावा, तशा प्रकारे करतो. प्रतिपक्षाचे म्हणणे त्याला पूर्णपणे मांडू द्यावयाचे म्हणजे

कबड्डीच्या परिभाषेत त्याला 'खोल पाणी' द्यावयाचे, प्रतिपक्षाने आपल्याबद्दल तिरस्कार दाखविला अगर निंदानालस्ती केली, तरी आपली नम्रता व ऋजुता सोडायची नाही; आपण जवळ जवळ हरणार अशी सामनेवाल्याची समजूत होऊ द्यावयाची आणि मग हळूहळू एकेक प्रतिप्रश्न उभा करून त्याचे प्रतिपादन त्याच्यावरच उलटवायचे आणि नंतर दरवेशी अस्वलाच्या नाकात वेसण घालून जसा त्याला आपल्या मागोमाग चालायला लावतो किंवा आपला प्रत्येक आदेश पाळायला लावतो तसे करून संमती देण्यावाचून त्याला मार्गच ठेवायचा नाही, अशी त्याची युक्तिवादाची विशिष्ट पध्दत आहे. तो नम्र आहे परंतु अत्यंत बुद्धिमान व स्पष्टवक्ताही आहे. सत्यासाठी तो कोणतीही किंमत मोजावयास तयार असे, हे त्याने पुढे स्वत:च्या बलिदानाने सिद्ध करून दाखविलेच.

होमरच्या वेळी ज्याप्रमाणे ग्रीस असा काही देश अथवा असे काही राष्ट्र निर्माण झालेले नव्हते, तशीच परिस्थिती सॉक्रेटिसच्या काळीही होती. अथेन्स शहर हेच एक राष्ट्र होते. स्पार्टन लोकांनी ते काबीज केले होते. पण सबंध ग्रीसचे एक राष्ट्र व्हावे अशी सॉक्रेटिस आणि प्लेटो यांना तळमळ लागलेली होती. म्हणून ते राष्ट्र बनण्यासाठी काय केले पाहिजे, राष्ट्र कसे बनत जाते, त्याचा शास्ता वर्ग कसा निर्माण करावा, आदर्श राष्ट्र म्हणजे काय, असे नाना प्रकारचे प्रश्न घेऊन त्यांची संगतवार उकल करण्याचा प्रयत्न या ग्रंथात केलेला दिसतो; पण या ग्रंथात 'लोकशासन' हा जरी मुख्य विषय असला, तरी या लोकशासनाचे तत्त्वज्ञानी पालक, उपशासक आणि व्यापारउदीम करणारे असे तीनच वर्ण आधाररूप मानलेले आहेत. गुलाम किंवा दास हे गृहीतच धरलेले दिसतात. त्यांचा खास असा विचार केलेला नाही. अर्थात् त्यांना काही अधिकारही नाहीत. मनुस्मृतीप्रमाणे त्यांचे समाजातील स्थान, मालमत्तेसंबंधीचे त्यांचे अधिकार, यांचे काहीच वर्णन प्लेटोच्या ग्रंथात आढळत नाही. म्हणजे ते नुसते समाजबाह्यच नव्हेत तर विचारबाह्यही समजले जात असावेत असे दिसते. परंतु त्यांचे स्थान अत्यंत हीन होते ही गोष्ट, ग्रीकांचे राष्ट्र बनवीत असताना अथवा अन्य प्रसंगी जे काही युध्दाचे प्रसंग येतील त्या वेळी ग्रीकांपैकी कोणत्याही पक्षाचा विजय झाला तरी विजयी पक्षाने पराजित पक्षाची लूटमार करू नये हे सांगता सांगता सॉक्रेटिस नवीन आचरणमर्यादा म्हणून असेही आवर्जून सांगतो की, ग्रीक नेत्याने कोणत्याही ग्रीक व्यक्तीला दास किंवा गुलाम करू नये. ग्रीकांनी ग्रीकांनाच अशी अधम गती देणे योग्य नाही.' हे त्याचे उद्गार दास वर्गाचे तत्कालीन सामाजिक स्थान दर्शविण्यास पुरेसे वाटावे. अथेन्स नगरीतील एक तृतीयांश लोक दास वर्गातले होते. म्हणून 'लोकशासन'चा विचार

मांडताना त्यांचाही विचार झाला पाहिजे, ही कल्पनाच या ग्रीक तत्त्वज्ञान्यांना करता येत नव्हती, हे स्पष्ट आहे. कितीही थोर अथवा ज्ञानी पुरूष घेतला तरी त्याला आपल्या काळातील ऐहिक वास्तवाच्या मर्यादा सहजासहजी ओलांडता येत नाहीत, हेच खरे ! सॉक्रेटिस वर्णभेद मानतो; परंतु ते जन्मजात नव्हेत तर गुणाधिष्ठित असावेत, असे म्हणतो. त्यामुळेच सोन्याचा अधिकांश असलेल्या बापाच्या मुलात जर काशाची मात्रा अधिक आढळली तर त्याला खालच्या वर्गात ढकलावे, असे सॉक्रेटिस स्पष्टपणे म्हणतो.

समाजातील होतकरू मुलगे व मुली निवडून, त्यांची शारीरिक आणि बौद्धिक घडण त्यांना प्रशिक्षित करून बनवावी व मग तेच समाजाचे नियंते, पालक व्हावेत अशा काटेकोर व्यवस्थेची सॉक्रेटिस शिफारस करतो. तेथे स्त्रीपुरूष भेद करण्यास तो तयार नाही. युध्दासह सर्व क्षेत्रात स्त्रियांना गुणवत्तेप्रमाणे समान पदे मिळाली पाहिजेत, स्त्रियांनी पुरूषाप्रमाणेच विवस्त्र होऊन व्यायाम घेतला पाहिजे, उत्तम पुरूषांशी संबंध ठेवून त्यांनी उत्तम प्रजा निर्माण केली पाहिजे; या पालकवर्गात पतिपत्नी ही नातीच असता कामा नये, मुले सर्वांची मानली जावीत, असे विचार जेव्हा सॉक्रेटिस मांडतो तेव्हा माझ्यासारख्या स्त्रीमुक्तिवाल्यालासुध्दा स्वत:च्या अंगाला चिमटा घेऊन आपण पूर्णपणे जागे आहोत की नाही याची खात्री करून घ्यावी असे वाटते !

पालक वर्गातील स्त्रीपुरूषांत मुक्त संबंध असावेत असे प्रतिपादन करणारा सॉक्रेटिस 'कि दोषश्चर्मघर्षणे,' असे विचारणाऱ्या चार्वाकासारखा भासेल ! पण तो चार्वाकमतवादी नाही. कारण तो देव-देवता-नवस इत्यादी मानणारा आहे. तसेच अराजकावर विश्वास न ठेवणारा आहे.

नैव राज्यं न राजासीत् न च दण्डयो न दाण्डिक: ।
धर्मेणैव प्रजा: सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥

असेही तो कोठे प्रतिपादन करीत नाही. उलट प्रशिक्षित व प्रज्ञावान पालकांनी निमंत्रित केलेल्या न्यायाधिष्ठित राष्ट्राची प्रस्थापना व्हावी असे त्यांचे म्हणणे आहे. नेमून दिलेल्या परिघावर सूर्याभोवती प्रदक्षिणा घालीत राहिलेले ग्रह-तारे हा त्याचा समाजानुशासनाचा कित्ता आहे. 'बळी तो कान पिळी' मात्स्य न्याय, न्यायाने वागण्याची गरज नाही तर न्यायाने वागतो असा देखावा निर्माण करता येणे महत्त्वाचे आहे अशी थेसिमॅक्स आदिकरून मित्रांनी मांडलेली मते तो आपल्या विशिष्ट पद्धतीने खोडून काढतो. समाजाची विविधांगांनी बांधणी कशी होत जाते त्याचे पायरीपायरीने त्याने स्वत: केलेले आणि विरोधकाकडून वदवून घेतलेले

वर्णन अनुवादित करून ते मी मासल्यादाखल येथे देतो : 'न्याय हा अन्यायाहून श्रेष्ठ नाही; उलट अन्यायी व आडदांड लोकच अधिक सुख उपभोगतात' असा पूर्वपक्ष थेसिमॅकस आणि ग्लुकॉन यांनी केला असून सॉक्रेटिस त्यांच्या युक्तिवादाला स्वत:च्या पद्धतीने येथे उत्तर देत आहे. तो सर्वच संवाद येथे देणे शक्य नाही. कारण हा सर्व ग्रंथ म्हणजेच त्या मूलभूत प्रश्नाचे उत्तर आहे. सॉक्रेटिसाची वादविवाद करण्याची पध्दती लक्षात यावी एवढा मर्यादित उद्देश ठेवून हा अनुवाद दिलेला आहे.

सॉक्रेटिस सुरुवातीला म्हणतो की, 'एक अधू दृष्टीचा मनुष्य आहे अशी कल्पना करा. आणि त्याला बारीक अक्षरांनी कोरलेला एक शिलालेख लांबून वाचण्यास सांगितले आहे, असे समजा. त्या वेळी जर त्याला कोणी असे सांगितले की हाच शिलालेख मोठया ठळक अक्षरांत दुसऱ्या एका ठिकाणी लिहिलेला आहे; तो तू आधी वाचून घे आणि मग बारीक अक्षरांतला आणि तो, एकच आहेत की नाही ते सांग.' असे सांगितल्यावर तो मनुष्य कोणता लेख आधी वाचील ?'

आदिमँटिस यावर उत्तर देतो की, 'तो आधी मोठया अक्षरांतील लेख वाचील, हे उघडच आहे, पण त्याचा प्रस्तुत विषयाशी काय संबंध ?'

'सांगतो. न्याय हे मूल्य समष्टीच्या ठिकाणी असू शकेल आणि व्यक्तीच्याही. पण समष्टी ही व्यक्तीपेक्षा मोठी असते, विशाल असते. मग न्याय ही कल्पना समष्टीच्या ठिकाणी जास्त प्रमाणात आढळेल आणि तिचे स्वरूप हुडकून काढणेही आपणाला सोपे जाईल. म्हणून मी असे सुचवितो की समष्टीमध्ये न्याय या मूल्याचा काय अर्थ होतो, येथपासून आपण शोध घ्यावयास सुरुवात करावी. तो घेतल्यावर मग आपण व्यक्तीच्या ठिकाणी न्यायाचे सूक्ष्म स्वरुप काय असेल, ते पाहू.'

'ही योजना ठीक दिसते.' आदिमँटिस म्हणाला.

'मग आपण आपल्या डोळ्यांदेखत एखादे राष्ट्र किंवा एकादी समष्टी आकार घेत आहे असे मानू या.' सॉक्रेटिस म्हणाला, 'म्हणजे आपल्याला न्याय व अन्याय यांची कशी वाढ होते ते पाहता येईल आणि ज्याचा शोध आपल्याला घ्यावयाचा, तो सुलभपणे घेता येईल.'

'ते खरे आहे. मग आपण हीच कल्पना पुढे चालवू या.'

'पण हे काम सोपे नाही, बरे का. तेव्हा तुम्ही याबद्दल नीट विचार करा.'

'अधिक विचाराची गरज नाही. उगीच वेळ घालवू नका.'

'मला असे वाटते की कोणतीही व्यक्ती स्वयंपूर्ण नसते. म्हणूनच समष्टी

जन्माला येते. आपणा सर्वांच्या नानाप्रकारच्या गरजा असतात. परंतु समष्टीचा उदय कसा होतो, याबद्दल तुमच्या मनात याहून काही वेगळा विचार आहे का ?'

'नाही, आम्ही तुमच्याशी सहमत आहोत.'

'आपल्या अनेक गरजा असल्याने त्या भागवण्याकरिता आपण दुसऱ्याचे साह्य घेतो. अशा रीतीने जेव्हा अनेक सहकारी व साहाय्यक एका ठिकाणी जुळतात, तेव्हा त्याला आपण समष्टी अथवा राज्य म्हणतो.'

'बरोबर.'

'मग ज्या वेळी एक व्यक्ती दुसरीला आपली गरज भागावी म्हणून काही देते, त्यावेळी हा विनिमयाचा व्यवहार आपल्या फायद्याचा आहे असे त्या व्यक्तीला वाटत असते.'

'बरोबर.'

'छान.' साक्रेटिस म्हणाला, 'आता आपण आपली काल्पनिक समष्टी उभारायला सुरुवात करू या. आपल्या गरजांतून समष्टी निर्माण होते आणि तिला जिवंत राहण्यास सर्वांत अधिक गरज अन्नाची असते, नंतर निवाऱ्याची आणि मग वस्त्राची.'

'खरे आहे.'

'मग ही समष्टी या सर्व गरजा कोणत्या रीतीने भागवू शकेल ? त्या समष्टीपैकी एकाने शेतकरी झाले पाहिजे, दुसऱ्याने गवंडी व तिसऱ्याने विणकर. एवढयाने भागेल की चांभार आदी कारूनारुंचीही गरज समष्टीला भासेल ?'

'भासणारच की.'

'याचा अर्थ असा की समष्टीमध्ये ४-५ तऱ्हेच्या तरी व्यक्ती निदान असतील.'

'उघडच आहे.'

'आता आणखी एक मुद्दा. यांपैकी प्रत्येकजण आपले उत्पादन एकाच साठयात जमा करील का ? जो शेतकरी आहे, त्याने उरलेल्या इतर चौघांसाठी धान्य तयार करावे का ? आपला सर्व वेळ धान्योत्पादनातच घालवावा का ? की त्याने आपल्यापुरते पहावे आणि आपला उरलेला वेळ आपली वस्त्रे आणि आपली पादत्राणे स्वत:च बनवण्यावर खर्च करावा, आणि आपल्या सर्व गरजा आपल्या आपणच पुऱ्या कराव्या ?'

'मला पहिला मार्ग सुकर वाटतो.'

'मलाही तसेच वाटते ! कारण तू बोलत असताना माझ्या मनात आणखी विचार आला की माणसे तंतोतंत एकमेकांसारखी नसतात. त्यांच्यात निरनिराळ्या

धंद्यांना योग्य अशा प्रवृत्ती जन्मजात असतात.'

'बरोबर आहे.'

'एका माणसाने अनेक उद्योग करावे की एकाच उद्योगात एकेकाने गुंतवून घ्यावे, कोणते बरे ?,

'प्रत्येकाने एकच उद्योग केलेला बरा !'

'मग इथे आणखी एक मुद्दा निर्माण होतो, तो असा की काम योग्य वेळी केले पाहिजे. वेळ काही कोणासाठी थांबत नाही. फावेल त्या वेळी काम करू, असे म्हणून चालणार नाही. याचा अर्थ असा झाला की, ज्या व्यक्तीला जे काम येते, ते करण्यासाठी त्याला इतर व्यवहारांतून मुक्त केले पाहिजे; म्हणजे निर्मिती अधिक होईल.'

'ते खरेच आहे.'

'मग आपले चार नागरिकांनी भागणार नाही. आदिमँटिस, असे बघ की शेतकऱ्याला जर चांगला नांगर हवा असेल किंवा खोरे किंवा आणखी काही, तर ती साधने काही तो स्वत: करू शकणार नाही. त्याचप्रमाणे गवंडयाला, कोष्टयाला आणि चांभाराला अनेक प्रकारची औजारे लागतील. त्यासाठी मग सुतार हवेत, लोहार हवेत आणि आणखी नाना कारागीर हवेत. म्हणजे आपली समष्टी वाढत चालली बरं का.'

'होय. हे खरे आहे !'

'तरीही ही समष्टी काही फार मोठी म्हणता येणार नाही. अजून त्यात गुराखी, मेंढपाळ, वगैरेचा समावेश करावा लागेल. बैलजोडया, मेंढया-बकरी, ही आणावी लागतील. आणि तरीही आपले हे नगर स्वावलंबी होणार नाहीच. कारण त्याला परठिकाणाहून वस्तू आणाव्या लागतील आणि त्यासाठी एक निराळाच वर्ग त्याला लागेल...'

सॉक्रेटिसच्या संभाषणाची तऱ्हा एवढयावरून समजू शकेल. याचप्रकारे त्याने यापुढे शेवटपर्यंत हा युक्तिवाद केलेला आहे. किमान गरजांवर संतुष्ट राहिलेली समष्टी म्हणजे समाजाची किंवा राज्याची प्राथमिक अवस्था. त्यानंतर सुखी समष्टीची कल्पना येते. त्यातून भोगवादी, ऐश्वर्यसंपन्न समष्टीची निर्मिती होते, आणि ही चर्चा अधिकाधिक बहुविध आणि परिपुष्ट करीत शेवटी सॉक्रेटिस ती न्याय आणि अन्याय यांच्या विचारांपर्यंत नेऊन भिडवितो. ही सर्वच चर्चा मला अनेक दृष्टींनी उद्बोधक आणि अर्थघन वाटली. महाभारतातल्या शांतिपर्वात

भीष्मांच्या तोंडून समष्टीच्या व राज्याच्या नानाविध प्रवृत्तींचे सांगोपांग प्रतिपादन वदविलेले आहे. तसेच येथेही केलेले आढळते. पण या ग्रंथामधील प्रतिपादनाची शैली एकदम निराळी आहे.

असार व अनित्य असलेल्या जगाची कल्पना मांडताना गुहेत बंदिस्त करून ठेवलेल्या माणसांचा जो दृष्टांत सॉक्रेटिसने तपशीलवार दिला आहे, तो अद्वितीयच म्हणावा लागेल. अंधाऱ्या खोलीतल्या छाया एकाच दिशेकडे माना जखडून ठेवल्याने पहात बसलेल्या माणसांपैकी एखाद्याला जर मोकळे होता आले आणि तो बाहेरच्या मैदानात येऊ शकला तर त्याला समोर दिसणारे दृश्य-माणसे, जनावरे, वृक्ष, डोंगर हे खोटे असून आपण आयुष्यभर पहात आलो त्या छायाच खऱ्या आहेत असे वाटेल आणि अंधाराचीच सवय झालेल्या त्याच्या डोळ्यांना सूर्याकडे तर पाहवणारच नाही. पृथ्वीवरील माणसाची अशीच अवस्था आहे. त्याला हरघडी जे दिसते, तेच सत्य वाटते आणि त्याच्यापलीकडे सत्य नावाची काही नित्य वस्तू आहे हे मानावायासही तो तयार होत नाही, हे पटवून देण्यासाठी सॉक्रेटिसाने हा दृष्टांत दिलेला आहे. सॉक्रेटिसाचे हे विश्लेषण आपल्याकडील मायावादाशी व बुद्धाने ज्यामध्ये विश्वाचे वर्णन 'सर्व क्षणिकम्, सर्व नष्टम्' असे केले, त्या दर्शनाशी फार जवळचे नाते सांगणारा आहे.

आनंदाचे नित्य आणि सत्य स्वरूप ज्या तत्त्वज्ञान्याला पटले, आणि ज्याला ऐहिकाचे क्षणिक व अनित्य स्वरूपही पटले, म्हणजेच जो प्रतिष्ठित प्रज्ञ झाला, त्याने प्रज्ञाप्राप्तीनंतर काय करावे या प्रश्नाचे उत्तर सॉक्रेटिस प्रज्ञावानावर सोपवीत नाही. त्याचे आग्रहपूर्वक असे सांगणे आहे की त्याने समाजातच राहिले पाहिजे. सॉक्रेटिसचे याबाबतचे ठाम मत असे आहे की प्रज्ञावान झाला तरी तो कोणत्यातरी समष्टीचा घटक असतोच. समष्टीसाठी केलेल्या संविधानाचा उल्लेख सॉक्रेटिसने 'लॉ' या शब्दाने केलेला आहे. त्या संविधानाचा हेतू समाजातल्या कोणत्याही एका विशिष्ट वर्गाला आनंदी अथवा सुखी ठेवणे असा मर्यादित असूच शकत नाही. सर्व समष्टीला या आनंद-धनाची प्राप्ती करून देणे हाच त्याचा हेतू होऊ शकतो, म्हणून ज्ञान्यांनी आपल्या आनंदात मस्त राहता कामा नये; सर्वसामान्यांच्या पातळीवर त्यांनी उतरले पाहिजे-आणि त्यांनी सकळांना शहाणे करून सोडले पाहिजे ! आपले ज्ञानेश्वर प्लेटोच्या राज्यात असते तर त्यांना ऐन तारुण्यात असताना समाधी घेण्याची परवानगी मुळीच मिळाली नसती ! सॉक्रेटिसची प्रज्ञावंतासंबंधीची ही भूमिका गीतेचा कर्मयोगपर अर्थ लावणाऱ्या टिळकांच्या भूमिकेशी साम्य दर्शविणारी आहे, असे मला वाटले.

प्रज्ञापारमिता ज्यांना प्राप्त झाली, त्यांनी समष्टीचे केवळ मार्गदर्शन नव्हे तर सूत्रचालन केले, तरच खरा सुखी व आनंदमय समाज अथवा राष्ट्र निर्माण होईल, असे सॉक्रेटिसचे प्रतिपादन ऐकल्यावर त्याला असा प्रश्न विचारण्यात येतो की हे उद्दिष्ट कधी तरी, कोठे तरी साध्य झालेले आहे का ? त्यावर सॉक्रेटिसचे उत्तर असे दिसते की, अशा तऱ्हेचा आदर्श समाज हे एक उद्दिष्ट आहे. तो एक विचार आहे. तो अमलात आला नाही तरी त्यामुळे त्या विचारात गौणत्व निर्माण होत नाही. राज्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी तो ध्रुव ताऱ्याप्रमाणे उपयुक्त ठरेल. ध्रुवापर्यंत कोणालाच पोहोचता येणार नाही; परंतु त्याच्या दिशेने नावाडयाला प्रवास करता येईल. विचार प्रधान की कृती प्रधान ? त्यापैकी कोणते आधी आणि कोणते नंतर, हा वाद अगदी हेगेल-मार्क्सपर्यंत चालू राहिल्याचे आपण पाहतो आणि त्याबाबतचे अखेरचे उत्तर आपण अजूनही शोधीतच आहोत.

ग्रंथाच्या 'लोकशासन' या नावावरून, आपण लोकसत्ताक असे या शासनपद्धतीला आजकाल समजतो, ती प्लेटोला अथवा सॉक्रेटिसला मान्य होती असे मात्र नव्हे. 'लोकशाही म्हणजे बेबंदशाहीचा सौम्य नमुना' असे सॉक्रेटिसचे म्हणणे होते ! सॉक्रेटिसाने 'डेमॉक्रसी, प्लूटॉक्रसी, डेस्पॉटिझम आणि ॲरिस्टॉक्रसी' या भिन्न शासनपद्धतींविषयी बरेच काही तपशीलवार सांगितले आहे. परंतु त्याचा विचार पुन्हा केव्हा तरी करावा लागेल.

लोकसत्ताक मनुष्य (पुरूष अथवा स्त्री) अस्थिर स्वभावाचा असतो आणि लोकसत्तेला त्याच्यामुळे स्वैर रूप प्राप्त झाले म्हणजे तिच्या पोटी अधिकारशाही जन्मास येते, असे सॉक्रेटिसाचे प्रतिपादन आहे. भारतीय समाजाची आजची अवस्था पाहिली म्हणजे सॉक्रेटिसाची ही भविष्यवाणी खरी ठरते की काय, अशी शंका माझ्या मनात तरी उत्पन्न झाली खरी !

प्लेटोचा हा ग्रंथ वाचल्यावर मनात असा एक विचार येतो की जे ज्ञानी व प्रतिभाशाली विचारवंत पूर्वी होऊन गेले, मग ते कोणत्याही काळातील अथवा देशातील असोत, त्यांनी आदर्श मानवसमाजाचे स्वप्न केव्हा ना केव्हा तरी पाहिलेले असते. मग त्याला कुणी कृतयुग म्हणो, युटोपिया म्हणो, विश्वकुटुंब म्हणो की पसायदान म्हणो. आहे ही समाजरचना न्याय्य नाही, सुव्यवस्थित नाही; एवढेच काय पण ती अन्यायी, विषम व कुरूप असून मानवाच्या अंगी असणाऱ्या सुप्त सामर्थ्याला शोभणारी नाही अशी खंत त्यांच्या हृदयाला सतत छळीत असावी. म्हणून मग सॉक्रेटिसाला वाटे की ज्ञानी व्यक्तींचे राज्य व्हावे, कोण्या ऋषीला वाटे की दण्डहीन समाज बनावा तर एखादा ज्ञानेश्वर अशा समाजाचे वरदान मागे की

जेथे 'भुतां परस्परे घडो मैत्र जीवांचे !' समोर पसरलेल्या मानवसमाजाची रचना कोणीही केलेली असो, परमेश्वराने, मन्वादिकांसारख्या स्मृतिकारांनी अथवा कोणी प्रेषिताने. पण ती सदोष आहे. संकुचित आहे आणि स्वार्थप्रेरित आहे. ती बदलली पाहिजे एवढेच नाही तर ती मनुष्याला बदलता येण्यासारखी आहे, अशी उमेदही या महामानवांना वाटत असावी ! त्यांपैकी ज्यांच्या पोटी केवळ माणुसकीचा गहिवर दाटलेला होता त्यांनी नामघोषाचा महिमा सांगून पसायदान मागितले आणि ज्यांना विद्यमान अन्यायाची तीव्र चीड आलेली होती, त्यांनी धर्मयुद्ध वा वर्गयुद्धे प्रतिपादिली. कुरुक्षेत्रानंतर कलियुग सुरू झाले असे आपण मानतो. सॉक्रेटिसही आपल्या काळी लोहयुग चालू आहे असेच म्हणत होता. सांप्रत कोणते युग चालू आहे ते मी सांगण्याची गरज नाही. त्याचे कृतयुगात रुपांतर करण्याकरता काय करावे ते आपणच ठरवायचे आहे आणि तदनुसार कृतीही आपणच करावयाची आहे. 'त्वमेव केवलं धर्तासि ।' हे आपण गणपतीला नव्हे तर आपल्यालाच सांगायला हवे !

***

धर्म राष्ट्राची आधारशिला बनू शकेल का ?

आपल्या वाचनात क्वचित असे लेखन येऊन जाते की जे एखाद्या विषयावर नवाच प्रकाशझोत टाकीत आहे असे वाटावे ! माझे मित्र श्री. ताहेरभाई पूनावाला यांनी मँचेस्टर विद्यापीठाचे प्रा. हमजा अलावी यांचा जो प्रबंध माझ्याकडे पाठविला, तो वाचीत असता मला असा अनुभव आला की पाकिस्तान आणि इस्लाम या विषयाचे काही वेगळे दर्शन लेखकाने आपल्याला घडविले आहे. प्रा. अलावींचा हा प्रबंध वस्तुनिष्ठ विश्लेषणाने आणि उचित अशा संदर्भांनी ठासून भरलेला असून, अशा धर्तीचे प्रतिपादन आपल्याकडे कोणी केलेले माझ्या वाचनात आलेले नाही. इस्त्रायल अथवा इराणप्रमाणे पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राष्ट्र आहे का, असा मूलभूत सवाल प्रा. अलावी यानी उपस्थित केला असून त्यानी त्याचे स्वत:च असे सडेतोड उत्तर दिले आहे की, पाकिस्तानची निर्मिती होण्यापूर्वी धर्माधिष्ठित राज्य निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे पाकिस्तानच्या निर्मात्याने घोषित केले नव्हते. आणि आज जनरल झिया ते तसे असल्याबद्दल जो दावा करीत आहेत, तो मुळात आपल्याला सर्वाधिकार प्राप्त करून घेता आल्यास पहावा, या हेतूने केला जात आहे. लोकमताचा आधार आपल्या पाठीशी जरी नसला तरी परमेश्वराचा आदेश आपल्या पाठीशी आहे असा आभास निर्माण करण्यासाठी हा खटाटोप चालू आहे. 'झिया' ना स्वप्नात येऊन परमेश्वराने तसा आदेश दिला, अशी आवई उठवण्याचा प्रयत्न झिया करीत आहेत.

कम्यूनिस्टांनी पाकिस्तानच्या निर्मितीची जी उपपत्ती मांडली होती की मुस्लिम बहुसंख्या असलेल्या प्रांतातील मुस्लिम सरंजामशाही वर्गाने अथवा नवोदित भांडवलदार वर्गाने निर्मिलेली ही मागणी होती, ती प्रा. अलावींच्या मते वस्तुस्थितीला धरून नव्हती. भारतातील राष्ट्रीय प्रवृत्तीच्या संघटनांनी हिंदू मुस्लिमांतील दुही ही ब्रिटिशसत्तेने निर्माण केली, वाढवली असे जे प्रतिपादन केले होते, तेही प्रा. अलावी सर्वांशी मान्य करीत नाहीत. प्रा. अलावींच्या मते पाकिस्तानी आंदोलन हे इस्लामिक राज्य निर्माण करण्यासाठी ध्येयवादी लोकांनी चालवलेले आंदोलन मुळी नव्हतेच. तसेच ते सरंजामदारांनी प्रवर्तित केलेलेही नव्हते. मुसलमानांतील नवोदित भांडवलशाहीचेही ते आंदोलन नव्हते; तर प्राध्यापकांच्या मते या आंदोलनामागील खरी प्रेरणा मुसलमानी समाजामध्ये ब्रिटिश राजवटीत जो नवा

चाकरमान्यांचा वर्ग निर्माण झाला, त्याची होती. ब्रिटिशांच्या वसाहतवादी शासनामध्ये सुशिक्षितांचा एक नवाच वर्ग निर्माण झाला की जो भारतातील वकिलीच्या, एंजिनीअरिंगच्या, शिक्षणाच्या, वृत्तपत्रांच्या, आणि अवर शासकांच्या व्यवसायात पडला. त्यातून या आंदोलनाला बळ प्राप्त होत गेले. प्रा. अलावींच्या शब्दात सांगायचे तर पाकिस्तानी आंदोलन हे "मुसलमानांचे होते पण ते इस्लामचे नव्हते," आणि या आंदोलनात मुस्लिम धर्म मानणारे नानाविध प्रदेशातले जे मुस्लिम समाज एकत्र आले होते, त्यांचे ध्येय धार्मिक नव्हते तर उघडउघड ऐहिक होते. त्याच्या केंद्रस्थानी भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांमधले नवजात मुसलमान चाकरमाने होते. एकदा पाकिस्तानची निर्मिती झाल्यावर ही तात्पुरती जूट भंगू लागली आणि त्यांतूनच शेवटी पाकिस्तान भंग पावून बांगला देशाची निर्मिती झाली. आजही, पाकिस्तान म्हणून जो देश ओळखला जातो, त्यातील सिंधी, पंजाबी, पठाणी, बलुची आदी वांशिक गटात रस्सीखेच चालू राहिलेली आहे. धर्मने ते केवळ इस्लामी आहेत एवढया एकाच बंधनामुळे ते राष्ट्र म्हणून बांधले जाऊ शकत नाहीत असा अनुभव येत असल्यानेच इस्लामची घोषणा वारंवार अधिकाधिक जोषाने करण्यात येत असते !

आपले हे प्रतिपादन सिद्ध करण्यासाठी प्रा. अलावी यानी राजा राममोहन रॉय आणि सय्यद अहमद यांच्यापासूनच्या इतिहासाचा मागोवा तर घेतला आहेच; परंतु त्याचबरोबर इतिहासात बरेच मागे जाऊन इस्लामचा प्रचार भारतामध्ये वायव्येकडून पूर्वेकडे आणि पश्चिमेच्या किनारपट्टीवर कशा प्रकारे झाला व त्याचे भिन्न भिन्न परिणाम काय झाले, याबद्दल जे विश्लेषण त्यांनी केलेले आहे, ते मला नवीन प्रकारचे वाटले. पश्चिम किनाऱ्यावरील इस्लामचा प्रसार हा व्यापारी संबंधातून वाढला आणि हे व्यापारी संबंध अरब देशांचा आणि भारतीय लोकांचा जो व्यापार व्यवहार शेकडो वर्षे चालत आलेला होता त्यांतून निर्माण झाले असे ते प्रतिपादन करतात. परंतु वायव्येकडून मुसलमानांच्या ज्या स्वाऱ्या झाल्या, त्या व्यापारी वर्गापासून भिन्न प्रवृत्तीच्या लोकांनी केलेल्या होत्या. त्यांच्यामध्ये अफगाणिस्तान, पर्शिया, तुर्कस्थान, इत्यादी मध्ये आशियातील अनेक छोटेमोठे देश, यांतून आलेले धाडशी, बलदंड व उच्च समाजातले लोक होते. मुसलमान बादशहांनी त्यांनाच अधिकारपदे बहाल केली. त्याचप्रमाणे पंजाब, राजपुताना, हरयाणा इत्यादी भागांतील जी प्रतिष्ठित राजपूत घराणी मुसलमान झाली, त्यांनाही मुसलमानी शासनात सामावून घेण्यात आले. पंजाब, बिहार व बंगाल येथे मुळापासूनच ब्राह्मणी संस्कृतीचा प्रभाव गंगा-यमुनेच्या दुआबातील ब्राह्मणी संस्कृतीइतका दृढ झालेला

नव्हता. म्हणून तेथील स्थानिक श्रेष्ठींनी बादशहांचा मुसलमान धर्म स्वीकारल्याबरोबर तेथील सर्वसामान्य जनतेनेही इस्लामचा स्वीकार केला.

परंपरागत वैदिक संस्कृतीविरूद्ध भूमिका ज्या गौतमाने व महावीराने घेतली होती ते आर्यावर्ताच्या बाहेर मानल्या गेलेल्या मगध वंशातले होते आणि त्यांचा विचार ज्या भूमीत रुजला ती भुसभुशीत बनली होती. त्यामुळे इस्लामला तेथे अनुकूल हवामान मिळाले. हे मान्य केले तरीसुद्धा इस्लामच्या प्रचारासाठी तलवारीचा भरपूर उपयोग करण्यात आला होता हे प्राध्यापक अलावींनी का मान्य करू नये ते मला कळत नाही. अयोध्या, मथुरा, काशी अशा शेकडो ठिकाणी इस्लामच्या जबरदस्तीची स्मारके आजही उभी नाहीत काय? मुसलमानानंतर आलेल्या ख्रिश्चनांनीसुद्धा स्वधर्माच्या प्रचारासाठी दंडशक्तीचा यथेच्छ वापर केला होता याची साक्ष गोव्यातील इन्क्विझिशनने दिलेली आहे.

राजा राममोहन रॉय यांच्या कार्यामुळे सर सय्यद अहमद प्रभावित झालेले होते. राजा राममोहनांनी प्रवर्तित केलेल्या जागृतीमुळे हिंदूंचा इंग्रजांबरोबर आलेल्या नवीन संस्कृतीत फार मोठया संख्येने प्रवेश होत असून मुसलमानांनी जर तिकडे दुर्लक्ष केले तर उत्तर प्रदेशासारख्या भागात देखील, की जेथे मुसलमानांनी अल्पसंख्येत असूनही आपला वरचष्मा अनेक शतके ठेवला होता, तेथे ते मागे पडतील, हे वास्तव ओळखून मुसलमानांत जागृतीचे कार्य सुरु करणारे सर सय्यद हे आद्य मुसलमान. राजा राममोहन रॉय काय, महात्मा फुले काय अथवा सर सय्यद अहमद काय त्यांच्यापैकी कोणालाही स्वातंत्र्याची किंवा स्वराज्याची स्वप्नेदेखील पडलेली नव्हती! उलट इंग्रज येथे कायमचा राहील, नव्हे राहो असेच त्यांना वाटत होते! फार कशाला, खुद्द काँग्रेसची अधिवेशनेही 'महाराणी व्हिक्टोरिया' च्या जयजयकारानेच सुरू होत नव्हती काय? प्रश्न एवढाच होता की नवे शिक्षण, नवे विचार, नव्या नोकऱ्या व नवे व्यवसाय यांत आपले लोक म्हणजे सरसाहेबांच्या भाषेत बोलायचे तर 'अश्रफ' मुसलमान किती असणार? प्रा. अलावी ज्याला चाकरमाने **(Salariat)** म्हणतात तो हाच वर्ग. एके काळी मुसलमानांनी ज्यांच्यावर राज्य केले, तेच ह्या नव्या शासनात आपल्याला मागे सारणार ह्या विचारातून प्रतिवादाची प्रवृत्ती सरसाहेबांसारख्यांच्या मनात निर्माण झाली असेल हे शक्य वाटते. हिंदुस्थानचे मुसलमान व हिंदू हे दोन डोळे असून त्यापैकी एक डोळा सदोष राहून कसे चालेल? दोन्ही सारखे राहिले पाहिजेत या अर्थाचे उद्‌गार सर सय्यदांनी काढल्याचे सांगतात. ह्या सुंदर उपमेत दडलेली विरोधी भावनाच पुढे जाता लॉर्ड मिंटोच्या कारकीर्दीत राष्ट्रीय सभेच्या विरोधात मुस्लिम लीग म्हणून प्रकट झाली

आणि तिच्या नेत्याबरोबरच लोकमान्य टिळकादिकांना लखनौ येथे १९१६ मध्ये समझौता अथवा करार करावा लागला.

आपल्या ह्या उद्बोधक प्रबंधात प्रा. अलावी यांनी हिंदू मुसलमानांतील ही स्पर्धा कायम वाढती ठेवण्यात इंग्रजांकडून सतत करण्यात आलेल्या कारस्थानांची घ्यावी तशी दखल घेतलेली नाही याचे मात्र मला आश्चर्य वाटते. अशोक मेहता आणि अच्युत पटवर्धन यांच्या कम्यूनल ट्रँगल या ग्रंथात हे त्रांगडे स्वच्छपणे उलगडून दाखवण्यात आलेले आहे. हिंदू-मुसलमान असा दुहेरी सामना इंग्रजांच्या उपस्थितीमुळे तिहेरी बनला आणि एका बाजूला काँग्रेस तर दुसऱ्या बाजूला मुसलमान अधिक इंग्रज असे चित्र भारतातील राष्ट्रवादी शक्तीसमोर उभे राहिले. लखनौ करारानंतरच्या खिलापत आंदोलनाच्या प्रसंगी गांधींनी जी भूमिका घेतली ती अंती मुसलमानामधील धार्मिक अंधपणा वाढवण्यास कारणीभूत झाली म्हणून, ती मूलत: प्रतिगामी होती, हे प्रा. अलावींचे विधान खरेच आहे. पण गांधींनी त्यामुळे मुस्लिम लीगला तात्पुरता का असेना असा जबदस्त शह दिला की १९१९ ते १९२४ पर्यंत लीगचे वार्षिक अधिवेशन देखील होऊ शकले नव्हते, याचीही प्राध्यापकांना नोंद घ्यावी लागलेली आहे. सध्याचे शीख प्रकरण हा देखील असेच अंगावर उलटलेले प्रकरण नव्हे काय ? आणि त्याची पाळेमुळे तपासू लागल्यास शीखांच्या वेगळेपणाची भावनासुध्दा ब्रिटिश सत्तेने प्रयत्नपूर्वक लावलेली विष-वल्ली होती असेच आढळत नाही काय ? पाकिस्तानाचे प्रस्थापक म्हणून महशूर झालेले कायदे इ आझम बॅ. जिना हे त्या काळी खिलाफतच्या चळवळी पासून दोन हात दूर राहिलेले होते ही मात्र लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

सर सय्यद अहमदानी भारतामध्ये हिंदू व मुसलमान असा दोन समष्टी अथवा दोन राष्ट्रे असल्याबद्दलचे जे सूचक उद्गार काढले होते आणि ज्या पाकिस्तानचा निर्देश कवी महंमद इक्बाल यांनी १९३० साली केला होता त्या कल्पनांना राजकारणात मूर्त स्वरूप देण्याची ताकद मुस्लिम लीगमध्ये दुसऱ्या महायुद्धापर्यंत नव्हती याचा नि:संदेह पुरावा १९३७ च्या निवडणुकीमध्ये मिळालेला होता. १९३७ पर्यंत मृतप्राय झालेल्या लीगला पुढील अवघ्या दोन वर्षात पुन्हा सचेत आणि सशक्त करण्याचे श्रेय लॉड लिनलिथगो या व्हाईसरॉयना द्यावयास हवे. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर भारतातील लोकनेत्यांना विश्वासात न घेता भारतही या महायुध्दात जर्मनीविरुद्ध उतरलेला आहे असे जेव्हा दिल्लीहून घोषित करण्यात आले तेव्हा काँग्रेस आणि ब्रिटिश सरकार यांच्यामध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. त्यावेळी काँग्रेस ही एकमेव बलाढय संघटना भारतात उभी होती. तिच्या सर्व

मंत्रिमंडळांनी राजीनामे सादर केले आणि युद्धप्रयत्नामध्ये ब्रिटिशांशी बिनशर्त सहकार्य करण्याचे नाकारले. त्यामुळे ब्रिटिश सरकारसमोर फार गंभीर पेच निर्माण झालेला होता. जरी त्याप्रसंगी बॅ. जीनांच्या मुस्लिम लीगने व स्वत: जिनांनी सरकारला सहकार्य देऊ केले असले तरी तिचे बळ नगण्यच होते, हे ब्रिटिशांना चांगले ठाऊक होते.

ते बळ लीगला आणि त्याहीपेक्षा वैयक्तिक दृष्टया जिनांना प्राप्त करून देण्यात लॉर्ड लिनलिथगोचा वाटा फार मोठा होता. ४ नोव्हेंबर १९३९ रोजी जीना बरोबर झालेल्या मुलाखतीचे जे टिपण लॉर्ड लिनलिथगोने झेटलंड यांना पाठवले होते, त्यात त्यांनी नमूदच केले आहे की, 'जीनांनी काँग्रेसविरूद्ध उभे राहून मला फार मोलाची मदत केली आणि त्याबद्दल मी त्यांचे आभारी असले पाहिजे. काँग्रेसशी हातमिळवणी करून त्यांनी जर माझ्या समोर संयुक्तपणे मागणी केली असती तर माझ्यावर आणि बादशहाच्या शासनावर फार मोठे दडपण आले असते म्हणून जीनांची प्रतिष्ठा संभाळण्यामध्ये माझे हितसंबंध गुंतलेले आहेत असे मी म्हणू शकतो.' (आयेशा जलाल दि सोल स्पोक्समन पृ. ४९) त्यावेळी जीनांच्यापाशी वेगळी अशी कोणतीही मागणी नव्हती. लॉर्ड साहेबानीच 'तुमची वेगळी मागणी लवकर आमच्या समोर मांडा' असा लकडा जीनांच्या मागे लावला आणि त्याचे फळ म्हणून मुसलमानांच्या वेगळ्या राष्ट्राची कल्पना समूर्त झाली. लीगच्या प्रस्थापनेपासून तो पाकिस्तानच्या प्रस्थापनेपर्यंत ब्रिटिशांनी एका विशिष्ट कल्पनेचा व धोरणाचा पाठपुरावा चालू ठेवला होता याचा आणखी पुरावा देण्याची काही गरज आहे काय ?

मुसलमानांमधील त्या काळच्या संघटनांचा जो तक्ता प्रा. अलावी देतात तो मला अभ्यसनीय वाटतो. त्या काळच्या मुस्लिम समाजात आठ प्रकारच्या विचार-प्रणाली अस्तित्वात होत्या, असे प्राध्यापक सांगतात. त्या अशा-(१) देवबंदचे उलमा, इस्लामी परंपरावादी; (२) बरेलवी उलमा आणि पीर, इस्लामी परंपरावादी; पण सुफी वगैरे मतांची भेसळ झालेले,(३) मौदूदी आणि जमाते इस्लामी, मूळ इस्लामवादी; (४) सर सय्यद अहंमदखान आणि महंमद इक्बाल, आधुनिक इस्लामी; (५) जिना, धर्मातीत अल्पसंख्य मुस्लीम.परंतु जेथे मुसलमानांचे बहुमत होते तेथील विचार प्रवाह वेगळे होते. त्यांची वर्गवारी प्रा. अलावी अशी करतात: (६) जमीनदारांचा पगडा असलेली पंजाब व सिंधमधील युनियनिस्ट पार्टी : धर्मातीत परंतु प्रांतीय व्यवहारी राजकारणवादी; (७) बंगालमधील फजलूल हक् यांची कृषक प्रजा पार्टी; धर्मातीत आणि प्रांतीय पण जहाल राजकारणवादी आणि

(८) वायव्य सरहद्द प्रांतातील खानबंधूंची काँग्रेस : धर्मातीत राष्ट्रवादी मुस्लिम.

या आठ विचारप्रवाहांपैकी एकाच्याही नजरेसमोर पाकिस्तानसारख्या स्वतंत्र राष्ट्राच्या निर्मितीची कल्पना नव्हती, हे प्रा. अलावींनी सप्रमाण दाखविले आहे. अगदी महंमद इक्‌बालसारख्या कवीच्याही मनात सुध्दा स्वतंत्र पाकिस्तानचे विचार नव्हते ! 'सारे जहाँसे अच्छा, हिंदोस्ताँ हमारा, हम बुलबुले है उसकी-वो गुलिसताँ हमारा' या काव्यपंक्ती इकबालांच्याच ना ? बॅ. जीनांच्या मनात तर पाकिस्तान नव्हतेच नव्हते. मग देशाच्या विभाजनाची आणि पाकिस्तानसारख्या इस्लामवर आधारित राष्ट्राची कल्पना कोठून असणार ? पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतरसुद्धा राष्ट्राध्यक्ष म्हणून जीनांनी जे पहिले वहिले भाषण केले, त्यातही त्यानी 'आता येथे कोणी मुसलमान कोणी हिंदू असे भेद राहिलेले नाहीत. आपण सर्व एका राष्ट्राचे नागरिक आहोत' असे प्रतिपादन केले. १९३८ साली अलिगड मुस्लिम विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांपुढे भाषण करताना जीना म्हणाले, 'तुमच्यासाठी मुस्लिम लीगने जर काही केले असेल तर ते हे की तिने तुम्हाला मुसलमानांतील प्रतिगामी शक्तींच्या पकडीतून सोडविले आहे. जे त्यांच्या हातची खेळणी होतात, ते राष्ट्रद्रोही असतात, याची जाणीव लीगने तुम्हास करून दिली. मौलवी आणि मौलाना यांच्या तावडीतून तिने तुम्हाला मोकळे केले आहे !' वर उल्लेख केलेल्या पाकिस्तानच्या संविधान सभेसमोरच्या भाषणातले जीनांचे आणखी काही शब्दच येथे उद्‌धृत करतो : 'तुम्ही कोणत्याही धर्माचे, जातीचे, अथवा वंशाचे असा. शासनाला त्याच्याशी कर्तव्य नाही. आम्ही सर्व एका देशाचे नागरिक आहोत, हे आमचे आधारभूत तत्त्व आहे. हे तत्त्व तुम्ही सतत दृष्टीसमोर ठेवलेत म्हणजे कालांतराने हिंदू हे हिंदू राहणार नाहीत आणि मुस्लिम मुसलमान राहणार नाहीत ! धार्मिक दृष्टया नव्हे तर राजकीय दृष्टया मी हे म्हणत आहे.' प्रा. अलावींच्या मते नाममात्र उरलेल्या मुस्लिम लीगला शक्ती प्राप्त व्हावी म्हणून पंजाब आणि सिंध येथील ज्या बडया जमीनदार धेंडांना जिनानी मुस्लिम लीगमध्ये आणले, त्यांच्याच हाती शेवटी लीगचे राजकारण गेले. जिना नाममात्र नेते आणि खरे सूत्रधार सर सिकंदर हयातखाँसारखे लोक. लीगचा व्याप वाढला पण कारभार त्यांच्या तंत्राने चालला. कवी इक्‌बालनाही याची कल्पना आली होती असे जीनाशी त्यांचा जो पुढे पत्रव्यवहार झाला, त्यावरून दिसून येते. त्या पत्रातील काही भाग प्रा. अलावी यानी उद्‌धृत केलेला असून पाकिस्तानच्या बाबत कविवर्याचा भ्रमनिरास कसा होत गेला, ते त्यावरून स्पष्ट होते. स्वत: बॅ. जिना आणखी जगले-वाचले असते, तर त्यांचाही भ्रमनिरास झाला असता आणि पाकिस्तानची खेळी आपल्या हाती

राहिलेली नसून ती दुसऱ्याच कोणाच्या तरी हातात गेलेली आहे, हे त्यांच्या लक्षात आल्यावाचून राहिले नसते. पाकिस्तानमधील सत्तेचे हे हस्तांतर कसे घडत गेले, देवबंद व बरेली येथील उलमा आणि मौदूदीसारखे मूळ इस्लामवादी नेते कसे पाकिस्तानवादी बनत गेले आणि पाकिस्तानच्या प्रत्यक्ष निर्मितीनंतर बलूची, सिंधी,पंजाबी, पठाण व बंगाली यांच्या वांशिक निष्ठांना पुन्हा कसे धुमारे फुटू लागले,याविषयीचे प्रतिपादन मूळ लेखातूनच वाचावयास हवे. वांशिक निष्ठांचे हे नवीन धुमारे कापून टाकण्यासाठीच पाकिस्तानातील पंजाबी सत्ताधाऱ्यांनी इस्लामचा नारा बुलंद केलेला आहे आणि जनरल झियाना आपले प्रवक्ते बनविले आहे, असे प्रा. अलावी यांच्या प्रबंधाचे तात्पर्य आहे.

त्यांचा हा उत्कृष्ट प्रबंध वाचल्यानंतर माझ्या मनात जी शंका उरली, ती अशी की भारताचे विभाजन करण्यासाठी धर्म ही बाब ब्रिटिशांना व मुस्लिमांना राबवून घेता आली आणि धर्माच्या नावावर एक राष्ट्र उभारण्याचा प्रयत्न झाला. परंतु देशाच्या विभाजनाची ही कल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व तदनंतर केवळ भारतापुरती मर्यादित झालेली दिसत नाही. जर्मनीचेही पूर्व आणि पश्चिम असे दोन तुकडे झाले. कोरियाचेही विभाजन झाले आणि तोच प्रकार व्हियतनामच्या बाबतही घडला. त्यापैकी फक्त व्हियतनामने आपली दोन्ही छकले पुन्हा सांधून घेण्यात यश मिळवले आहे. पण कोरियाची व जर्मनीची छकले अगदी अलीकडे जर्मनीटी छकले एक झाली अजून जशीच्या तशी असून ती कधी सांधली जातील की नाही याबद्दल शंकाच वाटते. म्हणून देशांची छकले पाडण्याची आणि त्यांना कायमचे कमकूवत करण्याची ही क्रूर नीती कोणा एकटया जिनांची वा महंमद इकबालची नसावी; तिच्या बुडाशी काही महाशक्तीच्या जागतिक व्यूहरचनेतील सूत्र असावी, असे वाटते. मग ती सूत्रे ब्रिटिश मुत्सद्दयांनी निर्माण केलेली असोत की अमेरिकन वा रशियन चाणक्यांनी केलेली असोत.

याच संदर्भात आणखी एक विचार मनात येतो तो असा की राष्ट्र ही कल्पना स्वयंभू कल्पना नसून ती कृत्रिम रीतीने निर्माण करता येते की काय ? निसर्गामध्ये ज्याप्रमाणे एका अमीबाचे तुकडे होऊन तुकडयागणिक एक नवीन अमीबा तयार होतो अथवा एखाद्या झाडाचा फाटा कापून दुसऱ्या जागी लावला तर दुसरे झाड तयार होते; त्याप्रमाणे एका देशाचे अथवा राष्ट्राचे जर विभाजन केले तर दोन देश तयार होतात आणि त्यांचे रूपांतर दोन परस्परविरोधी राष्ट्रातही होऊ शकते असे दिसते. अनेक संस्थाने किंवा राष्ट्रे एकत्र येऊन त्यांचे रूपांतर एका राष्ट्रात झाल्याचा दाखला आपल्याला जर्मनी आणि अमेरिकेत मिळतो. पण दुसऱ्या महायुद्धानंतर

त्याच्या उलट प्रक्रिया सुरू झालेली आहे. छोटया छोटया राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय जगात काही किंमत रहात नाही असा प्रत्यय येत असताही ही प्रक्रिया प्रत्यक्षात घडत असल्याचे आपण पहात आहोत ! त्याचवेळी अशीही प्रक्रिया चालू आहे की लहान व मध्यम प्रतीची राष्ट्रे या अथवा त्या महाशक्तीच्या पंखाखाली शिरत आहेत अथवा 'अलिप्त राष्ट्रमंडळ,' किंवा '७७ चा गट' असे संघ स्थापीत आहेत.

इस्लाम ही पाकिस्तानची आधारशिला बनू शकणार नाही हे प्रा. अलावींचे प्रतिपादन वाचल्यानंतर आपण स्वत:ला असा प्रश्न विचारला पाहिजे की धर्माला आधारशिला मानून कोणतेही राष्ट्र आधुनिक काळात टिकू शकेल काय ? की त्याला टिकायचे असेल तर इहवादाचाच आधार घ्यावयास हवा ? राज्य अथवा राष्ट्र ही संकल्पना मुळातच ऐहिक असल्याने इहवादाचा आश्रय घेतल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राला तरणोपाय नाही असे मी मानतो. तर्कशुद्ध असा तोच विचार दिसतो. छोटी राष्ट्रे परावलंबी बनणार ही गोष्ट स्पष्ट आणि सिद्ध आहे. तितकीच स्पष्ट गोष्ट हीही आहे की मोठी राष्ट्रे बहुधर्मी, बहुभाषिक असणार. अमेरिका, रशिया ही दोन महाशक्ती राष्ट्रे बहुधर्मी आणि बहुभाषिक तर आहेतच, पण ती इहवादीही आहेत. अमेरिका धर्ममुक्त तर रशिया धर्मविरोधी आहे. याउलट स्वत:स धर्मराज्ये म्हणवणारे देश एकतर परावलंबी बनले आहेत किंवा सामर्थ्यहीन आहेत. म्हणून भारताला जर वैभवसंपन्नाच्या पंक्तीत बसण्याची ईर्ष्या असेल, तर त्याने राष्ट्र म्हणून धर्ममुक्तच राहावे आणि आपले 'ऐहिक धड' करण्याचे मार्ग चोखाळावे. येथील धर्मवाद्यांना चुचकारीत बसण्यापासून काही लाभ होणार नाही.

***

३४५४
२६५०६
१७।१२

अथा तो वर्णजिज्ञासा

महाराष्ट्रातील वर्णरचनेवर घणाघाती घाव घालण्याचे कार्य खऱ्या निकराने जर कोणी केले असेल तर ते ज्योतिराव फुल्यांनी. या आघातांचे मुख्य लक्ष्य ब्राह्मण समाज आणि मुख्य क्षेत्र महाराष्ट्र ठरले. त्यातूनही त्यांचे केंद्र पुणे हे ठरले. ह्या माझ्या मते योगायोगाच्या गोष्टी नाहीत. कारण महाराष्ट्राचेच नव्हे तर पश्चिमेला मुलतानपासून तो पूर्वेला कलकत्त्यापर्यंत आणि उत्तरेला दिल्लीपासून तंजावरपर्यंत मराठ्यांचे जे प्रभुत्व पसरलेले होते त्याचे नाममात्र केंद्रस्थान जरी छत्रपतीच्या रुपाने साताऱ्यात असले तरी त्याचा खरा केंद्रबिंदू पुण्यातच होता. त्यामुळे मोगल साम्राज्याची सूत्रे जशी लाल किल्ल्यातील मोगल सम्राटाच्या हाती एकवटलेली असत त्याचप्रमाणे मराठी सत्तेची सूत्रचालना शनिवारवाडयातील पेशव्यांच्या हाती होती आणि पेशवे हे ब्राह्मणी वर्चस्वाचे केवळ द्योतक नव्हते तर पुरस्कर्ते होते. त्यांच्या दरबारामार्फतच तत्काळच्या प्रभू, सोनार, महार इत्यादी जातीवरची बंधने अतिशय कडक करण्यात आली होती. कोतवाल चावडीवर व शनिवारवाडयावर इंग्रजाचे निशाण जेव्हा चढले, तेव्हाच खऱ्या अर्थाने मराठेशाहीचा अंत झाला, असे इंग्रजांनी आणि या देशातील जनतेनेही मान्य केले. नाना फडणविसांचा मृत्यू झाल्यानंतर पुणे दरबारात गोवेकर पोर्तुगीजाचा जो वकील होता त्याने आपल्या सरकाराकडे पाठवलेल्या खलित्यात पुण्यातील जनमताबद्दल लिहिताना असे म्हटले आहे की, 'पुण्यातील लोक आता लवकरच टोपीकरांचे राज्य येथे येईल, असे आपसात बोलतात.' हा खलिता त्याने पुण्यात इंग्रजांचा प्रवेश होण्याच्या अठरा वीस वर्षापूर्वी लिहिलेला होता. यावरून महाराष्ट्रातल्या जनसामान्यात आणि पेशवाई शासनात अठराव्या शतकाच्या अखेरीसच केवढी दरी निर्माण झालेली होती ते लक्षात येते आणि मग केवळ पंचवीस स्वारांची तुकडी पुण्यात पाठवून इंग्रजांनी कोतवाल चावडीवर इंग्रजांचे निशाण चढवावे याचे नवल वाटण्याचे कारण उरत नाही.

सत्ता आणि संपत्ती यांचे काप मराठी सत्ता अस्तंगत झाल्यावर जरी गेले असले तरी वर्णीय अहंकाराची भोके उरली होतीच. हा वर्णीय अहंकार स्वानुभवाने ज्योतिबांना समजला होता. आणि डॉक्टर आंबेडकरांनाही समजलेला होता. कारण त्याचे असह्य चटके त्या दोघांनाही अनुभवावे लागले होते. हा जातीसंस्थेमुळे प्राप्त

होणारा असह्य अनुभव कार्ल मार्क्सला असणे शक्यच नव्हते. जरी तो ज्यू वंशाचा असला आणि ब्रिटिश म्युझियममध्ये त्याच्यावर असे मानहानीचे प्रसंग गुदरलेले नव्हते. म्हणून मार्क्सच्या भारतविषयक तपशिलवार माहितीची जेव्हा प्राध्यापक रावसाहेब कसबे प्रशंसा करतात आणि मार्क्स आणि आंबेडकर यांच्या विचारातील नाते फार निकटचे असल्याचे प्रतिपादन करतात तेव्हा मला त्यांच्या मतांचा प्रतिवाद करावासा वाटतो. भारतातील अथवा महाराष्ट्रातील धर्मविरोधाची धार समाजातील वर्गविरोधाला लीलया छेदून टाकणारी आहे आणि शूद्र-माणसाला किती खोलवर जखम करणारी आहे याची कल्पना मार्क्स अथवा एंगल्स् हे कितीही जरी ज्ञानी असले तरी त्यांना येणे शक्यच नव्हते.

ज्योतिरावांच्या जन्माच्याही पूर्वी १८२१ साली म्हणजे पेशवाई बुडाल्यानंतर तीनच वर्षांनी चॅप्लीन नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याने पुण्यात संस्कृत पाठशाला स्थापन केली. तिच्यात फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश मिळे. याच संस्थेचे रूपांतर पुढे १८५१ साली पुणे महाविद्यालयात होऊन ते सर्व हिंदूंना खुले ठेवण्यात आले. तेथे सोनार ,प्रभू इत्यादी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना प्राचार्य मेजर कॅन्डी हे स्वत:च संस्कृत शिकवीत असत. बहुतेक ब्राह्मण पंडितांनी ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांना शिकवण्याची तयारी दर्शविली, त्यांच्यावर हल्ला चढवतांना पुण्याच्या ज्ञानप्रकाशने असे विषारी उद्गार काढले होते की 'राजश्री नारायणशास्त्री अभ्यंकर व गोपाळशास्त्री गोखले यांनी सरकारपाशी सर्व जातीच्या मुलांस संस्कृत शिकवण्याचे कबूल केले. तारीख १ माहे मजकुरापासून (१८५३) शिकवू लागले आम्ही त्या दिवशी मुद्दाम विश्रामबागेत जाऊन पाहिले तो वर लिहिलेले शास्त्रीबुवा, स्वधर्माचा व स्वजातीचा अभिमान सोडून फक्त आपले पोट भरण्यावरच नजर देऊन, सोनार, शिंपी, प्रभू, फारशी, शूद्र इत्यादी जातींच्या मुलांस पुढे घेऊन संस्कृत कौमुदीतील नियम त्यांस सांगत होते. हर ! हर ! हर ! हे दुष्ट कर्मपाहून आमचे मनास तर फारच विस्मय झाला. हे विलक्षण कृत्य ह्या उभयता शास्त्र्यांनी चालवले हे गावभर झाले आहे. भट्ट व शास्त्री वगैरे लोकांची मने अगदी खवळून गेली आहेत. आम्ही असे ऐकतो की येथील अग्रेसर भट व शास्त्री यांनी सभा भरवून सदरहू शास्त्र्यांवर बहिष्कार घातला.' पुण्यात जे घडले त्याची पुनरावृत्ती त्याच सुमारास रत्नागिरी येथे झाली. वर्णीय अहंकाराचे हे निंद्यकृत्य इकडे ज्या काळात घडत होते त्याच काळात १८५२-५३ च्या सुमारास कार्ल मार्क्स आपले भारतावरील लेख लिहीत होता. बिचारा कार्ल मार्क्स !

प्रस्थापित समाज व्यवस्थेला आव्हान देणारा अथवा प्रस्थापित समाजाचे

कवच फोडून बाहेर पडण्याची हिम्मत धरणारा विचार अथवा आचार इंग्रजी प्रभुत्वाच्या आडोशाला उभा राहून हे काम करीत होता, असा आक्षेप काही जण घेतात. त्यात सत्यांश आहे पण तो मर्यादित अर्थानेच आहे. पाश्चात्यांच्या संसर्गामुळे आणि आधिपत्यामुळे येथील समाजाचा कायापालट होऊ लागला होता. प्रातिनिधिक शासन, राजसत्तेपासून स्वतंत्र अशी न्यायसंस्था, नागरिक स्वातंत्र्य, मुक्त अर्थव्यवस्था आणि वृतपत्रे इतकेच नव्हे तर सर्व भारताचे एक राष्ट्रीयत्व या कल्पना आपल्या देशात इंग्रजांचा हात धरून आल्या असे म्हणणे म्हणजे राष्ट्राभिमानाच्या विरुद्ध गोष्ट झाली असे मत अनेकदा मांडले गेलेले आहे. आज सुद्धा काही लोकांची तशी भावना असेल; परंतु मी असे म्हणेन की शेकडो-हजारो वर्षे चालत आलेल्या परंपरांचा, धर्ममतांचा आणि वर्ण व्यवस्थेचा चांगला झाडा घेतल्यावाचून नवा भारत खऱ्या अर्थाने निर्माण होणे असंभवनीय होते. भिडे भिडे पोट वाढे असे आपण वागून चालले नसते. एकटया भारताच्याच बाबतीत नव्हे तर अनेक राष्ट्रांच्या बाबतीत असा अनुभव आलेला आहे की, परकीयांचा घाव जेव्हा अंगावर पडला तेव्हाच तेथील आपल्याच तंद्रीत शेकडो वर्षे पडलेल्या समाजांना जाग आली आणि नवीन समाज रचनेचा आणि नवीन विचारांचा मार्ग तो समाज शोधू लागला.

रोमच्या ज्यूलियस सीझरने ख्रिस्ती सनाच्या जरा पूर्वी इंग्लंडवर कब्जा केला आणि त्या काळापासून इंग्लंडचे स्वरूप पालटू लागले. अमेरिकेचे आरमार टोकियोसमोर उभे ठाकले तेव्हाच तेथील श्रेष्ठवर्णीय सामुरायींचे डोळे खाडकन् उघडले. अशी अनेक उदाहरणे देता येतील. शिंपल्यामध्ये बसलेल्या कालवाच्या अंगात जेव्हा एखादा वाळूचा कण बाहेरून येऊन खुपू लागतो तेव्हा कोठे मौक्तिक रचनेला आवश्यक असणारा रस कालवाच्या अंगातून पाझरू लागतो. म्हणून ज्या कोणाला भारतीय समाजाची स्थिती, गती, अभ्यासावयाची आहे त्याने खोटया राष्ट्रीय अभिनिवेशाच्या आहारी जाता कामा नये. "जुने जाऊ द्या मरणालागुनि," ह्या केशवसुतांच्या पंक्तीचा अर्थ हाच आहे.

महाराष्ट्रापुरते आपण बोलत असल्यामुळे प्रस्थापित समाजरचनेत काही घोर व्यंग्ये राहून गेलेली आहेत, याची वाच्यता करण्यास लोकहितवादींनी प्रारंभ केला. त्याबद्दलचा त्यांचा राग, ती दूर व्हावीत यासाठी त्यांना लागलेली उत्कंठा, सर्व वर्णाचे गुरूपद आपल्याला स्वत:च बहाल करणाऱ्या ब्राह्मणांची क्षुद्रता, घमेंड आणि पोकळ ज्ञान, ब्राह्मणेतर समाजाला प्राप्त झालेली हीन अवस्था पाहून व ब्राह्मण विधवांची उडालेली दुर्दशा अवलोकून त्यांना त्यांच्याबद्दल कळवळा आला. लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांत तो जागोजाग व्यक्त केला असून शेवटी

भारतात लोकशाहीची स्थापना झाली पाहिजे असे भविष्यसूचक उद्गारही त्यांनी काढले. पण वर्णभेद मोडले पाहिजेत असा नेट त्यांनी धरला नाही. म्हणून त्यांची गणना समाजसुधारकांत करावी लागेल, समाजक्रांतिवाद्यांत नव्हे. माधवराव रानडे आणि त्यांच्या वर्तुळातील सुधारक यांनी सौम्य शब्दांत सुधारणेची बाजू धरली, परंतु महाराष्ट्रातील संतांना ज्याप्रमाणे समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात काही मूलभूत कामगिरी करून दाखवता आली नाही, तशीच रानडे आदींकरून सुधारकांची अवस्था झाली. आगरकरामध्ये आवेश आणि आग्रह दोन्ही होते; परंतु ते अल्पायुषी झाले. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाचा विचार केल्यास वर्णविरोधाचे आणि समानतेचे निशाण हाती घेऊन कायावाचामनेकरून सतत झुंजत राहिलेले फुले हेच एकमेव समाज-क्रांतिकारक ठरतात. लोकहितवादी काय, रानडे काय, आगरकर काय ही सर्व मंडळी आपापल्या परीने मऊ-कडक लिहून वर्ण आणि जातिव्यवस्थेचे अन्याय्य स्वरूप वरिष्ठ वर्णातील नेत्यांना पटवून देण्याची भूमिका वठवीत होते. पण या त्यांच्या समजावणीच्या भूमिकेत आणि फुल्यांच्या एल्गाराच्या भूमिकेत मूलगामी फरक होता. 'नंदान्तम् क्षत्रियकुलम्' असे म्हणून ब्राह्मणाव्यतिरिक्त सर्वांनाच शूद्रांच्या पंक्तीस नेऊन बसवणाऱ्या ब्राह्मणी वर्चस्वावर ज्योतिबा एकीकडे तुटून पडत होते आणि दुसरीकडे शूद्रांना 'तुम्ही उठा; तुम्ही ज्ञान मिळवा आणि आपला समानतेचा हक्क गाजवा' असे जिवाच्या आकांताने सांगून त्यांना बंडास प्रवृत्त करीत होते. या दोन भूमिकांत महदंतर आहे, हे सांगण्याची गरज नाही. फुल्यांच्या ठिकाणची आणखी एक महत्ता अशी होती की ते बोले तैसा चाले ही तुकारामहाराजांची उक्ती आचरून दाखविणारे होते. फुल्यांच्या अगोदर शूद्रांच्या अंगी नवीन विचारांचे चैतन्य खेळविण्याचा प्रयत्न पुण्यातले शिवराम जानबा कांबळे, अहमदनगरचे पांडुरंग इंगळे आणि नागपूरचे किसन फागू या मंडळींनी जसा केला, तसाच ते चैतन्य टिकवण्याचा प्रयत्न १८९० साली फुल्यांचा मृत्यू झाल्यावर विठ्ठल रामजी शिंदे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला.

विठ्ठल रामजी शिंदे यांचे वैशिष्ट्य यात होते की त्यांनी सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही आघाडयांवर सारख्याच तळमळीने काम केले. वर्णमुक्तीच्या लढयाचा भारताच्या स्वातंत्र्यलढयाशी सतत संबंध राहिला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी सातत्याने घेतली. त्यासाठी त्यांना सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज या दोन्ही मान्यवर नेत्यांना विरोध करावा लागला आणि तरीही त्यांनी आपली भूमिका सोडली नाही, ही विशेषच गोष्ट मानावी लागेल. विठ्ठल रामजी शिंदे यांनी घेतलेली ही भूमिका जर आधी महात्मा फुल्यांनी आणि त्यांच्यानंतर

डॉ. आंबेडकरांनी घेतली असती तर भारताच्या स्वातंत्र्यलढयाचा पाया इतका विस्तृत झाला असता की त्यात चातुर्वर्ण्याभिमानी पक्ष गाडले गेले असते आणि स्वातंत्र्यलढयाला एका खऱ्याखुऱ्या जनक्रांतीचे स्वरूप आले असते. जर असे घडते तर पुढे डॉ. आंबेडकरांनी सिद्ध केलेल्या, भारताच्या संविधानाच्या प्रारंभी, 'वुई, द पीपल ऑफ इंडिया ('आम्ही भारतीय लोक') असे जे आत्मविश्वास दर्शक शब्द आहेत, ते सर्वार्थाने सत्य ठरते. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातला वर्णविरोध इतका तीव्र होता की देश स्वंतत्र झाल्यावर त्यापासून लाभ झाला तरी तो त्रैवर्णिकांना होईल; आणि त्यांचे जोखड आपण जसे आतापर्यंत आपल्या खांद्यावर वाहत आलो, ते पुढेही तसेच वाहावे लागेल, अशीच ब्राह्मणेतरांना अथवा त्रैवर्णिकेतरांना वाटावे.

चातुर्वर्ण्यासंबंधी निखालस अशी भूमिका डॉ. आंबेडकरांच्या प्रमाणे त्या काळी गांधीजींनीसुद्धा घेतली नव्हती. मग फुल्यांच्या काळातली उच्च जातीतली नेतेमंडळी कोणती भूमिका घेत होती याचा विचार करण्याचेसुध्दा कारण नाही. प्रत्येक सामाजिक सुधारणेबाबत टिळक आगरकरांशी म्हणजे सुधारकांशी किती आवेशाने झुंजत असत, याची साक्ष इतिहासात पावलोपावली मिळते. हिंदू धर्माचा अभिमान म्हणजे चातुर्वर्ण्याचा अभिमान ही भूमिका मांडीत असताना त्या काळातली चांगली शिकलीसवरलेली आणि मोठमोठी पदे विभूषित करणारी मंडळी कसा विचार करीत असत, याचे उत्कृष्ट उदाहरण पहावयाचे असेल, तर कै. प्रा. गोळे यांच्या 'हिंदू धर्म आणि सुधारणा' या ग्रंथातील हिंदू धर्माची पंच महातत्त्वे हा भाग वाचावा. 'उत्कृष्ट धर्मव्यवस्थेमुळे वर्गावर्गाची (वर्णाची) कर्तव्ये उत्तम प्रकारे नियमित केली गेली व कोणासही जीवनार्थ विलक्षण प्रकारचा कलह करण्याची आवश्यकता राहिली नाही. ज्याची कर्तव्ये त्याने करावयाची असा निश्चय राहिल्याने केव्हाही सर्व राष्ट्र युद्ध संग्रामात गुंतून गेले नाही. ज्यांचे युद्धाचे काम नव्हे, ते समोर युद्ध चालले असता तटस्थ राहात. यामुळे जरी अनेक राज्यक्रांत्या झाल्या, तथापि नवीन राज्यकर्त्यास देशातील सर्व लोक शत्रूप्रमाणे वाटले नाहीत व ते तसे नव्हतेही, नवीन राज्यकर्त्यास योग्य करभार देऊन आपापली कर्तव्ये पूर्ववत् करीत राहण्याची व पूर्ण समाधानाने आयुष्य घालवण्याची ही जी आमची तऱ्हा, ती दुसऱ्या, विलयास गेलेल्या राष्ट्रांमध्ये सापडत नाही. हा आमचा विशिष्ट गुण पूर्वापार चालत आलेल्या जातिभेदामुळे आम्हात आलेला आहे. अनेक राज्यक्रांत्यांतून या जातिभेदानेच आम्हास पार पाडले आहे असे म्हणण्यास हरकत नाही. जातिभेदाचे व निश्चित कर्तव्यशीलतेचे या प्रकारचे महत्त्व इंग्रज राज्यकर्त्यांच्या ध्यानात आलेले नाही व ते जातिभेद मोडण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु तसे करणे त्यांच्या राज्यसत्तेच्या

स्थैर्यास बाधक होणार आहे. हिंदुस्थानात जीवनार्थ कलह फारच थोडा दिसतो हे पाहूनही राज्यकर्त्यास आश्चर्य वाटते. परंतु तोही धर्माचा व जातिभेदांचा परिणाम गणिला पाहिजे. आमचा धर्म व जातिभेद असाच कायम राहिल्यास पूर्वीप्रमाणे आणखी कितीही राज्यक्रांत्या पुढे झाल्या तरी त्यांतून आम्ही सुरक्षित बाहेर पडू. कोणाही राज्यकर्त्यास हिंदूवर राज्य करणे जितके सुलभ व सुखाचे होईल, तितके दुसऱ्या कोणाही धर्माच्या लोकांवर होणार नाही.' १८९८ सालात व्यक्त झालेले हे विचार आहेत ! हे प्रतिपादन उपहासात्मक वाटते. पण ते तसे नाही.

हा उतारा लांबलचक वाटेल; परंतु एक उच्चपदस्थ ब्राह्मण लेखक वर्णाश्रम-व्यवस्थेकडे कोणत्या दृष्टीने पहात होता, याची संशयातीत कल्पना येण्यासाठी तो सविस्तर उद्धृत करणे मला आवश्यक वाटले. १८५३ साली 'न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून' या वृत्तपत्रासाठी लिहिलेल्या लेखात मार्क्सने केलेले, भारतीय समाजाचे विश्लेषण वरील अवतरणाशी तंतोतंत मिळतेजुळते आहे. मात्र त्याचे हेतू आणि निष्कर्ष फक्त वेगळे आहेत याचे आपण अवधान ठेवले पाहिजे. मार्क्सने त्यावेळी लिहिले होते : 'भारतावर इंग्रजांनी कबजा मिळवला, हे कसे घडले असावे बरे ? केवळ हिंदु व मुसलमानांतच नव्हेतर जमाती-जमातींत, जाती-जातींत वाटला गेलेला असा हा देश आणि असा हा समाज; अशाच्या ललाटलेखी पराभवावांचून दुसरे काय असणार ? भारताला हा ललाटलेख टाळता येणे शक्यच नव्हते. कोणा ना कोणाकडून तरी सतत जिंकले जाणे, यालाच भारताचा इतिहास म्हणायचे.ज्याला इतिहास असे नाव देता येईल, असा इतिहास भारताचे बाबतीत नाहीच. ज्याला भारताचा इतिहास असे म्हटले जाते, तो म्हणजे परकीयांनी भारताच्या अपरिवर्तनीय व प्रतिकारशून्य अशा निष्क्रियतेला पराभूत करून प्रस्थापित केलेल्या साम्राज्यांचा इतिहास आहे'.

भारतीय समाजाला अपरिवर्तनीयता, पराभूतता आणि निष्क्रियता असे जे दुर्धर त्रिदोष जडलेले होते ते अतिशूद्रांच्या बाबतीत तर पराकोटीला पोचलेले होते. वर्ण व्यवस्थेच्या उतरंडीमधील अगदी बुडातले गाडगे म्हणजे शूद्रातिशूद्र. त्याच्या खाली जाळ पेटवण्याचे महा बिकट कार्य ज्या महापुरूषाने केले त्याचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर. त्यांच्या 'कळवळ्याची जाती' महात्मा फुल्यांच्याच तोडीची होती. परंतु वर्ण संस्थेवर डॉ. आंबेडकरांनी हल्ले चढवताना तर्काची आणि युक्तिवादाची जी हत्यारे वापरली ती फुल्यांनी उपयोगात आणलेल्या ओबडधोबड शस्त्रापेक्षा फारच उच्च दर्जाची होती ती शस्त्रे पुढे निखळ ब्राह्मण्यविरोधी राहिली नाही, त्यांना ब्राह्मणद्वेषाचे स्वरूप प्राप्त झाले. पण डॉक्टर बाबासाहेबांच्या चळव-

ळीत तशी विकृती निर्माण झाली नाही. महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह करण्याचा ठराव ज्या परिषदेमध्ये मंजूर झाला तिथे घडलेली घटना या दृष्टीने अतिशय बोलकी आहे. महाडच्या पांढरपेशा समाजाच्या नेत्यांनी त्या वेळी असा घाट घातला की परिषद भरविण्यासाठी आसपास आंबेडकरांना जागाच मिळू नये. शेवटी ही जागेची अडचण एका मुसलमानाने आपली जागा देऊन दूर केली ! चवदार तळ्यावर जाऊन सत्याग्रह करण्याचा ठराव श्री. सहस्त्रबुद्धे नावाच्या एका ब्राह्मणाने मांडला. आणि परिषदेच्या मांडवात जे एकमेव चित्र लावलेले होते, ते महात्मा गांधींचे होते. याहीपेक्षा बोलकी अशी दुसरी घटना म्हणजे ब्राह्मणेतर चळवळीचे तेव्हाचे नेते श्री. केशवराव जेधे व जवळकर यांनी डॉ. आंबेडकरांना लिहिलेले पत्र आणि त्याला बाबासाहेबांचे रोकडे उत्तर. ब्राह्मणेतर नेत्यांनी बाबासाहेबांना असे सुचविले होते की महाडच्या सत्याग्रहाला ब्राह्मणेतरांचा पाठिंबा राहील; मात्र तो एक अटीवर की, त्यामध्ये ब्राह्मणांना भाग घेण्यास मज्जाव असावा. ही सूचना फेटाळून लावताना दिलेल्या सडेतोड उत्तरात बाबासाहेबांनी असे म्हटले की, 'आमची चळवळ ब्राह्मणांविरुद्ध नाही. ती ब्राह्मण्याविरुद्ध असल्याने आम्हाला तुमची सूचना मान्य करणे शक्य होणार नाही.' हा लहानसा प्रसंग काय अथवा बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातिसंस्थेचा विध्वंस' (अनहिलेशन ऑफ कास्ट) या आपल्या जगविख्यात प्रबंधात अथवा महात्मा गांधीजीबरोबरच्या पत्रव्यवहारात वेळोवेळी ज्या भूमिका मांडल्या त्या काय, त्यामधून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे बाबासाहेबांची तर्कशुद्ध विचारपद्धती आणि आपले मत भरभक्कम माहितीच्या आधाराने कोणाहीसमोर निर्भयपणे मांडण्याची हिंमत. जातिसंस्थेचा विध्वंस या प्रबंधाच्या प्रारंभी एच. ड्रमंट यांची तीन वाक्ये त्यांनी उद्धृत केली आहेत, ती अशी :

* 'जो युक्तिवाद करण्यास तयार नाही. त्याला धर्मांध म्हणावे.

ज्याला युक्तिवाद करता येत नाही, त्याला मूर्ख समजावे.

ज्याला युक्तिवाद करण्याची हिंमत नाही, त्याला दास समजावे.

एखादा वीर ज्याप्रमाणे रणांगणात उडी घेण्यास उत्सुक असतो, तसे बाबासाहेब बौद्धिक संग्राम करण्यासाठी नेहमीच उत्सुक असत आणि त्यांच्या बुद्धीला जे पटले, ते कृतीत आणण्याची त्यांची सदैव तयारी असे. हंटर कमिशनपुढे आपले विचार सादर करीत असताना राणीसरकारने गावोगाव प्राथमिक शाळा काढाव्या, असे सुचवीत असताना ज्योतिबा फुल्यांनी असेही सुचवण्यास कमी केलेले नव्हते की या शाळांमधून ब्राह्मण शिक्षक अजिबात नेमू नयेत. याच्या उलट डॉ. आंबेड-

करांच्या उपरोक्त प्रबंधात त्यांनी 'इंटेलिजेन्शिया' -बुद्धिमंतांसंबंधी व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. वर्णव्यवस्था मोडली पाहिजे हे मत जसे महात्मा फुल्यांचे तसेच ते डॉ. आंबेडकरांचे; परंतु या दोघांच्या विचारपद्धतीत आणि कार्यपद्धतीत ठळक असे फरक दृष्टीस पडतात. अमुक एका वर्णाचे उच्चाटन आणि अवघ्या वर्णव्यवस्थेचे उच्चाटन यामधला हा फरक आहे. कार्लाइलने समाज एकत्र बांधून ठेवण्यासाठी जे 'जैविक तंतू' (ऑर्गॅनिक फिलामेंटस्) आवश्यक आहेत असे म्हटले होते, ते हिंदू धर्मीयांत नाहीत; ते निर्माण केले पाहिजेत, हा मुद्दा मांडताना डॉ. आंबेडकरांनी १९३६ साली प्रसिद्ध झालेल्या या प्रबंधात असे विधान केले की, 'जातिव्यवस्थेच्या पायावर तुम्हाला कसलीच उभारणी करता येणार नाही. समाजाची सर्व शक्ती तुम्हाला एकवटता येणार नाही. स्वरक्षणासाठी नाही, तशीच आक्रमणासाठीही नाही.'

देशाचे विघटन जर जातिभेदामुळे अथवा वर्णभेदामुळे होत असेल तर ते भेद देशहितासाठी नष्ट करावे लागतील, हे ओघानेच येते. पण हे भेद नष्ट करण्याचा प्रयत्न ब्राह्मणांकडून होणार नाही, असे जे प्रतिपादन बाबासाहेबांनी केले आहे ते मला पटत नाही. कारण ब्राह्मणांच्या समष्टीला किंवा ब्राह्मण वर्गाला त्यांचे प्रतिपादन लागू पडेलही, पण ब्राह्मण वर्गातील अनेक व्यक्ती अशा निघू शकतील की ज्या वर्णविध्वंसाचा पुरस्कार करतील. आज जे दृश्य दिसते आहे ते तर असे आहे की सत्तेची स्थाने ब्राह्मणांकडून मराठा समाजाकडे हस्तांतरित होत आहेत आणि ही हस्तांतराची क्रिया जवळपास पूर्ण होत आलेली आहे. तेव्हा पूर्वी व आता सत्ता व संपत्तीची स्थाने भोगणारा ब्राह्मण वर्ग जसा वर्णविध्वंसाच्या विरूद्ध उभा रहात असलेला दिसतो तसा चाली, रीती, धार्मिक परंपरा, यांचा पुरस्कार तत्सम असे दुसरे ब्राम्हणेतरजन करू लागलेले दिसतात. महात्मा फुल्यांच्या आंदोलनाचा वापर आपल्यापुरता करून घेण्याची वृत्ती जशी ब्राह्मणेतरांनी दाखवली, तशीच डॉ. आंबेडकरांच्या महात्मतेचा वापर बौद्ध (महार) समाजातील लोक करून घेत असल्याचे दिसत नाही का ? राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शिवसेना, मराठा महासंघ, पतितपावन, भीमसेना, दलित पँथर, ही सर्व नव्या मध्यमवर्गात दाखल होत असलेल्या जुन्या जातींची आणि वर्णांची आधुनिक काळातील रुपे आहेत म्हणा अथवा सोंगे आहेत म्हणा. जोपर्यंत वर्ण आहेत आणि जाती आहेत, तोपर्यंत आपापली कुरणे राखून ठेवण्याचा प्रयत्न चालूच राहणार, मग देशाचे काही होवो !

वर्ण आणि जाती उपजाती यांचा प्रचार भारतामध्ये सर्वदूर कोणत्या कारणामुळे झाला असावा ? बाबासाहेबांनी मानवातील अनुकरणशीलता हे त्याचे जे एक

कारण सांगितले होते ते मला अपुरे वाटत असल्यामुळे मला असे सुचवावेसे वाटते की या विषयाच्या उलगडयाच्या कामी फ्रॉइड व युंगसारख्या मनोविश्लेषणकारांचा आपल्याला अधिक उपयोग होईल. आपल्या परंपरेत धर्मार्थमोक्षकाम असे जे पुरुषार्थ चतुष्ट्य सांगितलेले आहे, त्यातला "काम" शब्द केवळ शृंगारातील काम असा न घेता नानातऱ्हेच्या इच्छा-आकांक्षा या अर्थी जर घेतला आणि फ्रॉइड-युंग सारख्या मनोवैज्ञानिकांनी सुप्त भावनांच्या प्रमाथित्वाचा जो वेध घेतलेला आहे त्याच्याशी जर त्यांची सांगड घातली तर ही जातींची उतरंड भारतीय जनतेने का मान्य केली असावी ते कळण्यास मदत होईल. मी एखाद्याहून खाली असेन पण मी कोणाच्या तरी वर आहे ही भावना माणसाला सुखदायी वाटते. आम्ही इतराहून काही विशेष आहोत, वेगळे आहोत. या विधानामुळे मनुष्याचा अहंभाव कुरवाळला जातो. माणसाच्या मनातील ही अव्यक्त पण बलवान वासना मन्वादिक स्मृतीकारांनी ओळखून ही चातुर्वर्ण्य व्यवस्था रचली असेल काय ? माझेपणाची जपणूक ही वर्ण व जाती-उपजातींच्या फैलावाची आद्यप्रेरणा तर नसेल ? भारतीय समाजाची आजची स्थिती जर तपासू लागले तर वर्णाश्रित श्रेष्ठत्वाचे जतन करण्यासाठी ब्रह्म-क्षत्रिय वैश्य अशी त्रयी एकत्र होऊन ती वर्णीय फळ्यांमध्ये धर्मपुनरुज्जीवनाच्या घोषणा देऊन एकी घडवण्यात यशस्वी होतील अशी चिन्हे दिसताहेत.

तथापि अल्प प्रमाणात का होईना, सर्व वर्णातील काही मंडळींनी तरी आपली वर्ण व्यवस्थेशी जखडलेली नाळ कापून टाकली आहे. फुल्यांच्या प्रतिपादनातील मर्म आणि डॉ. आबेडकरांच्या प्रतिपादनातील तर्क जे आत्मसात करतील आणि गेली शेकडो वर्षे प्रकट वा अप्रकट, जागृत अथवा सुप्त अवस्थेत चालत आलेली वर्णपद्धती नष्ट करण्यासाठी जे कंबर कसून उभे राहतील,त्यांच्याच हातून खरा एकात्म आणि वर्णातीत राष्ट्रवाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

आपल्या समाजदेहाच्या नसानसातून आणि समाज मानसाच्या तंतू तंतूमधून भिनलेला हा वर्णभेदाचा विखार काढून टाकणे हे फार कालावधीचे काम आहे. वर्णभेदाची कल्पना नैसर्गिक मुळीच नाही, ती आरोपितच आहे आणि ती प्रसार माध्यमांच्या द्वारा व दंडशक्तीच्या द्वारा समाजात घुसवण्याकरता ती ईश्वरदत्त असल्याचा डांगोरा सतत पिटण्यात आलेला आहे. हीच साधने उलटी वापरून वर्ण भेदाच्या विषाचा निचरा करावा लागेल. बाबासाहेबांनी आंतरजातीय विवाह हा वर्णभेदावरील एकमेव तोडगा असल्याचे प्रतिपादन केलेले आहे आणि सहभोजनासारख्या प्रयोगांना तुच्छ नसले तरी गौण मानले आहे. आंतरजातीय विवाहाची ही लांब उडी मानसिक पूर्वतयारीवाचून समाज कसा मारू शकेल ? त्या पूर्वतया-

रीसाठी शब्दशक्ती व लोकशक्ती यांचा बुद्धिपुरःसर वापर करावा लागेल. पण हे कार्य स्वत: वर्णत्याग केलेले तरूण शेकडोंनी आणि हजारांनी नवसमाजरचनेचा दृढ संकल्प करून पुढे सरसावल्याशिवाय होणार नाही हे उघड आहे.

***

तिमिरातुनी तेजाकडे....

कवी बिल्हणाने 'राजतरंगिणी' नावाचे काव्य काश्मीरमधील राजघराण्यांवर लिहिले. मी काही कोठल्याही राजघराण्यात जन्माला आलेलो नाही. मी साधा राजपुरूषही नाही ! उलट 'नृपसदने नाम के वयम्'- अशा सामान्यांच्या सदरात मी मोडतो. म्हणून मी आत्मलक्षी असे काही लिहावे, असे जेव्हा माझ्या मित्रांनी सुचविले, तेव्हा मला पेच पडला. आत्मचरित्र तर लिहावयाचे नाही असे मी केव्हाच ठरविले होते. जे आत्मचरित्र लिहितात त्यांना किमान अंशी आपल्यामध्ये काही तरी 'खास' आहे असे वाटत असले पाहिजे ! कारण कोणत्याही आत्मकथा लिहिणाऱ्या व्यक्तीला स्वत:वर टीका करण्यासाठी आपले चरित्र आपणच लिहावे असे वाटणे शक्य नाही. आत्मगौरव आणि आत्मसमर्थन हा आत्मकथेचा अविभाज्य भाग आहे. काही कथांतून तो औद्धत्याने पुढे येईल आणि काही कथांतून तो नम्रतेची वस्त्रे ल्यालेला दिसेल, एवढाच फरक ! मला त्यापैकी काहीच करायचे नाही. मला जो पेच पडला असे म्हटले, तो यामुळे. पण प्रा. प्रधानांनी जेव्हा मला असा मार्ग सुचविला की गेल्या ऐंशी वर्षात तुमचा विचारप्रवाह कसा वाहत गेला, वळणे-वाकणे घेत गेला त्याचे रेखाटन तुम्हाला करता आल्यास पहा, तेव्हा मात्र त्यांना नकार देणं मला शक्य वाटले नाही.

परंतु याचा अर्थ असा नव्हे की माझ्या ऐंशी वर्षांतील आयुष्यामध्ये जी वैचारिक स्थित्यंतरे होत गेली, त्यांचे रेखाटन करणे सोपे होते. गेली जवळजवळ पन्नास वर्षे मी कधी हौसेने तर कधी कर्तव्यबुद्धीने अभ्यास करीत आलो आहे, लिहीत आलो आहे. परंतु हे लिहीत असताना वा अभ्यास करीत असताना या सर्वांचा कोठेतरी एक प्रवाह बनला पाहिजे अशी योजना बुद्धिपुरस्सर आखलेली नव्हती. आता मागे वळून पाहताना मात्र असे दिसते की या सर्व अभ्यासाचा, चिंतनाचा आणि लेखनाचा एक ओघ सहजपणेच बनत चाललेला होता. मुली ज्याप्रमाणे फेर धरून नाचत असतात आणि त्यांच्या हातांतील धाग्यांचा गोफ प्रत्येक पदन्यासाबरोबर आपोआप विणला जात असतो, तसाच काहीसा प्रकार माझ्या गोफातील नानाविध विचारसूत्रांच्या बाबतीत झाला असावा. वेदपाठी भिक्षुक ज्याप्रमाणे वेद मुखोद्गत करण्याचा निश्चय करून वेदपठणाला प्रारंभ करतात, किंवा 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' असे म्हणून शांकरभाष्याचे अध्ययन करतात,

त्याप्रमाणे आपल्याला अमुक एक विचारधारा आत्मसात् करावयाची आहे असा निश्चय करून मी कोणत्याही विषयाच्या अभ्यासाला प्रारंभ केलेला नव्हता. माणसे भेटत गेली, प्रसंग घडत राहिले, विचारांचा परिचय होत राहिला. चिंतन चालूच असते.८१ व्या वर्षात उभा असूनसुद्धा मी असे म्हणण्याचे धाडस करणार नाही की मी बुद्ध झालो आहे, मी पोहोचलो आहे ! कारण माझ्या मते कोणत्याही ज्ञानाच्या किंवा विचाराच्या बाबतीत, मग ते ज्ञान अथवा विचार ऐहिक असोत की पारमार्थिक पूर्णावस्थेची पायरी ते कधीच गाठू शकत नाहीत ! कारण माझ्या पूर्वी अनंत वर्षे, माझ्या अखेरच्या क्षणापर्यंत आणि त्यानंतरही अनंत काळपर्यंत हे जग घडत राहिलेले आहे, बदलत राहणार आहे आणि त्यांच्यासंबंधीचे मनुष्याचे ज्ञानही बदलत वाढत जाणार आहे, असे मी मानतो. विचारांच्या बाबतीत पूर्णविरामाला माझ्या मते जागाच नसते आणि तशी ती नसावीही. म्हणून जे कोणी वेदांपाशी थांबतात, कुराणापाशी थांबतात, बायबल अथवा ग्रंथसाहेब हा अखेरचा शब्द समजतात, बुद्धं शरणं गच्छामि म्हणतात त्या सर्वांचीच मला कीव येते, ही सर्व माणसे फार ठेंगण्या मनाची आहेत असे मला वाटते. आपल्या परातीच्या पाण्यात आकाश दिसते म्हणून आकाश परातीएवढे आहे असे म्हणण्यासारखा हा खुळा प्रकार आहे.

मला ऐंशी वर्षे पूर्ण झाली म्हणून मी ऐंशी वर्षे विचार करीत आलो आहे, असेही म्हणता येणार नाही. मला स्मरते त्याप्रमाणे माझ्या आयुष्यातल्या पहिल्या दहाबारा वर्षात ज्याला विचार असे म्हणता येईल तसे काही अस्तित्वात होते असे मला वाटत नाही. त्या वेळी महिना पन्नास साठ रुपये पगार मिळवणारे माझे वडीलसुद्धा सुस्थितीतले समजले जात. त्यामुळे रस्त्यावरील बत्तीच्या उजेडात बसून मला अभ्यास करण्याची अथवा एकच सदरा रात्री धुऊन सकाळी तोच अंगात घालण्याची स्थिती कधी अनुभवता आली नाही. 'तुला अभ्यासासाठी जे लागेल ते माग आणि शरीर कमावण्यासाठी जे खावेसे वाटेल ते (फक्त शाकाहारी) खा', असे वडील मला सांगत आणि त्याहून अधिक काही पाहिजे, असे मला वाटत नसे. मुंज झाल्यावर मी त्या वेळच्या रीतीभातीप्रमाणे संध्या, पूजापाठ शिकलो. कोकणात सुटीमध्ये गेल्यावर आमचे उपाध्याय सोवनी आणि मराठे यांच्याकडून पुरूषसूक्त आणि रुद्र यांचे पाठ घेतले. वेदघोष अजूनही माझ्या कानांना गोड वाटतो. मी नियमितपणे सकाळ-संध्याकाळ संध्या करीत असे. संध्याकाळी हरिहरेश्वराच्या दर्शनाला जात असे आणि निजण्यापूर्वी गीतेचा एक अध्याय म्हणत असे. माझ्या गळ्यात जानवे होते. डोक्यावर हातभर लांब शेंडी होती. माझी त्या वेळची वागणूक आजच्या कोणत्याही कडव्या स्वयंसेवकापेक्षा हिंदुत्वनिष्ठ होती ! आमच्या घरा-

शेजारून जाणाऱ्या ताबूतांच्या मिरवणुकीकडे फिरकायचेसुद्धा नाही, असे ठरवण्याइतपत मी हिंदुत्ववादी होतो. 'भाला' हे माझे आवडते दैनिक होते. सत्यशोधक समाजाचा मी कडवा विरोधक होतो. उपवास, पूजा, तपश्चर्या इत्यादी परंपरागत आचारविचारांचा मला मोह होता. प्रथम इंग्रजांची भीती आणि नंतर त्यांचा द्वेष, अशा स्थित्यंतरांमधून मी जात होतो. फार लांबण न लावता त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीबद्दल एवढे सांगितले तर पुरे की त्या वेळचे माझे क्षितिज हे अगदी मर्यादित, परंपरेशी जखडलेले आणि दुनियेकडे एका अत्यंत लहान अशा गवाक्षातून पाहणारे होते. महत्त्वाकांक्षा, विशाल दृष्टी, पुरुषार्थ इत्यादि शब्दांची वर्णने करण्याजोगे त्यावेळी माझ्या जीवनात काही होते असे मला म्हणता येणार नाही. घरातील आणि आमच्या शेजारातील वातावरणही या कोंडीत माणसाला जखडून ठेवील अशाच प्रकारचे होते. त्या आमच्या समाजातील स्त्रिया किंवा पुरूष यांना कोठेही पोहोचावयाचे नव्हते. त्यांच्या डोळ्यांसमोर देवाने दिलेले आयुष्य जसेच्या तसे जगण्यापलीकडे कोणतेही ध्येय नव्हते. दिशाहीन आणि ईर्ष्याहीन अशी ही सर्व माणसे माझ्या अवतीभोवती वावरत होती. मुले, माणसे जन्माला येत होती, जीवन जगत होती, आयुष्याची दोरी तुटली की मरत होती. ती सर्व परमेश्वराच्या कृपेने. कस गेलेल्या जमिनीतली झाडे जशी खुरटतात, तसा हा सर्व बाजूंनी खुरटलेला समाज होता. त्यामधून जी काही मूठभर मंडळी मुसंडी मारून पुढे जात, तीही देवाच्या कृपेनेच एवढी मोठी झाली असावीत असे समजण्यात येई.

माझ्या लहानपणच्या समाजात अंधश्रद्धांचा तर धुमाकूळच होता. भोरचे महाराज, केडगावचे महाराज, माणिकप्रभू, साईबाबा, यांचे नाव आणि त्यांनी केलेले चमत्कार सतत कानांवर येत. बाळ गंगाधर टिळकांचा केसरी वाचणारा मनुष्यही त्या वेळी वीरपुरूष समजला जात असे. मग खुद्द टिळकांना ईश्वरी अवतार असे लोक मानीत होते, याचे नवल वाटण्याचे कारण नाही. त्यातून आमचे घराणे टिळकांप्रमाणे चित्पावन ब्राह्मणांचे ! टिळकांनी ज्या आगरकरांना 'माळावरचा महारोगी' म्हटले, त्यांचे नाव उच्चारणेसुद्धा आमच्या मंडळीत पाप होते आणि जोतीराव फुल्यांचे विचार तर शुद्ध धर्मबुडवेपणाचे विचार मानले जात, हे सांगायलाच नको.

अशा या कुंद आणि चिरेबंदी वातावरणातून मी जो उडालो तो एकदम निरीश्वरवादाच्या तटबंदीविरहित टेंबावर येऊन उतरलो, असा काही चमत्कार माझ्या बाबतीत घडलेला नाही. शेंदराचे थरावर थर जडलेल्या मारुतीची मूर्ती ते कवच एके दिवशी गळून पडले की मूळ स्वरूपात प्रकट होते तसे माझ्या बाबतीत

झालेले नाही. परंपरेमध्ये लपेटलेले माझे मन भोवताली घडत असलेल्या घटना पाहत असावे आणि माझ्या मेंदूच्या पेशींमध्ये काहीतरी हालचाल होत राहिली असावी. त्यामुळे काही प्रश्नांचे आकडे आणि तर्कांचे तंतू माझ्या डोक्यात निर्माण होत राहिले असावेत.ही प्रक्रिया नेमकी कोणत्या घटनेपासून किंवा तिथीपासून सुरू झाली, ते मला नक्की सांगणे कठीण आहे. शक्यता अशी आहे की, एकदा मी माझ्या वडिलांबरोबर कोकणात गेलो असताना आमच्या गावचे दैवत जे कालभैरव, त्याच्या मंदिराकडे जात असताना समोरून येणारा, घोंगडी खांद्यावर टाकलेला आणि कासेला फक्त लंगोटी असणारा एक 'झिलगा' (तरूण मनुष्य) आम्हाला दिसला. संध्याकाळची वेळ होती. आम्हाला पाहताच तो एकदम खाली बसला आणि आम्ही त्याला ओलांडून पुढे गेल्यावर तो उठून चालू लागला. मी वडिलांना विचारले की तो आपल्याला पाहताच खाली का बसला ? वडील म्हणाले, 'तो महार ना ? त्याची सावली आपल्या अंगावर पडू नये म्हणून तो खाली बसला.' माझ्या लहानशा मेंदूतली चक्रे त्या प्रसंगाने थोडीशी फिरली असतील. कदाचित असेही असेल की माझ्या थोरल्या बहिणीचे लग्न झाल्यानंतर प्रत्येक वेळी सासरी जाताना ती टिपे गाळी. सासरची माणसे तिला जाच करतात असे आई म्हणे. त्या वेळी माझ्या पारंपरिक मनातील समाधानाची साय डुचमळली असेल. किंवा असेही असेल की आमच्याच वाडयातल्या, सदैव तांबडी आलवणे नेसलेल्या बाया मला हळूच खुणावीत आणि आप्पा बळवंत चौकातल्या एखाद्या न्हाव्याला बोलवून आण असे हळूच सांगत, त्या वेळी इतर बायकांचे साजशृंगार आणि या काकूंचे किंवा या मावशींचे सदैव पांढरे राहणारे कपाळ यांमधील फरकाची बोच लागून माझे मन अस्वस्थ झाले असेल. असे एक ना दोन, अनेक प्रसंग येत होते आणि जात होते आणि त्यांच्यामुळे, माझ्या मनावर चढलेली पुटे प्रत्येक वेळी थोडीफार खरवडली जात होती.

मॅट्रिकची परीक्षा देण्याआधीच मी माझ्या इतर वर्गमित्रांच्या मानाने बरेच वाचलेले होते. हॅम्लेट, मॅक्बेथ, रोमिओ ज्यूलिएट, ऑथेल्लो या शेक्सपिअरच्या चार शोकान्तिका, वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या, तुलसीदासाचे संपूर्ण रामायण आणि महाभारताचे मराठी भाषांतर, हरिभाऊंच्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्या, अरेबिअन नाइट्स इत्यादी साहित्य मी अधाश्यासारखे ओरपले होते. परंतु त्यांच्याकडे सामाजिक दृष्टीने पाहण्याचे सामर्थ्य माझ्या ठिकाणी त्या वेळी अजिबात नव्हते. ती शक्ती अथवा ती दृष्टी मला आता आठवते त्याप्रमाणे प्रथमतः आगरकरांचे निबंध मी वाचू लागलो तेव्हापासून प्राप्त होऊ लागली. चिपळूणकर

आणि टिळक एका बाजूला आणि आगरकर दुसऱ्या बाजूला, असा फरक हळूहळू लक्षात येऊ लागला. सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशीचा सत्याग्रह होत होता, तेव्हा मी इंग्रजी पाचवी-सहावीत असेन. त्या वेळी सत्याग्रह हा शब्द मी प्रथमच ऐकला. जालियनवाला बागेच्या वेळी शेकडो लोकांची कत्तल झाली एवढे ऐकले होते, परंतु त्यातील संघर्षाचा अर्थ मनावर रुजला होता असे म्हणता येणार नाही. जरी १९१८ ते १९२५ पर्यंतचा काळ निरनिराळ्या घटनांनी इतका भरलेला होता, तरी त्या घटनांचा अर्थबोध होण्याइतपत माझ्या मनाला पक्वता आली नव्हती. मॅट्रिक झालो त्या वेळेपर्यंत मी ब्रिटिश सत्तेचा विरोधी बनलो असलो, तरी मी कोठल्याही अर्थी कोणत्याही चळवळीचा, संघटनेचा किंवा वादाचा स्वीकार केला होता असे म्हणता येणार नाही. किंबहुना असेच म्हटले पाहिजे की, एस. एम. अथवा खाडिलकर यांच्यासारख्या वर्गमित्रांच्या मानाने माझे या घडामोडींच्या बाबतीतले ज्ञान अगदी मामुली होते. त्या वेळेपर्यंत मी जोतिबा फुल्यांचे एक अक्षरही वाचले नव्हते आणि मार्क्सचे तर नावही ऐकलेले नव्हते. शिवाजी, तानाजी, पहिले बाजीराव, पानिपतची लढाई, १८५७ च्या बंडामधील तात्या टोपे, झाशीची राणी, चाफेकर बंधू,सावरकर, ही आमची त्या वेळची श्रद्धास्थाने. न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, या सर्वांना आम्ही 'मवाळ' म्हणून निकालात काढीत असू. भारतीय पारंपरिक विचारांमधील आणि समाजव्यवस्थेमधील गुणदोष, ब्रिटिश साम्राज्यशाहीचे स्वरूप आणि गुणावगुण, भारतामधील वर्ण व जातिव्यवस्था, अशांसारख्या विषयांचे काहीही ज्ञान माझ्यापाशी नव्हते. अभ्यास आणि खेळ यांच्याव्यतिरिक्त कशाचाही ध्यास मला त्या वेळी तरी लागलेला नव्हता.

१९२५ च्या जूनमध्ये फर्ग्युसन महाविद्यालयात मी पाऊल टाकले आणि माझ्या मेंदूला विचारांचे पैलू पडायला सुरवात झाली. या अगोदर मी आगरकरांच्या संबंधी जो उल्लेख केला, तो या काळातला. फर्ग्युसन कॉलेजमधल्या 'ओपन शेल्फ लायब्ररी' ने मला घडवले, प्राध्यापकांनी नव्हे, असे म्हणण्यास हरकत नाही. परंपरेने चालत आलेल्या विचारांना बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहिले पाहिजे याची जाणीव आगरकरांच्या लेखनामुळे प्रथम उत्पन्न झाली. 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' हा भारताच्या परिस्थितीसंबंधी विवेचन करीत असताना चिपळूणकरांनी दिलेला हवाला काही कामाचा नाही, याची जाणीव हळूहळू होत चालली. मी ज्या समाजात जन्मलो आणि वाढलो, त्याचा भूतकाळ शनवारवाडयाभोवती घोटाळत होता आणि वर्तमानकाळ गायकवाडवाडयात सामावलेला होता. परंतु याच्या पलीकडे अफाट जग पसरलेले आहे आणि त्यात निरनिराळ्या तऱ्हेचे

समाज, भिन्न भिन्न विचारप्रवाह आणि वेगवेगळ्या संस्कृती आहेत, याची जाणीव मला होऊ लागली ती फर्ग्युसनमधील विद्यार्थिदशेत.

१९२२ साली मी ज्या पूना हायस्कूलमध्ये इंग्रजी चौथीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले ते बंद करण्याचेच सरकारने ठरवले. त्या काळी माझ्या समोर पर्यायी अशा दोनच शाळा होत्या : एक न्यू इंग्लिश स्कूल किंवा नाना वाडा आणि दूसरे नूतन मराठी विद्यालय. बरीच भवति न भवति होऊन मी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नाव घातले. माझा अभ्यास चांगला असल्याकारणाने कोणतीही अडचण न येता मला टिळक-आगरकर-चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या नामवंत शाळेत प्रवेश मिळाला आणि तो सुद्धा 'ब' तुकडीत. पूना हायस्कूलचे वातावरण आणि न्यू इंग्लिश स्कूलमधील वातावरण यांत खूपच फरक होता. विहिरीत डुंबणाऱ्याचे भर नदीत पोहणीस पडावे तशातला तो प्रकार. आता मागे वळून पाहता असे म्हणावेसे वाटते की जर मी पूना हायस्कूलमध्येच राहिलो असतो तर मी आज जो काही आहे तसा झालो नसतो. म्हणजे कदाचित पंडित झालो असतो, अधिकारी झालो असतो, पण क्रियावान बुद्धिवादी झालो नसतो. तसली वांझ विद्या मला पसंत पडली असती अथवा त्यातून माझे मन समाधानी झाले असते असे मला वाटत नाही. म्हणून माझा न्यू इंग्लिश स्कूलमधील प्रवेश मला फार मोलाचा वाटतो. माझ्या जीवनप्रवाहातले ते पहिले दिशांतर !

मी १९२२ सालाला महत्त्व देतो ते माझ्या वैयक्तिक विकासाच्या दृष्टीने. देशाच्या दृष्टीने विचार केला तरीही १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे देहावसान होऊन महात्मा गांधींचा उदय झाल्यामुळे देशात वेगळ्याच प्रकारचे वारे वाहू लागण्यास प्रारंभ झाला होता असे दिसते. रशियन क्रांती, जालियनवाला बाग हत्याकांड, असहकार-आंदोलन यांसारखी जनमानसाला आलेली उधाणे आपल्या खुणा जनमानसावर उमटवून गेलेली होती. सत्यशोधक चळवळीचा अतिरेक आणि त्यातून निर्माण होऊ लागलेले आत्मसंशोधन या दोन्ही प्रक्रिया त्याच काळातील. सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशीचा शेतकरी-लढा टाटा उद्योग-समूहाविरूद्ध जोरात सुरू झाला, तेव्हा मी इंग्रजी सहावीत होतो. वर्गविग्रह, समाजवाद हे शब्दही आमच्या कानावरून त्या वेळी गेलेले नव्हते. पण त्या वेळेपासून 'नच टाटा हा, काटा रुतला हृदयीं' हे 'कुंजविहारीं'चे शब्द ऐकून माझ्या मनात धनिकांविरूद्ध अढी निर्माण झाली हे खरे. भांडवलदार, पिळवणूक इत्यादी शब्द माझ्या शब्दकोशात सामील झाले ते नंतर दहा-बारा वर्षांनी ! तुरूंगात कम्यूनिस्ट मॅनिफेस्टो वाचल्यावर गळ्यातले यज्ञोपवीत मी नाकारले आणि

केलाच तर विधवेशी विवाह करण्याचा मी निश्चय केला तो मी बी. ए. च्या वर्गात असताना. विचाराप्रमाणे आचार हा मंत्र मी कोणा एका गुरूकडून कोणा मंगल क्षणी स्वीकारला असे माझ्या बाबतीत घडलेले नव्हते किंवा माझ्या मित्रांमध्ये ह्या विचारपरिवर्तनाला उपकारक अशी काही चर्चा होत असे असेही नाही. माझ्या नजीकच्या मित्रांपैकी एकानेही जातिपंथाचा बुद्धिपुरस्सर त्याग केलेला नव्हता. म्हणून माझ्या वाचनामधून आणि चिंतनामधूनच मी हे निर्णय घेत गेलो असे मी म्हणतो. माझ्या विचारांची गती मंद असते, पण ती निश्चित असते.

आताच मी कम्यूनिस्ट मॅनिफेस्टोचा उल्लेख केला. परंतु तो वाचनात येण्याच्याही आधी मी आगरकरांचे बहुतेक लेख वाचले होते. हरिभाऊ आपटयांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या माझ्या वाचनात आल्या होत्या. रविकिरण मंडळाचे नवे काव्य आम्ही आवडीने वाचत असू. वामन मल्हार जोशी यांची रागिणी ही कादंबरी तर आमच्या अभ्यासक्रमातच अंतर्भूत होती. या वाचनातून माझे सामाजिक मन आकार घेत गेले असले पाहिजे. पण एवढे सगळे होईपर्यंत १९३० साल उजाडले होते. संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रस्ताव रावीच्या तीरावर काँग्रेसने मान्य केला होता आणि गांधीजींनी मीठ सत्याग्रहाची हाक दिली होती. मनात वादळ उठू लागले होते. कसली तरी हाक ऐकू येत होती; परंतु स्वातंत्र्याचा ठराव काय किंवा मीठ सत्याग्रहाची हाक काय, त्यांचा आवाका मला पूर्णपणे समजला होता असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. पण त्या आवाहनामध्ये आपल्यातील पौरूषाला आवाहन करण्याची धमक आहे, देशाला चहुबाजूंनी वेढून बसलेल्या ब्रिटिश सत्तेच्या तटबंदीला भेदण्याची शक्ती आहे, सामान्य जनतेला प्रेक्षकाची भूमिका सोडून कर्तृत्वाची दिशा दाखविण्याचे बळ त्यात आहे असे मात्र मला वाटले. म्हणून त्या हाकेला मी उत्तर दिले; आणि पहिली वहिली चार महिन्यांची येरवडा तुरुंगवासातली सजा भोगून, चक्की दळून, 'नमक की रोटी' ची सजा ('नमक की रोटी' ही तुरुंगातली एक कडक शिक्षा. कैद्याला केवळ भरपूर मीठ घातलेली भाकरी दोन्ही वेळेला खाऊन राहावे लागते.) भोगून बाहेर आलेला मी, पूर्वीचा राहिलो नाही. त्या चार महिन्यांत सुरवंटाचे फुलपाखरू बनले होते. मानवतावादाची पदवी घेऊनच मी येरवडा तुरुंगातून बाहेर पडलो म्हणा ना. आणि मग

'कधि न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे ।
बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे ॥'
अशा कालखंडाचा प्रारंभ झाला.

कम्यूनिस्ट मॅनिफेस्टो मी याच सुमारास केव्हा तरी वाचला. मार्क्सच्या त्या प्रतिपादनाने जो ठसा माझ्या मनावर आणि वृत्तीवर पडला, त्याला माझ्या जीवनात तोड नाही, हे मला नि:संकोचपणे सांगावेसे वाटते. त्या पुस्तकाच्या वाचनाने माझे विचार बदलले. एवढेच केवळ नव्हे तर, त्यामुळे माझी विचारप्रक्रियाच बदलून गेली. तो निर्जीव प्रबंध नसून झंझावात होता. मार्क्सने मला मार्क्सवादी बनविले नाही, पण बुद्धिवादी बनविले असे म्हटले तरी चालेल. भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय व आध्यात्मिक विचार करण्याची जी काही परंपरा मला ठाऊक होती, तिच्यापासून मार्क्सने मला वेगळे केले आणि कोणत्याही घटनेकडे, धर्माकडे, तत्त्वज्ञानाकडे, अथवा समाजाकडे सर्वस्वी निराळ्या अशा दृष्टीकोनातून कसे पाहावे ते शिकविले. अनेक लोक मला असे विचारतात की तुम्ही कोणापासून स्फूर्ती घेतली ? तेव्हा त्यांच्या प्रश्नाला माझे उत्तर असे असते की कोणीही एक व्यक्ती माझी गुरु नाही. मी काही हाडाचा बंडखोर नव्हे. १९०७ सालापासून १९३० पर्यंत माझी २३ वर्षे परंपरेच्या चाकोरीतूनच वाहत राहिली. चाकोरीबाहेर पडण्याचे विचार येत; पण क्रियेमध्ये त्याचे रूपांतर होत नसे. येरवडयाच्या तुरुंगामुळे ती चाकोरी फोडून बाहेर येण्यासाठी आवश्यक असे शारीरिक सामर्थ्य मला लाभले आणि मार्क्समुळे मानसिक सामर्थ्यही.

मार्क्सवादाचा पूर्णतया स्वीकार मी प्रारंभीची काही वर्षे केलाही होता आणि सोव्हिएट व्यवस्था ही एक आदर्श व्यवस्था आहे असेही आम्हा कित्येकांना वाटत होते. परंतु त्या भ्रमातून आमची सोडवणूक करण्याच्या बाबतीतले मोठे श्रेय स्टालिनला दिले पाहिजे ! स्टालिनची प्रदीर्घ राजवट हा एक प्रदीर्घ स्वप्नभंगाचा किंवा आमच्या पुन:प्रबोधनाचा एक भाग होता असेही म्हणावयास हरकत नाही. या भ्रमनिरासाचा प्रारंभ,रशियातील नामवंत गणल्या गेलेल्या आपल्याच कम्यूनिस्ट सहकाऱ्यांवर राष्ट्रद्रोहाचे आरोप ठेवून त्यांना जिवे मारण्याचे सत्र जेव्हा स्टालिनने रशियात सुरू केले,तेव्हा झाला. ट्रॉट्स्कीला तर त्याने केव्हाच देशोधडीस लावले होते. पण तोपर्यंत टॉट्स्की जिवंत तरी होता. परंतु बुखारिनसारखे मोठेमोठे तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, सेनानी अशांच्या आहुती जेव्हा त्या सत्रात शेकडयांनी पडू लागल्या तेव्हा माझ्या मार्क्सवादाला चांगला हादरा बसला. कामगारांच्या एकाधिपत्याखाली देश आला म्हणजे सर्व प्रश्न मिटतील, अशी एक धारणा आम्हा नवशिक्या मार्क्सवाद्यांच्या मनात रूढ झालेली होती, तिची मुळेच यामुळे कुरतडली जाऊ लागली. कै. बेडेकर, फडके वकील आणि मी अनेकदा हुजूरपागेसमोरच्या फडक्यांच्या कचेरीत जमत असू. त्या वेळी मी काँग्रेस समाजवादी पक्षात होतो. फडके

कम्यूनिस्टांचे सहयात्री होते तर बेडेकर कट्टर मार्क्सवादी होते. मला हे स्पष्ट दिसत होते की स्टालिनची राजवट इतकी रक्तपिपासू ठरेल अशी आमच्यापैकी कोणाचीही कल्पना नव्हती. त्यामुळे या घडामोडी कानांवर आल्यानंतर मी तर मार्क्सवादापासून चार कोस मागे हटलोच, पण माझे दोघे मित्रही संभ्रमित झाले असल्याचे मी पाहिले. पुढे महायुद्धाच्या काळानजीक जग जसेजसे सरकू लागले,तशातशा तर केवळ असमर्थनीय अशा घटना रशियामध्ये घडत गेल्या आणि राजकारणातील कपट-नीतीचा स्टालिनने आम्हाला शेवटी कळस करून दाखवला. त्यावेळी त्याने हिटलरशी दोस्ती करून लिथुआनिया, इस्टोनिया वगैरे शेजारची चिमुकली राष्ट्रे तर गिळंकृत केलीच, पण पोलंडचा अर्धा भागही हिटलरशी संगनमत करून घशात टाकला ! महायुद्धाच्या काळातील कम्यूनिस्टांच्या उलटसुलट कोलांटउडयांबद्दल येथे अधिक लिहिण्याचे कारण नाही; कारण त्यावर हवी तेवढी चर्चा झालेली आहे आणि त्या काळातल्या नव्हे तर संबंध स्वातंत्र्यचळवळीच्या काळातल्या आपल्या चुका भारतीय कम्यूनिस्टांनी उशिरा का होईना कबूल केल्या आहेत. येथे त्या घटनांमुळे माझ्या मनाला जो बोध झाला त्याचे तात्पर्य एवढेच सांगता येईल की, मार्क्सवाद हा देखील अपुरा वाद आहे; सत्तारूढ होण्यापूर्वीचा मार्क्सवादी हा इतर 'वाद्या' प्रमाणेच सत्तारूढ झाल्यानंतर वेगळा बनतो; आणि कोणत्याही संघटनेचे अथवा तत्त्वाचे एकाधिपत्य मान्य केले म्हणजे तिच्याकडून अन्याय घडू लागल्यास तिला वठणीवर आणण्यासाठी जनतेच्या हाती काहीच उरत नाही. या सर्वच बाबी मला अतिशय महत्त्वाच्या वाटल्या.

मार्क्सच्या सिद्धान्तांचा अपुरेपणा फ्रॉइड वाचल्यानंतर जसा माझ्या ध्यानात आला तसा इतिहासाचा तौलनिक अभ्यास केल्यावरही लक्षात येऊ लागला. उत्पादनसाधनांतून मानवसमाजामधील त्या त्या काळातील संस्कृती, सामाजिक व्यवहार व सामाजिक मूल्ये आकार घेतात हा त्याचा सिद्धान्त मर्यादित अर्थानेच खरा आहे, असे मला आढळून आले. इलियड आणि रामायण यांमधून व्यक्त झालेली सांस्कृतिक मूल्ये ही त्यांमधील उत्पादनसाधनांतील साम्य लक्षात घेत-ल्यास फारच वेगळी असल्याचे दिसून आले. अकिलीजचे त्याने हेक्टरचा युद्धात वध केल्यानंतरचे वर्तन, ट्रॉय शहराचा पाडाव केल्यानंतर तेथे ग्रीक सैन्याने घातलेला धुमाकूळ; आणि रावणाला मारल्यानंतर रामाने 'मरणान्तानि वैराणि' म्हणून रावणाचा केलेला विधिपूर्वक अंत्यसंस्कार, लंका लुटण्याचे तर राहोच पण लंकेत पाऊल टाकण्यासही रामाने दिलेला नकार जवळपास एकाच प्रकारची उत्पादनसाधने असूनही मनुष्याने जोपासलेली सामाजिक मूल्ये किती भिन्न असू

शकतात त्याचीच ही बोलकी उदाहरणे नव्हेत काय? असेच एक उदाहरण बाबरनाम्यातून आपणांस मिळते. बाबराने स्वत: अशा नोंदी केलेल्या आहेत की राणा संगाचा किंवा दुसऱ्या एखाद्या भारतीय शत्रूचा रणांगणात त्याने पराभव केला की पराभूत सैनिकांची मुंडकी छाटून तो त्यांचे बुरूज उभारी. असले अघोरी प्रकार पृथ्वीराजाने किंवा चंद्रगुप्ताने अथवा अशोकाने केल्याचा उल्लेख कोठे मिळतो का? बाबर अतिशय रसिक होता, क्षमाशील होता, नव्हे कवीही होता; तरीही त्याला अशी पाशवी क्रौर्यकर्मे करण्यात काहीच गैर वाटले नाही. या सांस्कृतिक तफावतीचा उत्पादनसाधनांशी ताळमेळ बसवणे शक्यच नाही. म्हणजे याचा अर्थ असा करावा लागतो की मानवी मन मार्क्स मानतो त्याहून अनेक पटींनी स्वतंत्रपणे संचार करणारे असते.

एकीकडे मार्क्सवादाची छाप माझ्या मनावर उमटत असताना दुसरीकडे गांधींच्या विचारसरणीचीही ओळख स्वानुभवामुळे अधिकाधिक पटत चालली होती आणि माझ्या जिज्ञासू मनाला असे वाटू लागले होते की मार्क्सवाद हे जसे भांडवलशाहीवरचे एक भाष्यच आहे, तसेच गांधीवाद हे देखील एका निराळ्या दृष्टिकोनातून भांडवलशाहीवर केलेले भाष्यच आहे. मार्क्सच्या विचारसरणीत वर्ग हा केंद्रस्थानी आहे, तर गांधींच्या विचारसरणीत व्यक्ती-माणूस केंद्रस्थानी मानलेला आहे. कामगार वर्गाचे आधिपत्य स्थापन झाल्यानंतर त्याच्याकडून अन्याय होणारच नाही ही कल्पना मला भोळसटपणाची वाटते. म्हणजे हाही एक मार्क्सने कल्पिलेला युटोपियाच नव्हे का? आणि त्या युटोपियातला महान दोष म्हणजे ती अधिसत्ता जुलूम करू लागली, तर तिला विरोध करण्याचे सामर्थ्य जनतेने कोठून आणावे ते मार्क्सने सांगितलेलेच नाही! या बाबतीत मला गांधींची भूमिका अधिक तर्कशुद्ध वाटली. राजदंड कोणाच्याही हाती असो, त्याचा गैरवापर सत्ताधाऱ्यांकडून घडणे शक्य आहे, हे गांधीजींनी मान्य केले होते; आणि त्यांच्या कल्पनेतील राज्यव्यवस्थेत म्हणजे 'रामराज्या'त सुद्धा हाती शस्त्रसाधने नसलेल्या पण न्यायप्रिय व्यक्तीला सत्याला अग्रहक्क देण्याचे, आणि सत्यासाठी खुद्द शासनाशी झगडण्याचा हक्क देण्याचे त्यांनी मान्य केले होते. क्रांतीची सुरुवात स्वत:पासून झाली पाहिजे हे त्यांचे वचन तेव्हा मला फार अर्थपूर्ण वाटले होते आणि आजही वाटते. विचार आणि आचार यांत शक्य तेवढी एकवाक्यता असली पाहिजे, हा गांधी विचारसरणीतील आग्रहही मला फार महत्त्वाचा वाटतो.

तरीही मी जसा मार्क्सवादी झालो नाही, तसा मी गांधीवादीही झालो नाही. माझे मत असे बनले की कोणत्याही 'वादा' ला व्यक्तीने बांधून घेऊ नये. त्यातील

जे काही सार असेल, तेवढे ग्रहण करावे आणि आपली वाटचाल चालू ठेवावी. 'हिंदस्वराज्य' मध्ये गांधीजींनी जे विचार मांडले, त्यांतले अनेक आणि विशेषेकरून यंत्र व तंत्र आणि दंड यांच्यासंबंधीचे त्यांचे विचार मला मान्य होऊ शकले नाहीत. ज्या निरामय, शोषणविरहित आणि आणि दंडविरहित समाजाची ते कल्पना करतात, त्यातील काही गोष्टी मला मान्य आहेत, तर काही नाहीत.ज्या मान्य आहेत, त्यादेखील अंशत: मान्य आहेत. वाफेचे युग, विजेचे युग, अणुऊर्जेचे युग, ही सर्व युगे गांधीजी नाकारू पाहतात, याचा अर्थच मला समजत नाही. माझ्या समजुती-प्रमाणे चतुष्पादापासून द्विपाद मनुष्य वेगळा झाला आणि आजपर्यंतच्या अवस्थेला येऊन पोहोचला तोच मुळी काही ना काही भौतिक साधनांच्या आधारे. माणसाला अगदी प्राचीन काळापासून उलपब्ध असलेले साधन म्हणजे अग्नी. अणुऊर्जेचा उच्चार करताच जे 'शांतं पापम्' असे म्हणू लागतात आणि तिचा धिक्कार करतात; त्यांनीअग्रीऊर्जेचा धिक्कार केल्याचे माझ्या माहितीत नाही. अणुऊर्जा ही जशी इष्ट वा अनिष्ट ठरू शकते, त्याचप्रमाणे अग्नीदेखील इष्ट वा अनिष्ट उद्दिष्टासाठी वापरता येतो. युधिष्ठिराच्या राजसूय यज्ञामध्ये वापरलेला अग्नी आणि कृष्णार्जुनांनी खांडववन जाळून टाकण्यासाठी वापरलेला अग्नी; पांडवांना मारून टाकण्यासाठी कौरवांनी लाक्षागृहात वापरलेला अग्नी आणि लंकापुरी जाळण्यासाठी मारुतीने वापरलेला अग्नी, यांच्यात जर फरक मानायचा असेल तर तो साधनांत नव्हे तर हेतूंमध्ये मानावा लागेल.

भारताच्या अखंडत्वासाठी गांधीजींनी शर्थीची झुंज दिली, ते अखंडत्व इंग्रजांनी येथे घातलेल्या आगगाडीच्या रुळांमुळे,संदेशवाहक तारांमुळे, मराठे, मोगल आणि शीख यांच्याजवळच्या हत्यारांपेक्षा जबरदस्त ठरलेल्या काडतुसांच्या बंदुकीमुळे प्रथमत: साकार झाले होते, हे गांधीजींनी मान्य का केले नाही, हे मला समजत नाही. टेनिसनने पाहिलेले 'फेडरेशन ऑफ मॅन ॲण्ड पार्लमेंट ऑफ द वर्ल्ड' हे स्वप्न जर कधीकाळी प्रत्यक्षात अवतरणार असेल, तर ते सर्व पृथ्वीगोला-ला वेढून टाकणाऱ्या विज्ञानाच्या सुदृढ तंतूवाचून शक्यच होणार नाही. बैलगाडी, चरखा आणि कुदळ-फावडयाची शेती, यांच्या आधारावर भारतीय ऐक्यदेखील टिकू शकणार नाही; मग 'यत्र विश्वं भवति एकनीडम् ।' ही कल्पना तर सोडाच. येथे उत्पादनसाधनांवर संस्कृती तोलली जाते, हे मार्क्सचे वचन सार्थ ठरते. परंतु केवळ विज्ञानाच्या आधारे मानवाची बुद्धी ऐक्य साधू शकेल का ? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच .मी देईन. कारण विज्ञान हे नेहमीच माझ्या मते समाजमूल्यविहीन असते. ते ज्या बुद्धीच्या बळावर प्राप्त करून घ्यावयाचे, त्याच

बुद्धीच्या बळावर समाजहिताला बाधक न ठरता त्याचा वापर करावयाचा असतो आणि त्याच्यावर बंधने घालावयाची असतात. याचसाठी बुद्धाने वा गांधीजींनी सांगितलेल्या करुणेची आवश्यकता मला भासते. एकविसाव्या असो की बाविसाव्या शतकातील असो, मानवाला मार्क्सचा आणि बुद्ध-गांधीजींचा समन्वय साधून आपली प्रगती करावी लागेल अशी माझी समजूत आहे. विज्ञान आणि करुणा. यांच्यात विरोध आहे, त्यांचे उगम भिन्न स्थानातून आहेत असे मी मानीत नाही. विज्ञानाप्रमाणेच अहिंसा, करुणा व समता ही मूल्ये मानवाच्या बुद्धीने समाज निरामय व स्थिर राहावा यासाठी शोधलेली आहेत, अशी माझी भूमिका आहे. नीतिमूल्ये ही सामाजिक स्थैर्याची प्रसादचिन्हे असतात. अस्थिर समाजभूमीत कोणतेही नीतिमूल्य रूजू शकणार नाही.

गांधीजींचे यंत्र-तंत्रासंबंधीचे 'हिंदस्वराज्या'मधील विचार, जे त्यांनी १९४६ मध्ये पंडित नेहरूंना लिहिलेल्या पत्रात बदलले नसल्याचा निर्वाळा दिला, मला स्वीकारणे शक्य झालेले नाही, त्याची आणखी काही कारणे आहेत. रेल्वेपासून संसदेपर्यंतच्या सर्व आधुनिक संस्थांचा त्यांनी धिक्कार केलेला आहे; आधुनिक दळणवणाची साधने व केंद्रसत्ता नाकारल्यावर स्वयंपूर्ण ग्रामसंस्था मान्य करणे ओघानेच प्राप्त होते. अशा ग्रामसंस्था समानतेची व लोकसत्तेची केंद्रे न बनता विषमतेचे शौचकूप बनतील ही डॉ. आंबेडकरांची टीका विदारक असली तरी वस्तुस्थितीशी जुळती आहे, हे मी मान्य करतो. पण गांधीजींची विश्वस्त-कल्पना मात्र मला पटते. वैयक्तिक सुखोपभोगांना मर्यादा घातली पाहिजे हा त्यांचा विचारही मला प्रेरक वाटतो. अपत्याची इच्छा असेल तरच स्त्री-पुरूषांनी संभोग करावा हा विचार मला पुन्हा कमालीचा अव्यवहार्य वाटतो. आधुनिक साधनांनी सज्ज असलेला समाज व समताधिष्ठित समाजरचना यांमध्ये मूलभूत अन्तर्विरोध आहे असे गांधीजींनी का गृहीत धरले होते आणि प्राचीन काळीसुद्धा कधी अस्तित्वात होता की नाही अशा समाजाची स्वप्ने ते काय म्हणून पाहत होते हे मला कधीच समजलेले नाही. माझी तरी अशी खात्री आहे की, समाजातील हरएक व्यक्तीला संपूर्ण जीवन सुखाने जगता येईल अशी विपुलता आधुनिक विज्ञानामुळेच प्राप्त होणार आहे. भोगातिरेक मी त्याज्य समजतो, पण व्यक्तिमात्राला भरपूर अन्नवस्त्रांची व साहित्य-संगीत-कलांनी संपन्न अशा जीवनाची हमी देणारी समाजव्यवस्था हा माझा आदर्श आहे. मी अतिभोगवादी नाही, पण सुखवादी खासच आहे. माझ्या मते 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' ही शुभेच्छा आधुनिक विज्ञानाच्या योग्य वापराशिवाय सिद्ध होऊ शकणार नाही.

उत्पादनसाधनांवरील व्यक्तिगत मालकी नष्ट करावी व ती समाजाच्या मालकीची करावी म्हणजे शोषण होण्याचे थांबेल आणि संपत्तीचे केंद्रीकरण न झाल्यामुळे आर्थिक विषमता नष्ट होईल असे मार्क्सने प्रतिपादन केले होते; पण उत्पादनसाधने खाजगी मालकीतून समाजाकडे वर्ग करायची म्हणजे नेमकी कोणाकडे त्याचा उलगडा त्याच्याकडून झालेला नव्हता. त्यामुळे समाजाच्या नावाने ती साधने शासनाने आपल्या ताब्यात घेतली. कारखाने, लघुउद्योग व शेती शासनाच्या हाती गेली. पण ती कोणाच्याच मालकीची न राहिल्यामुळे त्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला. प्रचंड उद्योग व प्रचंड शेती म्हटली की त्यांच्या व्यवस्थापनाचा एक वेगळाच प्रश्न ज्याप्रमाणे उत्पन्न होत असतो, त्याचप्रमाणे 'माझा' कारखाना, 'माझी' शेती भाती या प्रथमपुरूषी षष्ठीमध्ये जी उद्योगाची आणि आस्थेची सामर्थ्यवान प्रेरणा दडलेली आहे ती समाजीकरण झालेल्या उद्योगात कशी निर्माण करावी हा प्रश्न निर्माण होतो. मनुष्यामधील ह्या सकाम प्रवृत्तीकडे मार्क्सने दुर्लक्ष तरी केले असावे किंवा त्याला तिची जाणीवच झालेली नसावी. आज कम्यूनिस्ट जगात तेथील अर्थकारणाचा आणि व्यवस्थापनपद्धतीचा जो पुनर्विचार चालू आहे तो लोकशाही समाजवादाकडे नेणारा आहे असे मला वाटते. मानवामधील काम व स्वार्थ या प्रेरणांचे उदात्तीकरण काही मर्यादेपर्यंत शक्य असले तरी त्यांचा संपूर्ण लोप शक्य नाही, आणि मला तो इष्टही वाटत नाही.

समाजविकासाची अंतिम स्थिती म्हणजे दण्डहीन समाज. ते मार्क्स आणि गांधीजी या दोघांचेही अंतिम ईप्सित आहे. पण दण्डहीन समाजाची कल्पना कधीही प्रत्यक्षात येणार नाही असे माझे मत आहे. भारतीय दर्शनानुसार सत्त्व, रज व तम असे त्रिगुणात्मक जर जग आहे किंवा ग्रीक दर्शनानुसार मनुष्यात सोने,रुपे व लोखंड यांच्या कमीजास्त प्रमाणामुळे जर प्रकृतिभेद झालेले आहेत, तर सत्त्व-रज-तमाचे अथवा सोने, रुपे व लोखंड यांचे प्रकटीकरण माणूस, माणूस म्हणून या पृथ्वीतलावर नांदेल तोपर्यंत होतच राहणार. जर हे विधान खरे असेल तर मानवी समूहांच्या व समाजांच्या बाबतीतही ते खरेच मानले पाहिजे, निरपवाद मानले पाहिजे. तेव्हा मानवी समाजाला सौम्य दण्डशक्ती आणि तीव्र दण्डशक्ती यांतून कोणते तरी एक सहन करावेच लागणार, हे माझ्या मते त्रिकालाबाधित सत्य आहे. दोन माणसे स्नेही म्हणून जरी एकत्र राहू लागली तरी त्यांचे संबंध नियमित करावे लागतात आणि असे नियम म्हणजेच दण्डाचे सौम्यतम स्वरूप होय. ह्या दोघांची तीन झाली आणि कुटुंब निर्माण झाले की दण्डाचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. म्हणून दण्डविहीन समाज

हे एक रमणीय पण अनावश्यक स्वप्न आहे असे मी मानतो. साहजिकच सत्तेला अस्पृश्य मानण्याची अथवा सत्तेपासून कटाक्षाने दूर राहणाऱ्या यतिवर्गाचीही जरूरी मला वाटत नाही. सत्तेचा हव्यास नसावा तसा विटाळही नसावा. सत्तेनेच केवळ समाजपरिवर्तन घडते असे मानणें जितके चूक, तितकेच सत्तेचा समाजपरिवर्तनाला हातभार लागण्याची आवश्यकता नाही असा समज करून घेणेही तितकेच चूक. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्यांत कायमचे द्वंद्व मानून चालणे कोणत्याही समाजाच्या हिताचे नाही. कामक्रोधादिकांना मानवाचे शत्रू मानून भारतीय चिंतकांनी फार मोठा प्रमाद केलेला आहे. त्या अत्यंत उपयुक्त प्रेरणा अथवा ऊर्जा असून त्यांचे सर्वस्वी दमन करू पाहणे म्हणजे प्राणिसृष्टीची आणि विशेषेकरून मानवी समाजाची विकासप्रक्रिया बंद पाडणेच होय.

प्रस्तुत विषयाच्या प्रारंभीच्या भागात मी सांगितले आहेच की, माझ्या शैशवात मी धार्मिक वातावरणात वाढलो आणि पौगंडावस्थेत मी देवदेवतांची पूजा-अर्चा करीत असे. ब्राह्मण, मराठा, महार असे जातिभेद तर मी मानीत होतोच, परंतु कोकणस्थ-देशस्थ असे पोटजातिभेदही मानीत होतो. मी मानीत होतो याचा अर्थ माझ्यावर तसेच संस्कार झालेले होते आणि त्यांची तपासणी बुद्धीच्या द्वारा करण्याची खटपट मी कधीही केली नव्हती. हे सर्व विचार अथवा संस्कार मी घाऊक घेतले होते असे म्हटले तरी चालेल. आणि बहुतेक मंडळी या घाऊक पद्धतीनेच आपले धर्मविचार अथवा संस्कृती स्वीकारीत असतात ! १९२५ साली फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश केल्यानंतर या एकेका संस्काराची तपासणी मी करू लागलो. ज्या दिवशी माझ्या वडिलांनी माझ्यासमोर ठेवलेले जानवे मी गळ्यात घालण्यास नकार दिला, त्याच्या आधीच माझ्या मनावरील परंपरागत श्रद्धेची आणि संस्कारांची पुटे जवळजवळ सगळीच गळून पडली होती, असे म्हणण्यास हरकत नाही. ईश्वराच्या ज्या सगुण रूपांविषयी मी भक्तिभाव बाळगीत होतो, त्या सगुण रूपांनी त्या वेळेपर्यंत आपले नैसर्गिक पाषाणाचे अथवा धातूचेरूप पुन्हाधारण केले होते. महंमदाप्रमाणे मंदिरामधल्या मूर्ती केव्हाच फोडून टाकल्या होत्या. म्हणजेच मी 'बुत्फरोस्त'चा 'बुतशिकन' झालो होतो. गीतेचा नित्य पाठ बंद पडला होता. परंतु त्याही परिस्थितीत या मूर्ती म्हणजे ज्याचे सगुण रूप आहे, ते गुणरहित आकाररहित असूनही सर्वशक्तिमान सर्वसाक्षी असे काही तत्त्व आहे का, याचा शोध करण्याचे मी सोडले होते असे मात्र नाही. हा शोध माझ्या जीवनातील अशा एका काळात चालू राहिला की ज्या काळात मला अनेक आव्हानांशी मुकाबला करावा लागला. १९३० पासून १९५७ साली आग्वादच्या किल्ल्यातून सुटका

झाली तोपर्यंतचा काळ हा माझ्या आयुष्यातील अत्यंत धामधुमीचा आणि पुरूषार्थाचा काळ. माझ्या मित्रांनी आणि वडिलधाऱ्यांनी मला वारंवार इशारे दिले होते की आज जरी तू ईश्वराविषयी साशंक असलास, 'अज्ञेयवादी' असे स्वत:ला म्हणवत असलास, तरी पुढल्या आयुष्यात तुझ्यावर असे प्रसंग येतील की ज्या वेळी तुला ईश्वराचा किंवा तुला सध्या अज्ञात असलेल्या शक्तीचा आधार घ्यावा असे वाटेल. त्यांना मीही तेव्हा प्रांजलपणे सांगे की, 'मला असा प्रत्यय आला, तर माझं मत मी बदलण्यास केव्हाही तयार राहीन.' परंतु आता ती स्थिती पालटलेली आहे. ज्या प्रांजलपणाने मी ही अनाग्रही भूमिका तेव्हा स्वीकारली होती, त्याच प्रांजलपणाने मला आता माझ्या ऐंशीव्या वर्षी, म्हणजेच माझ्या पक्व वृध्दावस्थेत, असे ठामपणे सांगावेसे वाटते की गेल्या साठ वर्षांच्या माझ्या जीवनात, अतिशय कष्टमय अथवा दु:खमय परिस्थिती मला अनेकवार प्राप्त झाली असतानाही, मला माझ्या बुद्धीपलीकडचा कोणताही आधार शोधण्याची एकदाही गरज वाटलेली नाही. अचानक माझ्यावर परिस्थिती प्रसन्न झाली अथवा रुष्ट झाली असे माझ्या बाबतीत एकदाही घडलेले नाही. 'तुमच्या आयुष्यात तुम्हाला जे अनुभव आले, ते खऱ्या अर्थाने खडतर नव्हतेच, किंवा तुम्ही जी कार्ये पार पाडलीत ती पुरेशी अवघडही नव्हती,' असे जर कोणी यावर म्हणाले तर मात्र मला त्यावर उत्तर देता येणार नाही. कदाचित एवढेच उत्तर देता येईल की, 'ईश्वराची व आमची गाठ पडण्याचा योगच आमच्या कुंडलीत नसावा !' माझ्या अध्यात्मचिंतनाचा विषय क्षणभर बाजूला ठेवून माझा ज्या व्यवहारी जगाशी संपर्क आला त्याच्याकडे पाहिल्यावर, मला जो प्रश्न सतत छळत असतो तो असा की, माझ्यासारखे जाहीर निरीश्वरवादी भारतामध्ये जर असलेच तर ते हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील. भारताची प्रजा ७० कोटी आहे हे लक्षात घेता आणि ती सर्व सश्रद्ध आहे ही गोष्ट लक्षात घेता, नास्तिकांची संख्या नगण्यच मानली पाहिजे. सर्वसामान्य नरनारी नाना प्रकारच्या धार्मिक कर्मकांडात सदैव गुंतलेली दिसतात; दहादहा कोसांवर साधुसंत, महाराज, भगवान यांचे अड्डे पडलेले असतात; कोपऱ्याकोपऱ्यावर मठ आणि मंदिरे उभारलेली असतात. मग सर्व जगामध्ये भारताला भ्रष्टाचाराने बरबटलेला देश, दारिद्र्यमय देश, रोगग्रस्त देश असे का मानण्यात येते ? आणि धर्माचे अजिबात उच्चाटन केलेले किंवा त्याचे अवडंबर न माजवणारे देश भारताच्या शेकडो मैल, शेकडो कोस पुढे का गेलेले दिसतात ? या माझ्या प्रश्नाचे उत्तर आतापर्यंत मला कोणीही दिलेले नाही. 'देव नाही ऐसें मनीं ओळखावे, जनीं चालवावे आहे ऐसें' असा तुकारामांचा चरण कोठेतरी वाचल्याचे आठवते. मग जे मनीं ओळखले ते

जनीं बोलून का दाखवायचे नाही. सामान्य जनांना ईश्वराचा किंवा देवाचा पांगुळ-गाडा दिल्यावाचून त्यांना चालता येणार नाही, अशी कल्पना करून जनमनाला कायमचे पांगळे करून ठेवणे, यात कोणता प्रामाणिकपणा आहे ? 'उद्धरेदात्मनात्मानम् नात्मानम् अवसादयेत् : आत्मैव ह्यात्मनो बन्धु :, आत्मैव रिपु : आत्मन: ।' या वचनाचा सरळ अर्थ रोखठोकपणे जनतेला जर सांगितला, तर देव, दैव वा ईश्वररूपी काठीचा आधार घेतल्यावाचून आपल्याला रस्त्याने सरळ चालताच येणार नाही, ही जनमानसातील दुबळी भावना कायमची नष्ट होणार माही का ?

परंतु हा व्यवहारी विचार झाला. तो बाजूला सारून सभोवारच्या अमर्याद विश्वाकडे नजर टाकली,मानवीसृष्टीचा जरी विचार करू लागले तरी मला असा प्रत्यय आलेला आहे की, या सगळ्यांचे हेतुपूर्वक संचालन करणारी विश्वशक्ती कोठेच आढळून येत नाही. गीतेमधील विश्वरूपदर्शनाचे वर्णन वाचल्यावर मला तर असे वाटते की, उद्देशरहित अखंड चालू असलेल्या सृजन, धारण आणि विनाश या वैश्विक प्रक्रियेचे ते एक उत्कृष्ट शब्दचित्र आहे. यात कोठे कसले नियंत्रण नाही, कसला आराखडा नाही की कसले उद्दिष्टही नाही. असे ते विश्वरूप पाहून झाल्यानंतर अर्जुनाने हात जोडले ते कोणासमोर, आणि मस्तक नमवले ते कोणाच्या पायी, असा प्रश्न मला पडतो. माणसाने आपल्या डोळ्यांच्या चिमुकल्या गवाक्षांतून जेवढे पाहता येते तेवढे पाहिले आणि मग त्यावरून त्यांच्यापैकी एखाद्या अंगिरसाने, एखाद्या कणादाने, एखाद्या गौतमाने, एखाद्या येशून अथवा एखाद्या मोहंमदाने आपल्या प्रतिभाबळावर हवे तसे महाल त्या मोहरीएवढया आधारावर उभे केले. पण त्यांचा विश्वाच्या सत्याशी काही संबंध असेलच असे नाही. जगन्नियंत्याची कल्पना केली याचा अर्थ जगन्नियंता म्हणून कोणी आहे असा होऊ शकत नाही. 'यद् यद् विभूतिमत्सत्त्वं श्रीमद् ऊर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।' अशी पक्षपाती बढाई मारणारा कोणी निघाला म्हणून त्याचे पाय धरावे काय ? जे तेजोहीन आहे, कळाहीन आहे, घातक आहे, पिसाट आहे, त्याचा जनक कोण ? ते देखील या विश्वरचनेचे एक अविभाज्य अंग नव्हे काय ? सच्चिदानंदस्वरूप ब्रह्माशी या जड तामस सृष्टीचा कोणता, कशा प्रकारचा संबंध असतो ? 'सुख पाहतां जवापाडे, दु:ख पर्वताएवढें' हे संतवचन जर खरे असेल, तर त्याचा सच्चिदानंदस्वरूपी ब्रह्माशी कसा मेळ घालायचा ?

असे अनंत प्रश्न आणि त्यांची अनंत उत्तरे. त्यासंबंधी विचार करता गौतम बुद्धांचा विचार पटतो. ईश्वराविषयी पृच्छा केली असताना बुद्धांनी सांगितले की, ईश्वरासंबंधी चर्चा करणे म्हणजे वेळ व्यर्थ घालवणे आहे. म्हणूनच शोध करून

शिणलेल्या माझ्या मनाने ईश्वरविषयक पृच्छेची कवाडेच लावून घेतली आणि ज्या सृष्टीमध्ये आणि ज्या समाजामध्ये आपण जगत आहोत ती सृष्टी आणि तो समाज यथाशक्ती सुधारण्याचा प्रयत्न करणे हाच मोक्षाचा मार्ग, अशा निर्णयाप्रत मी येऊन पोहोचलो.

पण बुद्धापाशी थांबण्यासही मी तयार नाही, असे जर मी म्हणालो, तर त्यात माझ्याकडून बुद्धाचा अनादर होतो आहे असे मला वाटत नाही. जसे **'God is not playing dice'** हे आइन्स्टाइनचे वचन मी मान्य करीत नाही म्हणून मी आइन्स्टाइनबद्दल अनादर दाखवतो असे होत नाही. आइन्स्टाइनचे वाक्य हे केवळ सूचक आहे, निर्णायक नाही असे मला वाटते. ईश्वरी शक्ती जुगार खेळत नसावी, हा त्याचा कयास तो या वाक्यात केवळ सुचवीत आहे. आपल्याकडील नासदीय सूक्तातल्याप्रमाणेच ही सूचना आहे असे मला वाटते. विश्वामधील सर्व हालचालींचे नियमन करणारी, त्यांच्यात सुसूत्रता आणणारी आणि हा सर्व पसारा कोठल्या तरी उद्दिष्टाकडे खेचीत नेणारी शक्ती केव्हा तरी कोठे तरी मानवाला सापडेल, अशी आशा आइन्स्टाइला वाटते आणि तेवढीच त्याच्या या वाक्यात व्यक्त झालेली आहे. यापेक्षा अधिक अर्थ त्यातून निघू शकत नाही. बरे, ती आशा सफल झाली तर ती मान्य करण्याला मी कांकूं करणार नाही. तेवढे माझे मन मी उघडे ठेवले आहे. तथापि, हा शोधदेखील मानवी बुद्धीच लावील, श्वास रोखून किंवा पद्मासन घालून तो लागणार नाही. डोळे मिटून घेऊन ब्रह्मसूत्र वाचता येणार नाही.

मला जे अनेक बंदिवास घडले, ते माझे जीवनविषयक विचार मार्गस्थ करण्याच्या दृष्टीने फारच फायदेशीर ठरले आहेत. त्यांतल्या त्यात देखील माझा गुलबर्ग्यातील दहा महिन्यांचा काळ (१९४२ ते ४३) अतिशय उपकारक ठरला. मला दिलेली सजा एकांतवासाची नव्हती, परंतु त्या वेळी गुलबर्ग्यातील तुरुंगात माझ्या दर्जाचा कोणीही अन्य राजकीय कैदी नसल्यामुळे मला आपोआपच एकांतवास भोगावा लागला. हा जणू माझा दुसरा गर्भवासच. गुलबर्ग्यात १९४१ साली केलेल्या एका भाषणाच्या निमित्ताने मी पुण्यात जसा अचानक पकडला गेलो, तसाच गुलबर्ग्यातून मी अचानक सुटलो. परंतु गुलबर्ग्याच्या तुरुंगात शिरताना जो मी होतो, त्यापेक्षा फार वेगळा होऊन मी बाहेर पडलो. गुलबर्ग्यातील माझ्या ४०' X २०' च्या कोठडीत तास न् तास फिरता फिरता किंवा बसल्या बसल्या मी विचार करीत राही. त्याला हवे तर तपश्चरण म्हणावे, किंवा एका सामान्य माणसाने केलेले मनन म्हणावे. मात्र एवढे खरे की, तेथे मी लिहिलेली 'कारागृहाच्या भिंती' ही

दैनंदिनी माझ्या मनात चाललेल्या वैचारिक मंथनाचा केवळ अंश होती.

तेथे माझ्या मनात अनेकवार असा विचार येई की विश्वात जे अचेतन आहे, ते काही विचार करीत असते की नाही ? कदाचित नसेलही; परंतु जे जे सचेतन आहे, ते तरी कसला विचार करीत असेल आणि कशासाठी धडपडत असेल ? कारण त्याची धडपड तर दिसतच असते. मग त्याचे जीवन काही क्षणापुरते असो, पाचपंचवीस वर्षांचे असो किंवा सहस्त्रावधी वर्षांचे असो. स्वरक्षण आणि सुखाचा शोध यासाठीच सर्व सचेतनाची धडपड चालू असते. स्वरक्षणं हे आद्यकर्तव्य; सुखाचा शोध हे तदनंतरचे. जीवरक्षणासाठी खाणे प्रथम; चवीने खाणे हे त्यानंतर. संभोग हा प्रथम; शृंगार हा तदनंतर. मानवाने आत्म्याचा अथवा ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न मानव म्हणून तो सृष्टीमध्ये वावरू लागल्यानंतर लाखो वर्षांनी घ्यावयास प्रारंभ केला असेल. प्राथमिक अवस्थेत त्याला ज्या दोन गोष्टींबद्दल आत्यंतिक कुतूहल वाटले असेल, त्या म्हणजे मरण आणि जनन. म्हणून जगातील सर्व समाज लिंगपूजेच्या अथवा योनिपूजेच्या अवस्थेतून गेलेले दिसतात. तसेच ते मनुष्य मृत झाल्यानंतर त्याच्यामधील चेतनेचे काय झाले असेल याविषयी नाना प्रकारच्या तर्कवितर्काच्या अवस्थेतूनही गेलेले आहेत. मृतांचे देह सांभाळून ठेवणे, त्यांच्या क्षुधा, तृष्णा, कामवासना त्यांच्या मृतदेहात पुन्हा उद्भवतील तर त्यांच्यासाठी, ते जिवंत असताना जे खात होते, पीत होते, जी शस्त्रे वापरीत होते, ज्या स्त्रिया भोगीत होते, त्या सर्वांची मांडणी त्यांच्याभोवती करण्याचे काही समाजांनी योजिले, तर काही समाजांनी देहातून निघून गेलेले चैतन्य भुकेलेले, तृषार्त राहू नये म्हणून पिंडोदकाची कल्पना काढली. यातूनच पुढे देह आणि चैतन्य किंवा आत्मा ही वेगवेगळी आहेत आणि देह नष्ट झाला तरी आत्मा म्हणून काही तरी तत्त्व उरते, असा तर्क करण्यात आला असावा. या देहापासून आत्मा वेगळा झाला असला, तरीही देह असताना ज्या वासना निर्माण होतात त्या देहापासून अलग झालेल्या आत्म्यालासुध्दा चिकटूनच राहतात आणि त्यांच्यातील उदात्त-अनुदात्तपणामुळे त्यांना त्या वासनांशी सुसंवादी असे नवे देह प्राप्त होतात आणि पुनरपि त्याला सुखदुःखाच्या भोगातून जावे लागते. हे जन्म-मरणाचे चक्र जर संपावे असे आत्म्याला वाटत असेल, तर त्याने वासनांचा क्षय केला पाहिजे. म्हणजे इहलोकीची यात्रा संपवताना त्याचा आत्मा, वासनांपासून अलिप्त असा, मोकळा होईल आणि त्याला मग जन्ममरणाच्या फेऱ्यात भिरभिरत रहावे लागणार नाही, अशी तर्कसाखळी बनविण्यात आली. ज्यांना हा तर्क सुचला नाही, त्यांनी अशी कल्पना केली की, मृतशरीर धारण करून हे सर्व जीव आपल्या थडग्यांत कल्पान्तापर्यंत पडून

राहतात आणि त्या सर्वांचा निर्माता जो प्रभू अथवा अल्ला, त्याची हाक ऐकू येईपर्यंत त्यांना त्याच स्थितीत रहावे लागते आणि मग त्यांनी नरकात जावयाचे की स्वर्गात, याचा निवाडा परमात्मा करतो. परमात्मा अथवा ईश्वर आहे, ही कल्पना मानवाच्या इतिहासात त्याला हजारो, लाखो वर्षांनंतर सुचली, हे स्पष्ट आहे. त्या मानाने पाहता ईश्वर नाही, किंवा तो असेल अथवा नसेलही- अशा तऱ्हेच्या स्याद्वादी कल्पना त्याला सुचण्यात फार कालावधी लागला असे दिसत नाही. कपिल, कणाद, चार्वाक,बुद्ध इत्यादी भारतातील अनेक प्रगल्भ विचारवंतांनी 'ईश्वर नाही' असा सिद्धांत न कचरता मांडला. तसा विचार येशूने अथवा महंमदानेही मांडलेला नाही आणि सॉक्रेटिसासारख्या बुद्धिवंतालाही तो सुचला नाही, हे मला भारतीय विचारवंतांचे वैशिष्ट्य वाटते. या सर्व विश्वाचा कोणी तरी परमाध्यक्ष आहे, या कल्पनेपेक्षा या विश्वाचा परमाध्यक्ष किंवा निर्माता कोणी नाही, ही कल्पना मला अधिक विशाल आणि अधिक स्वावलंबी वाटते. कोणाचेही बोट न धरता किंवा काठीचा आधार न घेता मला चालता येते, या आत्मविश्वासापासून मिळणारा आनंद सच्चिदानंदाच्या तोलाचा आहे.

समाजातील सदाचारासाठी ईश्वरावरील श्रद्धेची गरज आहे असा युक्तिवाद फक्त धर्ममार्तंडांनी आणि प्रेषितांनी केलेला नाही. माझ्या काही जेष्ठ आणि परममित्रांनीही ते मत आग्रहाने मांडलेले आहे. ईश्वराविषयीची श्रद्धा आणि व्यवहारात अनाचार, पिळवणूक, लांडीलबाडी इथपासून तो दरवडे आणि लढाया इथपर्यंतचे अनाचार एकत्र नांदत असल्याची गेल्या हजारो वर्षाची साक्ष डोळ्यांमसोर दिसत असताना या मंडळींनी ईश्वर नसला तर सामाजिक नीतिनियम किंवा सदाचाराची प्रेरणा नष्ट होईल असे आग्रहपूर्वक का म्हणत राहावे, ते मला कळलेले नाही, अजूनही कळत नाही. नुकतेच मी बाबराचे चरित्र वाचीत होतो. त्याची ईश्वरावरील श्रद्धा किती प्रगाढ होती, ते त्याच्या रोजनिशीवरून वारंवार दिसून येते. तो जसा योद्धा होता, तसाच रसिक हृदयाचा होता. पशुपक्षी, वृक्षवल्ली, निर्झर-प्रपात, पुष्करिणी, उद्याने ही सर्व सृष्टिनिर्मित व मानवनिर्मित सौंदर्यस्थाने आपल्या दैनंदिनीत टिपून ठेवण्याइतका तो रसिक होता. तो संगीतप्रेमी होता. पण आपला दरारा बसवण्यासाठी दहापाच माणसांची डोकी गुलाबाची गेंदेदार फुले खुडावी तशी तो सहजपणे उडवत असे, आणि शत्रूच्या पराभवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी शत्रूच्या मस्तकांचे बुरूज रचीत असे, असेही त्याची दैनंदिनी सांगते. धर्मावर अविचलित श्रद्धा असणाऱ्यांनी किती सहजपणे अघोरी कृत्ये केली आहेत, याचे दाखले रामायण, महाभारत आदि ग्रंथामध्ये मिळू शकतील. याचा अर्थ उघडच

असा नव्हे काय की, ईश्वरावरील श्रध्देचा आणि सदाचाराचा काही अविभाज्य संबंध नाही ? सदाचाराचे उगमस्थान ईश्वरनिष्ठेमध्ये शोधायचे नसून ते त्या त्या युगातील समाजधारणेसाठी जे कोणते आचार आवश्यक आहेत त्यांच्याविषयी तत्कालीन विचारवंतांनी बुद्धिपुरस्सर घेतलेल्या निर्णयांत शोधले पाहिजे. 'खंडोबाचा चांग-भले' अथवा 'जय मल्हार' म्हणून दरवडे घालणारे दरोडेखोर, सकाळी काकडआरतीला जाऊन किंवा स्नानसंध्या करून दिवसभर गिऱ्हाइकांचा गळा कापणारे व्यापारी, आणि पांडुरंगाची सपत्नीक पूजा करून भ्रष्टाचार करणारे मंत्री, ही सर्व नित्याचीच दृश्ये नाहीत का ? ईश्वर न मानता मानवाने लाखो वर्षे काढली. ईश्वर मानणारा मानवी समाज गेली काही सहस्त्रकेच अस्तित्वात आहे. आता परत ईश्वर न मानता बंधुभावाने, समानतेने आणि सदाचाराने वागणारा मानवी समाज अस्तित्वात येऊ शकणार नाही असे हताश उद्गार काढण्याचे मला तरी काही कारण दिसत नाही. मात्र त्यासाठी ईश्वर न मानताही आपण विश्वप्रेमी बनू शकतो असे आपल्या आचरणाने दाखवून देणाऱ्या व्यक्तींची गरज आहे. ती गरज पुरविण्याचा प्रयत्न आपण स्वत:पासून केला पाहिजे, हे मी मान्य करतो.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

असे अहंकारी आश्वासन ईश्वराकडून ऐकून घ्यायला मानवाला काहीच कारण नाही. त्यापेक्षा आत्मविश्वासाने 'सहनाववतु ? सहनौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।' अशी प्रथम पुरूषी प्रतिज्ञा जर मानवाने केली तर शांतीचे फळ भोगण्यासाठी त्याला कोणत्याही अवताराची वाट बघत बसण्याचे कारणच काय ?

तत्त्वज्ञानाच्या वाटेपेक्षा विज्ञानाची वाट मला पसंत पडते. वास्तविक विज्ञानाची आणि तत्त्वज्ञानाची वाट एकच असावयास हवी. पण तसे घडत नाही, निदान भारतात तरी नाही. कारण भारतीय चिंतकांनी मोक्ष, निर्वाण, नेति नेति इत्यादि कल्पनांच्या धोंडी मार्गावर टाकून तत्त्वज्ञानाचा पुढचा मार्ग बंदच करून टाकलेला आहे. बुद्धही त्या बाबतीत मला दोषी वाटतो. 'सर्व दु:खम् । सर्व क्षणिकम् । सर्व नष्टम् ।' अशी भूमिका घेतल्यावर मानवी पुरूषार्थाला आवाहन किंवा आव्हान शिल्लक उरत नाही. वास्तविक काल जर अनंत आहे, तर विश्वही अनंतच असणार आणि त्याचबरोबर ज्ञान आणि विज्ञानही कोठे संपले किंवा थांबले असे होण्याचे कारण नाही. विश्वाचा सचेतन आविष्कार,कृमि-कीटक, वनस्पती, पशुपक्षी, मानव अशा विविधरूपांनी युगानुयुगे बदलत आलेला आहे. एके काळचे सरडासूर आणि

गजासूर (डायनेसॉर व मामथ) जसे शतकानुशतके पृथ्वीतलावर मनसोक्त वावरून नाहीसे झाले तसे मानवही नाहीसे होणे शक्य आहे, या सर्व बदलांची नोंद विज्ञान घेते किंवा त्याने घेतली पाहिजे. मानवाचे रूप-रंग, भाषा, वेष, उत्पादन-साधने, ज्ञानसाधने, सामाजिक संबंध, कला ही सर्व समाजांगे सतत बदलत असताना त्याचे तत्त्वज्ञान मात्र जसेच्या तसे शाबूत राहील, 'यद् ज्ञात्वा सर्व विज्ञातं भवति' हे वचन अबाधित राहील, हे कसे शक्य आहे ? विज्ञानाची कधीच अशी भूमिका नसते की आपण एका क्षणाला जी भूमिका घेतली ती दुसऱ्या क्षणी बदलणार नाही. ज्या प्रेषितांनी असा दावा केला की आपला शब्द तो अखेरचा, त्यांची बढाई विज्ञानाने खोटी पाडलेली आहे आणि ईश्वराधीन मानल्या गेलेल्या अनेक गोष्टी त्याने मानवाच्या हाती आणून दिलेल्या आहेत. भूमितीमधील रेषा अथवा बिंदू या प्रत्यक्षात व्याख्येप्रमाणे काढून दाखवता येत नसल्या तरी त्या स्वयंसिध्द मानल्या जातात, तसे ईश्वराचे बाबतीत करण्याचे कारण आहे असेही मला वाटत नाही. उलट ईश्वरावाचूनचे जग आणि प्रेषितावाचूनचे जग आजच्या सश्रद्ध जगापेक्षा कितीतरी पटीने सुंदर बनवणे माणसाला खासच शक्य आहे. समाजाबाहेर मनुष्य राहू शकत नाही म्हणून बंधुभाव हवा म्हणजेच अहिंसा हवी; आणि सृष्टीतला किती तरी भाग अजून अज्ञात राहिलेला आहे तो ज्ञात होण्यासाठी विज्ञान हवे. अहिंसा आणि विज्ञान या दोन साधनांच्या आधारावर मानवसमाज ईश्वर अमान्य करूनही उत्तम प्रकारे चालू शकेल. जनतेमध्ये त्याच स्वावलंबी विचाराचा प्रसार केला पाहिजे. निरीश्वर विश्वाचा विचार सामान्यजनांना कळणार नाही, म्हणून 'क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्' अशी बतावणी करून सामान्यजनाना देवदैवतांच्या बाहुल्यांत, भातुकलीत रमवून ठेवणे म्हणजेच अंधश्रद्धेला, गूढतेला व दैववादाला उत्तेजन देण्यासारखे आहे. नामयज्ञ आणि नामजप सांगणारा आमच्यातला भक्तिमार्ग तर माझ्या मते संसारात हरवलेल्यांची एक लाघवी विराणीच आहे. निसर्गकृत (ईश्वरनिर्मित ?) अवस्थेपासून म्हणजेच पंचमहाभूतांच्या सर्वस्वी अधीन स्थितीपासून आजच्या अनेक दृष्टींनी स्वायत्त अशा अवस्थेपर्यंतची जी बिकट वाट मनुष्य चालत आलेला आहे ती ईश्वराच्या कृपाप्रसादामुळे नव्हे तर उत्तरोत्तर अधिकाधिक सामर्थ्यवान आणि अधिक कसदार बनत गेलेल्या त्याच्या मेंदूमुळे किंवा बुद्धीमुळे. त्याला बुद्धीमुळे अवजारे बनवता आली. पाचपन्नासाच्या टोळीपासून कोटिकोटींच्या संख्येपर्यंत वाढत गेलेल्या समाजाची सर्वतोपरी व्यवस्था त्याला लावता येऊ लागली. बुद्धीच्या साहाय्यानेच आजच्या घडीला तर तो केवळ सर्व मानवजातीमध्ये नव्हे तर निसर्गासहित मानवसमाजाची सुसंवादी मांडणी करण्याचे स्वप्न

पाहत आहे. त्यासाठी तो निरनिराळे आराखडे (मॉडेल), योजना, संस्था व संघटना बांधीत आहे. त्यापैकी ज्या निरुपयोगी ठरतील त्या दूर सारून नव्या योजना तो आखीत आहे. आपणच निर्माण केलेली विज्ञानवृक्षाची जी फळे विषारी ठरणार असे त्याला दिसू लागले आहे ती नष्ट करण्याची सूचना जी त्याला देते आहे तीही त्याची बुद्धीच.

'जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः
जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा प्रयुक्तोऽस्मि तथा करोमि ।।'

हे दुर्योधनाचे उद्गार दुर्योधन नाव धारण करणाऱ्या एका व्यक्तीपुरते खरे नसून ते समाजमानसालाही लागू पडणारे आहेत.'जानामि' असे म्हणणारा दुर्योधन बुद्धीचे कार्य सुचवीत आहे. 'प्रवृत्ति' आणि 'देव' शब्द हे समानार्थी समजले पाहिजेत. अधर्म्य काय आहे हे बुद्धीला समजत असूनही ते न टाळण्याची आणि धर्म्य काय आहे हे माहीत असूनही ते न करण्याची दुर्योधनी प्रवृत्ती आजच्या समाजातही आपणाला दिसून येते. माणसाच्या ठिकाणी किंवा समाजाच्या ठिकाणी ज्या पशुसदृश सहजभावना आहेत, त्यांचे नियंत्रण जो मनुष्य किंवा जो समाज जितक्या प्रमाणात करू शकेल तितक्या प्रमाणात तो माणूस किंवा तो समाज सुसंस्कृत आणि सदाचारी समजला जातो. आजच्या समाजातील कोणत्या प्रवृत्ती समाजविघातक आहेत हे जाणण्याइतपत बुद्धी आजच्या समाजापाशी खासच आहे. 'केनापि देवेन हृदि स्थितेन यथा प्रयुक्तोऽस्मि तथा करोमि' ही दुर्योधनाने सांगितलेली पळवाट आजच्या समाजाने स्वीकारण्याचे काहीही कारण नाही. विज्ञानाच्या साहाय्याने आज जी शस्त्रास्त्र साधने आणि रसायने माणसाहाती दिली आहेत, त्याच विज्ञानाने ती निष्फळ कशी ठरवावी याचेही ज्ञान माणसाला दिले आहे. चिन्हे तर अशी दिसत आहेत की मानवबुद्धी विघातक प्रवृत्तीवर मात करू शकेल आणि सर्व संहारातून जगाला वाचवू शकेल. 'अणुस्फोट झाल्यानंतर आता युद्ध थांबण्याची शक्यता निर्माण झाली' असे जे उद्गार विनोबांनी काढले होते त्याचा हाच अर्थ होता. जगाचा संहार करणारा अणुबाँब वापरायचा की, विनोबांच्या 'जय जगत्' या घोषणेला प्रत्यक्ष व्यवहाराचा आशय प्राप्त करून द्यायचा, हे आता मानवानेच ठरवायचे आहे. 'यो बुद्धेः परतस्तु सः' अशी कल्पना करून तो काल्पनिक 'सः' मानवसमाजाला विनाशाच्या वाटेवरून परतवून लावील अशी आशा करून चालणार नाही. कारण तसा कोणी 'सः' अस्तित्वातच नाही. मानवी बुद्धीचा सर्व विश्वाला कवेत घेणारा

अतिविशाल आविष्कार म्हणजेच तो 'सः' असे आपण सर्वांनी मानले पाहिजे. ब्रह्म्याची, विष्णूची आणि महेशाची भूमिका इथून पुढे मनुष्याने आपल्या बुद्धिबळाने पार पाडायची आहे असे मला वाटते.

'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना माणसाने आजही करावी, पण ती स्वतःच्या बुद्धीला उद्देशून करावी. आकाशात उद्धारकर्ता बसलेला आहे अशी समजूत करून घेऊन त्याला आवाहन करण्यासाठी ही प्रार्थना नाही. देवावाचून मानवी समाजाची नव्हे तर सृष्टीचीही धारणा करणे हा आता शक्य कोटीतील संकल्प झाला आहे, असे माझे निश्चित मत बनले आहे. विश्वाचे मूलद्रव्य निर्दोष, निखळ होते, पण ते कशाची तरी भेसळ झाल्याने गढूळ आणि दोषयुक्त ठरले, हा सिद्धान्त मला मान्य होत नाही. माझ्या मते मूळ द्रव्यच सत्त्व, रज, तम यांनी युक्त होते. ते संमिश्र द्रव्य उत्क्रांत होत होत बुद्धी असलेला मानव निर्माण झाला आणि मानवाने बुद्धीच्या साहाय्याने जे व्यक्तीला आणि समष्टीला अहितकारक असणारे धातू ते हळूहळू दूर करीत करीत स्वतःचा विकास साधलेला आहे. म्हणूनच समर्थ रामदासांनी 'मानीत मानीत घालावे मूळाकडे' हा जो उपदेश केला आहे, त्यामध्ये मूळ स्त्रोत शुद्ध होता ही जी अंतर्भूत कल्पना आहे तिचा त्याग करावा लागतो. मानवाला मुळाकडे अथवा आदिमाकडे जावयाचे नसून त्याला दोषमुक्त अशा अंतिम द्रव्यात रुपांतर करणे, ही मानवी बुद्धीची जबाबदारी आहे, असे मी मानतो.. उपलब्ध धनाचा म्हणजेच साधनांचा जर सम्यक उपयोग केला तर ज्ञानेशांचे पसायदान केवळ शुभचिंतन राहण्याचे कारण नाही. अशी साधनसंपत्ती विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत कोणत्याच काळी मानवाच्या हाताशी नव्हती. 'सर्वेऽपि सुखिनः' करण्याचे आव्हान मानवाच्या बुद्धीने स्वीकारले पाहिजे. ते आव्हान ईश्वर पेलू शकत नाही ही सिद्ध गोष्ट आहे.

माझ्या चिंतनयात्रेत मी या घटकेला ज्या ठिकाणी येऊन पोहोचलो आहे, ते ठिकाण दाखवण्याचा प्रयत्न मी येथवर केला आहे. माझ्या चिंतनातील सर्वच आध्यात्मिक व ऐहिक विषय येथे मांडू शकलो नाही. कारण तसे केले असते तर लेखाचा विस्तार फार झाला असता. माझ्या विचारांची दिशा सूचित करण्यासाठी येथे जे लिहिले आहे तेवढे पुरेल, असे मला वाटते. आतापर्यंत मी कोणालाही गुरू केलेले नाही. गांधी किंवा मार्क्सलाही नाही हे यावरून स्पष्ट होईल. कारण या सतत बदलत्या विश्वाचे आणि मानवसमाजाचे अक्षरचित्र कोणापाशी कितीही दिव्यचक्षू असले तरी तो रेखांकित करू शकेल असे मला वाटत नाही. कॅमेरा जशी क्षणचित्रे टिपतो तशीच आतापर्यंतच्या ऋषिमुनींनी, विचारवंतांनी, प्रेषितांनी आणि विद्वानांनी

क्षणचित्रे टिपली आहेत. ती समाजचित्रे त्या काळाच्या, तत्क्षणीच्या परिस्थितीची चित्रे आहेत. म्हणून वेदकालीन चिंतन, कुरूक्षेत्रावरील चिंतन, बोधिवृक्षाखालील चिंतन, गॅलिलीच्या आसमंतातील आणि हीरा डोंगरावरील चिंतन आजच्या चिंतनाला बंधनकारक ठरता कामा नये. याचा अर्थ ते सर्वस्वी त्याज्य ठरते असाही नाही. नीरक्षीरन्यायानेच त्याचा स्वीकार व्हावयास हवा. माझ्या मते 'ईश्वर अल्ला, तेरे नाम' असे म्हणून सर्वधर्मसमभाव निर्माण होणार नाही. कारण जगाचे वेगवेगळे दर्शन त्या त्या धर्माच्या प्रेषितांना झाले, म्हणून तर हे धर्म त्यांनी प्रस्थापित केले. प्रत्येक धर्म पापाचरणापासून दूर राहा असे सांगतो हे खरे, परंतु पाप कशास म्हणावे याबद्दलच भिन्न धर्माची भिन्न मते पडतात आणि त्यात पुन्हा स्वमताबद्दल पराकोटीचा आग्रह आणि अन्यमताची निंदा, तसेच प्रत्येक धर्मतत्त्वाशी अविच्छिन्नपणे बांधली गेलेली कर्मकांडे, ही धर्माची वैशिष्ट्ये मानली जातात. आताच्या युगातल्या समाजाच्या गरजा किंवा धारणा कोणताही विद्यमान धर्म पुरा करू शकत नाही, या अर्थी सर्व धर्म समान आहेत, असे मानण्यास माझी तयारी आहे. म्हणून परंपरागत सर्व धर्म आणि दर्शने बाजूला सारून, व्यक्तिमात्राला धर्मबंधनातून मुक्त करून, आपापल्या मतीप्रमाणे कोणत्याही धर्मविचाराचा अथवा दर्शनाचा स्वीकार अथवा त्याग करण्याची मोकळीक जर व्यक्तिमात्राला राहिली, तर ती सर्वात उत्तम गोष्ट होईल.

माझ्या उर्वरित आयुष्यात माझी ही मते पालटण्याचा संभव कमी आहे, जवळजवळ नाहीच. परंतु जर मला काही नवीन प्रकाश माझ्या बुद्धीने दाखवला, तर तो अव्हेरण्याचीही माझी इच्छा नाही.

माझ्या जीवनात मी भावनांपेक्षा विचारांना आणि विचाराहून कृतीला अधिक महत्त्व देत आलो आहे. म्हणून रामदासाहून शिवाजी थोर, रानडयांपेक्षा फुले थोर, बर्ट्रांड रसेलपेक्षा श्वाईट्झर थोर, जे. कृष्णमूर्तीपेक्षा मदर तेरेसा थोर आणि अस्पृश्यतानिवारणासाठी स्पृश्यांची मने वळवू पाहणाऱ्या गांधीजींपेक्षा अस्पृश्यांनाच बंडासाठी उभे करणारे आंबेडकर मला थोर वाटतात. सर्वसमाजाच्या भल्यासाठी विचार, उच्चार आणि आचार यांची जेथे मिठी पडलेली दिसेल तेथे मी नतमस्तक होतो. 'तिमिरातुनी तेजाकडे' जाण्याचा तो एकच मार्ग आहे, अशी माझी धारणा बनली आहे.

***

हिंसाचार आणि क्रांती

१८४८ साली प्रसिद्ध झालेल्या, कम्यूनिस्टांच्या जाहीरनाम्यात कार्ल मार्क्सने सुरुवातीचे वाक्य लिहिताना असे शब्द वापरले होते की, 'युरोपच्या मानगुटीला एक पिशाच्च बसले आहे; ते आहे कम्यूनिझमचे.' आज आपल्याला कार्ल मार्क्सच्या त्या वाक्यात थोडा फरक करून असे म्हणता येईल की, भारताच्या मानगुटीवर या घटकेला हिंसावादी अतिरेक्यांचे पिशाच्च बसलेले आहे. पंजाब, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, आंध्र या राज्यांमध्ये जो हिंसाचार चालू आहे तो लक्षांत घेता असे म्हणण्यात काही अतिशयोक्ती होईल असे वाटत नाही. भारतालाच लागून असलेल्या श्रीलंकेतही हा मानव यज्ञ चालू असल्याच्या बातम्या आपण रोज वाचतोच आहो.

भारताला हिंसाचार नवीन आहे असे मुळीच नाही. अगदी प्राचीन काळापासून आपण हिंसाचाराच्या कथा आणि घटना ऐकत आलेलो आहोत. महाभारताच्या सौप्तिक पर्वात, चाणक्याच्या अर्थशास्त्रात, मोगलाईत व मराठेशाहीत अशा तऱ्हेच्या हिंसक कृत्यांचे उल्लेख आढळतात; आणि राज्यसत्तेसाठी निर्दयपणे केलेल्या हत्यांचे वर्णनच नव्हे तर समर्थनही वाचावयास मिळते. प्रत्यक्ष युद्धामध्ये झालेल्या रक्तपाताबद्दल अथवा हिंसेबद्दल मी हे लिहीत नसून रणक्षेत्राबाहेर आपल्या लक्ष्यावर अनपेक्षितपणे हल्ला चढवून केलेल्या रक्तपातासंबंधी म्हणत आहे. अश्वत्थाम्याने पांडवांचे पुत्र आणि सैनिक गाढ झोपलेले असताना त्यांच्यावर हल्ला चढवून सर्वांना कापून काढले होते; तेथपासून तो१९४८ साली ३० जानेवारीला गांधीजीवर गोडसेने पिस्तुल झाडले पर्यंतची अथवा १९८४ साली पंतप्रधान इंदिराजींवर त्यांच्या शरीररक्षकानेच पिस्तुल झाडले तोपर्यंतची अशी शेकडो उदाहरणे आपल्याला आपल्या देशाच्या दीर्घ इतिहासात मिळतील. तथापि आज पंजाबमध्ये व इतरत्र जो हिंसाचार घडत आहे त्याचा विचार अधिक गंभीरपणाने होण्याची गरज आहे असे मला वाटते. हे हिंसाचारही पूर्वीपेक्षा वेगळे असून ते कोणत्याही एकाच डाव्या अथवा उजव्या विचारसरणीचे आहेत असे ठाम विधान करता येणार नाही.१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर मोठया प्रमाणावर जी हिंसाचारी आंदोलने झाली, ती कम्यूनिस्ट पक्षाकडून चालवली जात होती. त्यांची प्रेरणा चीनमध्ये माओने शेतकऱ्यांच्या पाठिंब्याने घडवून आणलेल्या

यशस्वी क्रांतीमधून निर्माण झालेली होती आणि त्या तऱ्हेची क्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न फक्त भारतापुरतेच मर्यादित होते असे नाही. भारताप्रमाणेच इंडोनेशियातही असा उठाव करण्याचे प्रयत्न झाले आणि दोन्ही ठिकाणी ते फसले. इंडोनेशियात प्रस्थापित शासनाने अक्षरश: हजारो बंडखोरांची कत्तल करून कम्यूनिस्ट विचारसणीचे बीजच खणून काढण्याचा प्रयत्न केला. भारतात तसे झाले नाही. अनेक आंदोलक आंध्र प्रदेशात, बंगालमध्ये आणि त्रिपुरामध्ये मारले गेले असले तरी कम्यूनिस्ट विचारसरणी उखडून टाकण्याचा प्रयत्न येथे झाला नाही. श्री. रणदिवेंसारख्या कम्यूनिस्ट नेत्यांनी किंवा त्यांना न मानणाऱ्या नेत्यांनी आपले आंदोलन फसले आहे हे लक्षात घेऊन शांततेच्या मार्गाने आपली चळवळ पुढे नेण्याचे ठरविले. ज्या कम्यूनिस्टांना हे बदललेले धोरण पसंत पडले नाही त्यांनी चारू मुजुमदारांच्या नेतृत्वाखाली आपली चळवळ चालू ठेवली. आजही क्षीण स्वरूपात का होईना, काही मोजक्या प्रदेशात ती चालू आहे. रणदिव्यांसारख्या कम्यूनिस्टांना ज्याप्रमाणे स्टालिनने कानपिचक्या दिल्या, त्याचप्रमाणे नक्षलवाद्यांनाही माओने झिडकारले. परंतु आज नक्षलवादी म्हणून जी मंडळी काम करीत आहेत त्यांच्यामध्ये जरी अनेक फळ्या पडलेल्या असल्या तरी ते स्वत:ला कम्यूनिस्टच म्हणवतात ही एक लक्षणीय गोष्ट आहे आणि तिच्यावर अधिक विचार झाला पाहिजे असे मला वाटते.

म्हणून मार्क्सवादी तत्त्वज्ञानाशी अथवा क्रांतिव्यूहाशी नक्षलवाद्यांची भूमिका कितपत सुसंगत आहे याचा विचार करावा लागेल. मार्क्सने अहिंसा मान्य केलेली नव्हती, इतकेच नव्हे तर हिंसेचा पुरस्कार केला होता आणि शांततेच्या मार्गाने प्रस्थापितांची सत्ता नष्ट करून दलित व शोषित समाजाची सत्ता प्रस्थापित करणे इंग्लंडसारखा एखादा अपवाद सोडता शक्य नाही, असे प्रतिपादन त्याने वारंवार केलेले होते. त्याच प्रतिपादनाचा आधार घेऊन लेनिनने आपला 'शासन आणि क्रांती' हा विख्यात निबंध लिहिला आणि रशियामधील झारशाही उलथवून टाकून मार्क्सप्रणीत विचार व्यवहारात उतरवून दाखविला. या मार्क्स-लेनिनप्रणीत हिंसाचाराशी नक्षलवाद्यांकडून होणाऱ्या हिंसाचाराचे काही औरस नातेगोते आहे का, असा प्रश्न मला उपस्थित करावासा वाटतो आणि त्यांच्यामध्ये तसे नातेगोते नाही असे विधानही करावेसे वाटते. याच्याही पुढे जाऊन अशास्वरूपाच्या हिंसेमुळे मार्क्सवादाचे भ्रष्टीकरण अथवा बीभत्सीकरण होते आहे असेही मी म्हणेन.

स्वत: मार्क्स युरोपातील सर्व इतर देश सोडून लंडनमधील प्रख्यात ग्रंथशाळेत बसून वाचन-मनन करीत असे. ज्या युरोपच्या मानगुटीवर कम्यूनिझमचे भूत

बसले आहे असे त्याने म्हटले होते तेथे राहू नये असे त्याला वाटले याचे कारण तरी हेच नव्हे का की इंग्लंडमध्ये गेल्या शतकांतही जे विचार व आचारस्वातंत्र्य होते ते आपणाला इंग्लंडबाहेर इतर कोठेही मिळणे शक्य नाही हे तो समजून होता? इंग्लंडमध्ये भांडवलशाही होती, पण लोकशाहीही तेथे भांडवलशाहीची शेजारीण म्हणून रहात होती. पुढे लेनिनचेही वास्तव्य लंडनमध्ये झाले आणि महायुद्धाच्या काळात तर तो युद्धापासून सर्वस्वी अलिप्त राहिलेल्या स्वित्झर्लंडमध्ये जाऊन राहिला. जो नागरी स्वातंत्र्याची शीतल छाया अनुभवितो आणि जिच्यामुळे आपण आपले विचार आणि क्रांतीची व्यूहरचना आपण करू शकतो ती सावली आणि ती प्राप्त करून देणारे मूल्यवृक्ष कामगार क्रांतीनंतर समूळ उपटले जावेत अशी इच्छा मार्क्स अथवा लेनिन, हे कसे करू शकतील? क्रांतीनंतरची कामगार वर्गाची अधिसत्ता कायम टिकावी,तिने सर्व व्यक्तिस्वातंत्र्ये खाऊन फस्त करावीत, असे जर त्यांना मनापासून वाटले असेल तर त्यांना कृतघ्न व समाजद्रोहीच समजले पाहिजे. म्हणून मला असे वाटते की समाज क्रांतीसाठी कामगारांची अधिसत्ता हा एक अल्पकालीन उपाय आहे, असा त्यांचा विचार असला पाहिजे. म्हणजे मार्क्सवाद अथवा कम्यूनिझम हा लोकशाहीतील समतेची आणि बंधुभावाची मूल्ये आर्थिक क्षेत्रातही विस्तारित करण्याचे साधन बनायला हवा, हे त्यांना अपेक्षित असावे. मार्क्स-लेनिनच्या मतांचा मी करीत असलेला सौम्य अर्थ सगळ्यांना मान्य होणार नाही हे मी ओळखून आहे. तसे घडले नाही. कारण मी म्हणतो तर जे घडले ते उलटेच ! कामगारांच्या नावाने द्वाही फिरवून मूठभर कम्यूनिस्टांनी रशियाची सर्व सत्तासूत्रे आपल्या हातात घेतली आणि जो कोणी नागरी स्वातंत्र्याचा उच्चार अथवा आचार करावयास पाहू लागला, त्याला कामगार वर्गाचा शत्रू म्हणून नि:पात करण्याचे धोरण स्टालिनने व त्याच्या अनुयायांनी स्वीकारले. याचाच अर्थ मार्क्स-वादाच्या भ्रष्टीकरणाला तेथून सुरूवात झाली. ज्या स्टालिनच्या हत्याकांडाचा निषेध पुढे खूश्शोवने केला आणि बुखारिनसारखा विचारवंतांना आता न्याय देण्याची जी घोषणा गोर्बाचेव्हना करावी लागत आहे, ते सर्व मार्क्सवादामधल्या विकृतीचेच प्रमाण होय.

हीच विकृती दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस जेव्हा रशिया हे अमेरिकेशी तुल्यबळ असे महाबलाढय राष्ट्र म्हणून उदयास आले, तेव्हापासून अधिकच बळावली. युद्धाच्या धुमाळीचा फायदा घेऊन व रशियाने हिटलरशी संगनमत करून अर्धा पोलंड तर आपल्या घशात घातलाच; पण इस्टोनिया, लिथुआनिया आणि लटाव्हिया ही तिन्ही छोटी राष्ट्रे रसगुल्यासारखी उदरस्थ केली ! युध्दसमा-

प्तीनंतर ज्या देशांतून जर्मन सैन्य मागे हटले, त्या पोलंडपासून बल्गेरियापर्यंतच्या सर्व पूर्व युरोपीय देशांत, जेथे जेथे रशियाचे सैन्य खडे होते, तेथे तेथे मूठभर कम्यूनिस्टांनी नात्झींच्या पराभवानंतर जी लोकप्रातिनिधिक शासने तेथे निर्माण झाली होती, ती सर्व उलथून टाकून सर्व सत्तासूत्रे आपल्या हाती, जनतेची अनुमती गृहीत धरून घेतली! दुसऱ्या महायुद्धानंतर आणखी एक गोष्ट घडली. ती वरकरणी क्षुल्लक वाटेल पण ती तेवढी क्षुल्लक नाही. ती गोष्ट म्हणजे शस्त्रास्त्रांची मुबलक निर्मिती व त्यांची सुलभ उपलब्धता. शस्त्रास्त्रांची निर्मिती व खुली विक्री हा एक प्रचंड आंतरराष्ट्रीय धंदा बनला असून त्यात लोकसत्तावादी, कम्यूनिस्टस्, फॅसिस्ट सगळ्या रंगांची राष्ट्रे अहमहमिकेने भाग घेत आहेत.

याच घटनांमधून दहशतवादी कम्यूनिस्ट पंथाचा उदय झाला असावा, असे मला वाटते. चे गव्हेरा अथवा चारू मुजुमदार यांनी याच दहशतवादी मार्क्सवादाचा अंगीकार केला होता. औद्योगिक कामगारांत जागृती व संघटना करून त्यांच्या जागृतीच्या व संघटनांच्या व्यापक पाठिंब्याने प्रस्थापित व्यवस्था उखडून टाकावी, या मूलभूत सूत्राचे भ्रष्टरूपांतर अशा सिद्धांतात झाले की औद्योगिक देशातले कामगार काय, शेतीप्रधान देशातले शेतकरी काय, त्यांना संघटित करण्याचे कारणच नाही. त्यांची संघटना करण्याचे वेळखाऊ कार्यक्रम करीत बसण्यापेक्षा निवडक, प्रशिक्षित क्रांतिकारकांच्या टोळ्या कराव्या, प्रस्थापितांची मर्मस्थाने काबीज करावी, अधिकारी वर्ग व निवडक कर्मचारी यांना ठार मारावे आणि शासनाची सर्व अंगे खिळखिळी करून टाकावी. जे कोणी आपल्याला विरोध करतील त्यांना ठार करावे, मग ती व्यक्ती वृद्ध, बाळ, स्त्री अथवा पुरूष असो. न्याय-अन्याय यांचा विचार वर्ज्य मानावा. या कृत्यासाठी विशाल जनसमुदायाचा पाठिंबा मिळवण्याची मग गरजच रहात नाही ! छोट्या प्रशिक्षित गटाकडून समाजामधील शेलकी माणसे आणि मर्मस्थळे उद्ध्वस्त होत आहेत असे पाहिल्यावर सर्व जनता भीतिग्रस्त होऊन दहशतवादाचा प्रतिकार करण्याऐवजी त्यांच्या आज्ञा मानण्यास तयार होते, अशी मूळ मार्क्सवादाहून सर्वस्वी निराळी अशी व्यूहरचना मांडण्यात आली. या साहसवादाला सैद्धांतिक आधार मिळवून देण्याचे कार्य डेब्रे या फ्रेंच व मार्क्यूज या अमेरिकन विचारवंतांनी केले. माझ्या मते याच व्यूहानुसार व सिद्धांतानुसार भारतातील नक्षलवादी कम्यूनिस्ट आजही कार्य करीत आहेत.

पंजाबमध्ये जे खलिस्तानवादी गट दररोज १०-१२ जणांची हत्या करीत आहेत, ते कम्यूनिस्ट नाहीत, पण त्यांना लोकाश्रय मिळतो आहे, हे अमान्य करण्यात अर्थ नाही; तथापि त्यांना मिळत असलेला हा लोकाश्रय खलिस्तानाच्या मागणीचा

स्वीकार पंजाबातील जनतेने मनापासून केला आहे म्हणून नव्हे, तर अतिरेक्याच्या भयामुळेमिळतो असा माझा तर्क आहे. त्यांत भ्रांत धर्मनिष्ठेचाही भागअसणारच. हे भय जनतेच्या मनात कसे निर्माण झाले, याची कल्पना मला महायुद्धानंतर पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटमध्ये अभ्यासासाठी आलेल्या एका जर्मन तरूणाने दिली, मी जेव्हा त्याला म्हटले की जर्मनांसारख्या विज्ञान, संगीत आणि यंत्रतंत्रज्ञानांत अग्रगण्य असलेल्या तुम्ही लोकांनी हिटलरची अरेरावी सहन केलीत, नव्हे त्याला डोक्यावर घेऊन नाचलात-याचे मला आश्चर्य वाटते. तेव्हा त्याने जर्मन जनतेची मन:स्थिती मला समजावून देण्यासाठी असे सांगितले की देहदंडाची भीती काही एका प्रमाणाबाहेर जर निर्माण केली, तर जनतेला हवे त्याप्रमाणे वाकवता येते, हे नात्झींनी ओळखले होते. शासनाविरुद्ध कोणी जर ब्र काढला,तर त्यालाच शिक्षा होईल असे नाही तर त्याचे सर्व कुटुंबच उद्ध्वस्त केले जाईल, अशी दहशत शासनाने निर्माण केली की तोंड मिटून हात न उगारता माणसे काम करू लागतात आणि कोणतेही शासन खपवून घेतात. शासनाविरुद्ध बोलणाराला कोठडीत बंद केले, किंवा त्याच्या हातांपायांत बेडया ठोकल्या, किंवा त्याच्या पाठीवर आसूड फोडले तरी तो कदाचित डगमगणार नाही, पण पोलिसांनी त्याच्या बायकोला किंवा त्याच्या मुलाला त्याच्यासमोर बसवून जर त्यांचा छळ करण्यास सुरूवात केली किंवा त्याच्या वृध्द मातापित्यांना झोडपले, तर तो शरण येतो. पंजाबमध्ये दशमेश ब्रिगेड किंवा बब्बर खालसा या संघटनाचे तरूण याच सूत्रांच्या आधारे काम करीत आहेत. मात्र ते मार्क्सवादासारखी मूलत: सामाजिक क्रांतीची भूमिका घेत नाहीत, तर ते धर्मरक्षणाच्या अंध भावनेला साद घालून आपले अत्याचार करीत असतात. भारतामध्ये शीखांवर कोठे अत्याचार होत आहेत असे नाही. त्यांच्या धर्मात कोणी ढवळाढवळ करीत आहेत असेही नाही. उलट पंजाब हा भारतामध्ये सर्व राज्यांहून अधिक संपन्न असा भाग आहे; तरीही धर्माचे नाव पुढे करून दहशतवादाच्या मार्गाने पंजाबी जनतेस आपल्या पकडीत ठेवण्याचा प्रयत्न अतिरेक्यांकडून होत आहे. पश्चिम बंगालमधील गुरखालँडचे प्रवर्तक नेते श्री. घेशिंग यांचा मार्गसुद्धा खलिस्तानवाद्यांच्या मार्गाशी अधिक मिळताजुळता आहे. त्यांनी धर्माचे नाव पुढे न करता नेपाळी भाषेचे नाव पुढे केले आहे एवढाच त्यांच्यामधील फरक. पंजाबात खलिस्तानवादी, पश्चिम बंगालमध्ये घेशिंगवादी, आंध्र प्रदेशात नक्षलवादी आणि श्रीलंकेमध्ये ईलमवादी गट जर यशस्वी झालेच, तर तेथे कोणत्या प्रकारची शासनव्यवस्था व समाजव्यवस्था ते निर्मितील?माझ्या या प्रश्नाचे उत्तर शोधून काढणे फार महत्त्वाचे आहे. ही समाजव्यवस्था इतकी विषम आहे की ती कोणालाही

असह्य वाटावी; परंतु ती व्यवस्था नाहीशी करून जर नवी आखणी करावयाची असेल, तर समाज क्रांतिकारकांनी कोणते साधन वापरावे, हा खरा प्रश्न आहे. कारण दहशतवादाचा आज जे आश्रय करीत आहेत, त्यांच्या हाती सत्ता गेल्यास त्यांचे राज्य दहशतीचे होणार,जनसंमतीचे होणार नाही, हे उघड आहे. जे थोडासा मतभेद होताच आपल्या सहकाऱ्यांना गोळ्या घालण्यास कचरत नाहीत, ते 'नागरिक स्वातंत्र्य' 'खुली चर्चा' अथवा 'विरोधी पक्ष' यांपैकी कोणतीही गोष्ट मान्य करणार नाहीत तर पाकिस्तानात ज्या प्रमाणे झियांच्या शब्दांत 'नियंत्रित लोकशाही' आहे तशाच प्रकारची कोणती तरी नियंत्रित 'शाही' अथवा 'लोकशासन' तेथे स्थापन केले जाईल. नाव कोणतेही असो, जनतेची ती एक घोर वंचनाच ठरेल. परंतु आपण दहशतीचा मार्ग जर त्याज्य ठरविला तर मग प्रस्थापिताचा स्वीकार जसाच्या तसा करण्यावाचून काही अन्य मार्ग जनतेसमोर उरतो का ?

मला असे वाटते की, लोकशाहीमध्ये तसा मार्ग उपलब्ध आहे. आजच्या भारतातही तो कठीण असला तरी उपलब्ध आहे. मात्र तो मार्ग चोखळणाऱ्यामध्ये मूल्यनिष्ठा हवी, समाजमानस शिक्षित करता येते असा आशावाद हवा आणि त्याकरिता दीर्घकाळपर्यंत परिश्रम करण्याची मनाची तयारी हवी. अत्याचारी मार्गाचा जे अवलंब करतात ते मार्क्सवादी असोत, फॅसिस्ट असोत की मूळ धर्मवादी असोत, ते दंडुकेशाहीनेच राज्य करणार, हे निःसंशय. समाजातील काही गटांची प्रवृत्ती अत्याचाराकडे वळते, याला शासनही पुष्कळदा जबाबदार असू शकते. लोकशाहीचे सर्व संकेत झुगारून देऊन, वर्षानुवर्षे महत्त्वाचे प्रश्न लोंबकळत ठेवून जर शासक वर्ग राज्यकारभार हाकीत राहिला, तर दहशतवादी अपप्रवृत्ती वाढीस लागतात. म्हणून अतिरेक्यांचे धर्मवादी अथवा क्रांतीवादी बुरखे फाडून त्यांचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणे आपणां सर्वांकडून व्हावयास हवा. त्याचप्रमाणे लोकसत्तेचा बुरखा पांघरून जर शासकवर्ग राज्यकारभार करीत असेल, तर त्याचेही मनगट वेळीच पकडणारी जागृती आपण समाजात करावयास हवी. हिंसाचारी गटांचा हिंसाचार कधी कधी प्रस्थापित शासनाचे आसन घट्ट करण्यासाठी शासनाला वापरता येतो याचे भान जनतेला एक वेळ नसेल पण समाजपरिवर्तनाचे जे सच्चे पुरस्कर्ते असतील त्यांना तरी असावे. कारण हिंसाचार निपटून काढण्याची सबब पुढे करून शासकांना आपल्या दंडशक्तीसाठी आयुधे बाहेर काढण्यास व ती वापरण्यास आयतेच मोकळे रान मिळते. त्रिपुरातील निवडणूक निकालावरून हे स्पष्ट झाले आहे. पंजाब, पश्चिम बंगाल व आंध्र प्रदेशातील हिंसाचारी राजीव गांधीना निरंकुशपणे सत्ता चालवण्याच्या कामी एक

प्रकारे साहाय्यच करीत आहेत आणि परिवर्तनाच्या वाटा रोखून धरीत आहेत. क्रांतीचा घात असे क्रांतिकारकच करीत असतात.

***

अेक सांगावा....

ही घटना घडली, ते साल होते १८५४. रेड इन्डियन लोकांच्या अनेक जमातींपैकी 'सुक्वॉमिश' ही एक. वॉशिंग्टनच्या परिसरात ती कोणास ठाऊक किती पिढया वसलेली. सिअॅटल हा तिचा प्रमुख, मुखिया. रेड इन्डियनांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यांच्यासाठी दुसरीकडे निवासस्थान निर्माण करण्याचे म्हणजे त्यांचे 'पुनर्वसन' करण्याचे अमेरिकन सरकारने ठरविले आणि सिअॅटलला खलिता पाठविला की, आम्ही तुमच्या जमिनी विकत घेत आहोत; तिच्यामोबदल्यात तुम्हांला दुसरीकडे जागा देण्यात येईल. या खलित्याला उद्देशून मुखिया सिअॅटलने व्यक्त केलेले हे विचार आहेत. त्यांची थोरवी कोणालाही सहज कळून येईल अशी आहे. अब्राहम लिंकन यांनी शिक्षकांना उद्देशून लिहिलेल्या पत्राइतकेच या उद्गारातील विचार प्रगल्भ आहेत, हे विशेष.

नर्मदा प्रकल्पामुळे जे ६७ हजार आदिवासी आपल्या पिढयान्पिढयांच्या रानांतून व शिवारांतून उठणार आहेत, त्यांच्याही मनात अशाच तऱ्हेचे विचार येत असतील काय ? ही या पत्राच्या संदर्भात विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

आणखी विशेष म्हणजे हे शब्द लिंकनच्या पत्राआधी बहुधा १० वर्षे बोलले गेले आहेत आणि ते, सर्वच लुटल्या गेलेल्या एका जमातीच्या मुखियाचे आहेत.

पत्राचा मजकूर असा :

'वॉशिंग्टनच्या बड्या मुखियाने आम्हाला कळविले आहे की, आमची जमीन त्याला विकत घ्यावयाची आहे ! महामुखियाने असेही कळविले आहे की, आमचे तुमच्याशी खुशीचे व मैत्रीचे संबंध राहतील. त्यांनी असे म्हणावे, हा त्यांचा थोरपणा. कारण आमच्या मैत्रीची त्यांना गरज नाही, हे आम्ही जाणून आहो. तरीही आम्ही त्यांच्या मागणीचा विचार करू. कारण आम्ही जर जमीन त्यांना विकली नाही तर ते बंदुका घेऊन येतील आणि आमची जमीन बळकावतील. आकाश कोणाला विकता किंवा विकत घेता येईल का ? भूमीचा उबारा विकता येईल ? ही विक्रीची कल्पनाच आम्हाला विलक्षण वाटते.

हवेतला ताजेपणा आणि पाण्याची चमचम ही काही आमच्या मालकीची नव्हत. मग ती तुम्ही आमच्याकडून विकत कशी घेणार ?

या भूमीचा तुकडा आणि तुकडा माझी जमात पवित्र मानते. पाईन वृक्षाचे

प्रत्येक तकतकीत पान, प्रत्येक ठिकाणची पुळण, घनदाट अरण्यांतलं धुकं, जंगलातली प्रत्येक मोकळी जागा, प्रत्येक कीटकाचे गुणगुणणे, माझ्या जमातीच्या मनात पवित्र म्हणून वसलेले आहे. झाडांमधून जो रस वाहतो ना त्यातून आमच्यात ताम्रांच्या स्मृती वाहात असतात.

गोऱ्या लोकांची माणसे दगावली की त्यांना आपल्या जन्मभूमीचा विसर पडतो आणि ती तारामंडळात राहू लागतात. पण आमचे दगावलेले लोक या सुंदर मातृभूमीला कधीच विसरत नाहीत. कारण प्रत्येक ताम्राची ती आई झालेली असते. तिचा अंश आमच्यांत आणि आमचा तिच्यामध्ये मिसळलेला असतो. सुगंधित फुले म्हणजे आमच्या बहिणी. हरणे, घोडे, गरूड हे आमचे भाऊ. गिरिशिखरं, कुरणामधील गवतामधून लवलवणारा रस आणि घोड्याच्या शरीरांतील ऊब आणि आम्ही माणसं ही सारी एकाच कुटुंबातली.

म्हणून वॉशिंग्टनचा महामुखिया आमची ही भूमी विकत घेण्याची जेव्हा भाषा करतो, त्यावेळी तो आमच्यापासून भलत्याच अपेक्षा करतो.

महामुखियाने असाही शब्द दिला आहे की, तो आमच्यासाठी दुसरी जागा पाहील-जिथे आम्ही सुखात राहू शकू. म्हणजे तो आमचा पिता होऊ मागतो ! आणि आम्ही त्याची मुले.

तरीही आम्ही आमची जमीन विकत घेण्याच्या तुमच्या मागणीवर विचार करू. पण ती सोपी गोष्ट नाही. कारण ही जमीन आम्हांला पवित्र आहे !

या ओढयांतून व नद्यांतून जे निवळशंख पाणी वहात असते, ते पाणी नाही, आमच्या वाडवडिलांचे ते रक्त आहे. आम्ही जर ही भूमी तुम्हाला विकली, तर ती पवित्र आहे याची आठवण तुम्ही आणि तुमच्या पुत्रपौत्रांनी ठेवली पाहिजे. या नितळ पाण्यात जी चेटकी प्रतिबिंबे उमटतील, ती आमच्या जमातीच्या जीवनातील घटनांच्या व स्मृतींच्या कथा सांगतील. पाण्यातला हा खळखळाट म्हणजे माझ्या वाडवडिलांचा आवाज आहे.

या नद्या म्हणजे आमचे बंधू. ते आमची तहान भागवितात, आमच्या होडयांना वाहून नेतात, आमच्या पोराबाळांची भूक भागवितात. आम्ही जर ही जमीन तुम्हांला विकली तर तुम्हांला याची आठवण ठेवली पाहिजे आणि आपल्या पोराबाळांना सांगितले पाहिजे की, या नद्या आमच्या आणि तुमच्या भगिनी आहेत. म्हणून आमच्या भावा-बहिणींविषयी जो सद्भाव तुम्ही दाखविता, तोच या नद्यांबद्दल दाखवायला हवा.

गोऱ्या माणसासमोर तांबडया माणसाने नेहमीच माघार घेतली आहे, जसे सूर्यप्रकाशापुढे डोंगरावरचे धुके माघार घेते. परंतु आमच्या पूर्वजांच्या रक्षा पवित्र आहेत. म्हणून त्यांची समाधिस्थले पवित्र होत. या टेकडया, ही झाडे, जमिनीचा हा तुकडा आम्ही पवित्र मानतो. गोऱ्या माणसाला आमच्या परंपरा समजत नाहीत, ते आम्हाला टाउकी आहे. जमिनीचा हा तुकडा काय आणि तो काय, त्याला दोन्ही सारखेच. कारण रात्रीच्या पाहुण्याप्रमाणे तो येतो आणि आपल्याला हवे असेल ते घेऊन जातो. भूमीला तो 'बंधू' मानीत नाही. शत्रू मानतो. त्यामुळे, या भूमीचा ताबा त्याने मिळविला, की ती मागे ठेवून तो पुढे सरकणार. आपल्या वाडवडिलांच्या समाध्या तो मागेच ठेवतो. तो त्यांची परवा करीत नाही. आपल्या मुलांची हातांतली भूमीसुद्धा तो हिसकावून घेतो. त्यांची कदर त्याला नसते. वाडवडिलांच्या समाध्यांना तो विसरतो, तसाच आपल्या मुलांच्या जन्मसिद्ध हक्कांनाही विसरतो. आपली आईच अशी भूमी आणिआपला भाऊचअसे आकाश या लुबाडण्याच्या, क्रयविक्रय करण्याच्या वस्तू आहेत, असेच तो मानतो. त्याची खादाड भूक भूमीला खाऊन टाकील आणि मागे उरेल नुसते वाळवंट.

मला हे समजतच नाही. तुमच्या-आमच्या वाटा अगदी वेगळ्या आहेत. तुमची शहरे पाहिली की आमच्या डोळ्यांना शीण येतो. तांबडा मनुष्य हा अनपढ असल्याने असे होत असावे.

गोऱ्या माणसाच्या शहरांत शांत अशी जागाच नसते ! वसंतात नवी पालवी फुटते, तेव्हाची चाहूल जिथे ऐकता येईल किंवा जेथे कीटकांच्या पंखांचा आवाज कानी पडेल अशी जागाच तेथे नसते ! मी रानटी असल्यामुळे कदाचित तुमचे मला समजत नसेल ! तुमच्या शहरातील ठणठणाट हा श्रवणेंद्रियांचा अपमान आहे. विपूर्विल पक्ष्याची एकांतातील शीळ किंवा रात्रीच्या प्रहरात डबक्याभोवती जमलेल्या बेडकांची चर्चा जर माणसाला ऐकता येत नसेल, तर मग जीवनाला अर्थच काय ? मी रांगडा रेडइन्डियन असल्यामुळे मला हे समजत नसेल, पण मध्यान्हीच्या पावसाने न्हालेला किंवा पाईन वृक्षाकडून गंधावलेला वारा तळ्याच्या पाण्यावरून जेव्हा भणाभणा वाहत जातो तेव्हा त्याची सळसळ आम्हालां फार पसंत पडते!

आम्हांला हवा ही एक अनमोल चीज वाटते. कारण सर्व प्राणिजात तिच्यावरच जगत असतात. प्राणी, वृक्ष, माणूस-सगळ्यांचा श्वास एकच आहे. या हवेकडे गोऱ्या माणसाचे लक्ष नाही. खूप दिवस आजारी असलेल्या माणसाप्रमाणे त्यालाही घाणीची जाण होत नाही. पण आम्ही जर ही आमची भूमी विकली तर हवा ही अनमोल वस्तू आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे आणि हेही ध्यानात घेतले पाहिजे

की ज्या जीवनाला ती आधारभूत आहे, त्या जीवनाच्या भावना तिच्यांत मिसळलेल्या असतात. म्हणून आम्ही जर आमची भूमी तुम्हांला विकली, तर तुम्हांला हे लक्षात ठेवावे लागेल की येथल्या हवेत आमच्या भावना विरलेल्या आहेत. या हवेनेच तर आमच्या आजोबांना त्यांचा पहिला श्वास दिला आणि त्यांचा शेवटचा निःश्वासही तिनेच स्वीकारला.

या वाऱ्यानेच आमच्या मुलाबाळांना जीवनाचे सत्त्व दिले. म्हणून आम्ही ही भूमी जर तुम्हाला विकली, तर तुम्हाला ती वेगळी काढून ठेवली पाहिजे. अशासाठी की गोऱ्या माणसालाही जेथे जाऊन कुरणातील गवताने सुगंधित झालेला वारा अंगावर घेता यावा.

आमची जमीन विकत घेण्याच्या तुमच्या सूचनेचा आम्ही विचार करू. ती तुम्हांला विकत देण्याचे जर ठरले, तर आमची एक शर्त राहील. ती अशी की या भूमीवर संचरणाऱ्या पशूंना गोऱ्या माणसांनी आपले भाऊ मानले पाहिजे.

मी अेक अनाडी मनुष्य आहे. जीवनाच्या दुसऱ्या वाटा मला माहीत नाहीत. गोऱ्या माणसांनी आगगाडीतून जाताना गोळी घातलेल्या शेकडो गव्यांची सडणारी प्रेते मी माळावर पडलेली पाहिली आहेत. मी अडाणी असल्यामुळे मला हे समजत नसावे की जित्या जनावरापेक्षा धूर ओकणारा लोखंडी घोडा (अगीनगाडी) गोऱ्या माणसाला का महत्त्वाचा वाटतो ?

आम्ही गवा मारतो तो केवळ आपला जीव जगवावा म्हणून. पशूवाचून मनुष्य कसा राहू शकतो ? सृष्टीतले सर्व पशू नाहीसे झाले, तर भयंकर एकाकीपणाच्या भावनेने मनुष्यही मरून जाईल. पशूंना जे आज होते आहे, ते माणसांना उद्या होईल. कारण सगळेच जीव एकमेकांत गुंतलेले आहेत ना.

तुमच्या मुलांना तुम्ही हे सांगितले पाहिजे की त्यांच्या पायातळीच्या जमिनीत आमच्या बापजाद्यांची राख मिसळलेली आहे. म्हणजे ते या भूमीचा आदर करतील. आम्ही ज्याप्रमाणे आमच्या मुलांना 'भूमी ही आपली माता आहे' असे सांगतो, तसेच तुम्हीही सांगा. तिचे जे काही बरेवाईट होईल, तेच तिच्या बाळांनाही सोसावे लागेल. जमिनीवर थुंकणारा मनुष्य स्वतःवरच थुंकत असतो. आम्हाला समजते, ते हे. भूमी माणसाची नाही, माणूस भूमीचा आहे ! आम्ही हे जाणून आहोत. कुटुंबातील माणसे रक्ताने बांधलेली असतात, त्याचप्रमाणे सर्व वस्तुजात एकमेकांना बांधलेले असते.

म्हणून भूमीचे जे बरे वाईट होईल, तेच तिच्या मुलांचे होईल. जीवनाची

चदरिया ही काही माणसाने दिणलेली नाही. तिच्यामधला तो एक केवळ धागा आहे. चादर मळली, तर तोही मळेल,चादर स्वच्छ राहिली तर तो स्वच्छ राहील !

तरी पण, आमच्यासाठी राखून ठेवलेल्या भूमीवर आम्ही जाण्याचा विचार करू. आम्ही तुमच्यापासून दूर राहू, पण शांततेने राहू. आमचं उरलेलं आयुष्य आम्ही कुठे घालवतो, त्याला काही महत्व राहिलेले नाही. आमच्या मुलांनी आमचा पराभव पाहिलेला आहे. आमच्या वीरांना मान खाली घालावी लागली आहे. पराभवानंतरचे दिवस ते आळसात घालवू लागले आहेत आणि सुख-चैनीने आपली शरीरे विटाळीत आहेत. म्हणून आमचे शेष आयुष्य आम्हाला कोठे घालवावे लागते, त्याला काही महत्त्व नाही.

फार दिवस उरलेले नाहीत आमचे. आणखी काही घंटे, आणखी काही हिवाळे उरले असतील. त्यानंतर या भूमीवर आजवर ज्या महान जमाती राहिल्या आणि ज्या आता छोटया छोटया टोळ्या करून जंगलामधून रानोमाळ भटकत आहेत, त्यांच्यापैकी कोणीच अश्रू ढाळण्यास मागे उरणार नाहीत. एके काळी आम्ही तुमच्यासारखेच बलिष्ठ आणि आशिष्ठ होतो; पण माझी जमात संपली म्हणून मी दु:ख का करावे ? टोळ्या झाल्या, जमाती झाल्या तरी त्या माणसांच्याच असतात आणि समुद्रावरील लाटांसारख्या त्या येतात आणि जातात.

गोऱ्या माणसांचा देव म्हणे मित्राप्रमाणे त्याच्याबरोबर चालतो, त्याच्याशी बोलतो. म्हणून काही सर्वाचे जे भवितव्य आहे, त्यातून गोऱ्या माणसाची सुटका होणार नाही. काही झालं-गेलं तरी आपण शेवटी भाऊ भाऊच ठरणार. पाहू या, कायकाय घडतेते. एक गोष्ट आम्ही जाणून आहोत, ती अशी की आमचा देव आणि तुमचा देव एकच आहे. गोऱ्या माणसाला याचा शोध केव्हातरी लागेल. आता तुम्हांला असे वाटत असेल की भूमीवर तुमची जशी मालकी आहे तशीच ती तुमच्या देवावरही आहे. पण तो सर्व मानवांचा देव आहे आणि त्याच्या करूणेचा व्याप तांबडया आणि गोऱ्या माणसाला समान लेखणाराआहे. ही भूमी त्याचीच अमोल देणगी आहे. तिचा नाश करणे म्हणजे तिच्या निर्माणकर्त्याचा अपमान करण्यासारखे आहे. गोरे लोकही जातील. कदाचित आमच्या सर्व जमाती गेल्या, त्याच्याहीपेक्षा लवकर जातील. आपले अंथरूणच जर तुम्ही खराब करणार असाल, तर एका काळ्या रात्री तुम्ही गुदमरून मराल.

पण असे नष्ट होतानाच तुम्ही नव्या तेजाने तळपू लागाल. ज्या देवाने तुम्हाला इथे आणले आणि ज्या भूमीवर आणि ताम्रावर तुमचे आधिपत्य त्याने स्थापन केले, तो देव तुम्हाला शक्ती देईल. असे करण्यात त्याचा काय हेतू होता, ते आम्हांला

कळत नाही. सगळे गवे मारले जातील. सगळ्या रानघोडयांच्या तोंडात लगाम बसतील. सगळ्या जंगलातही गूढ स्थाने माणसाच्या वासाने भरून जातील आणि सगळ्या घनदाट टेकडया बोलक्या तारांमुळे दृष्टीआड होतील. तेव्हा काय बरे घडेल ? त्या राया गेल्या कुठे ? ते गरुड आता कोठे आहेत ? ते चपळ घोडे आणि ती शिकार कोठे नाहीशी झाली ? गेले, सगळे गेले ! जे आहे ते नष्ट होत आहे. जीवनासाठी नवी धडपड सुरू होते आहे.

म्हणून आम्ही तुमच्या सूचनेचा विचार करू. आमची भूमी देण्याचे आम्ही ठरविले, तर आमच्या राखीव जागा आम्हांला मिळाल्या पाहिजेत. तेथे आम्ही आपले शेष आयुष्य मनाला येईल तसे घालवू. पण या भूमीवरचा शेवटचा ताम्र जेव्हा नाहीसा होईल आणि झऱ्यावरून तरंगणाऱ्या मेघच्छायेप्रमाणेच त्याची केवळ आठवण उरेल, त्या वेळीदेखील या सागरकिनाऱ्यावरून आणि या अरण्यांतून माझ्या या जमातीचे चैतन्य भरून राहिलेले असेल. कारण तान्ह्या बाळाला ज्याप्रमाणे आपल्या आईच्या हृदयाचे स्पंदन ऐकायला आवडते, तशीच ही भूमी आम्हांला आवडत होती. म्हणून म्हणतो की आम्ही जर ही भूमी तुम्हांला विकली, तर आम्ही तिच्यावर केले तसे तुम्ही तिच्यावर प्रेम करा. आम्ही तिची काळजी घेतली, तुम्हीही घ्या. आता जशी ती आहे, तशीच ती तुमच्या स्मृतीमंजूषेत राहू दे. आमच्या सर्व शक्तीनिशी आणि आमच्या भावनांनिशी आपल्या पुत्रपौत्रांसाठी ती जपून ठेवा, तिच्यावर प्रेम करा. जसा ईश्वर सर्वांवर करतो.

एक गोष्ट आम्ही समजून आहोत. तुमचा आमचा देव एकच आहे. ही भूमी त्याला प्रिय आहे. मनुष्य जातीचे जे भवितव्य आहे, त्यापासून गोऱ्या माणसाचीही सुटका नाही. आपण सगळे कदाचित् भाऊच असू.

बघू या.

***

REFBK-0026506